वर्ष ३५, अंक ६०, ५ रुपये, शहर आवृत्ती, पृष्ठे १४
FACEBOOK.COM/LOKSATTALIVE TWITTER.COM/LOKSATTALIVE LOKSATTA.COM/APPS
Reg. No.PHM / SR / 5 / VIII / 06

पुणे, सोमवार, ९ मे २०२२
WWW.LOKSATTA.COM

# लोकसत्ता

पुणे, मुंबई, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती!

७५ अमृत महोत्सव

अग्रलेख

**मैत्रीबंधासाठीच्या अटीशर्ती!**

रशिया आणि चीनचे खरे महत्त्वाकांक्षी रंग दिसल्यानंतर युरोपीय समुदायाच्या दृष्टीने ऊर्जा आणि व्यापारासाठी लोकशाहीवादी भारत महत्त्वाचा ठरू लागला आहे.



क्रीडा
बंगळूरुकडून हैदराबादचा धुव्वा!

NECC नॅशनल एग कोऑर्डिनेशन कमिटी
Vencobb
एन. ई. सी. सी. आणि व्हेनकॉब प्रकाशित करीत आहे अंड्यांचे आणि ब्रॉयलर चिकनचे आजचे दर
एक्स् फार्म ब्रॉयलर चिकनचा दर*
१३२ रु. प्रति किलो
किरकोळ विक्रीचा दर*
जिवंत कोंबडी
१६० रु. प्रति किलो
ड्रेस्ड (स्किनसह) दर*
२०० रु. प्रति किलो
अंड्याचा किरकोळ विक्रीचा दर*
५० रु. प्रति डझन
ग्राहकांच्या हितासाठी


## तापमान

कमाल ४०.७°से | किमान २१.४°से

**हवामानाचा अंदाज**
दुपारनंतर आकाश निरभ्र राहील.

## काय चाललंय काय!

प्रशांत कुलकर्णी



अनेक वर्षांपासून आमचे विचार अतिशय स्पष्ट आहेत! दर तीन वर्षांनी नव्या पक्षाबरोबर युती करायची ही आमची भूमिका सदैव कायम आहे!!

# पुनर्विकासाच्या नावाखाली ‘बालगंधर्व’ पाडण्यावर शिक्कामोर्तब

## मेट्रोचा स्कायवॉक, पार्किंगसाठीच योजना?

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पुनर्विकासाच्या नावाखाली बालगंधर्व रंगमंदिर पाडण्यावर अखेर शिक्कामोर्तब झाले आहे. बालगंधर्व रंगमंदिराची सध्याची वास्तू पाडून तेथे नाट्यसंकुल उभारण्यात येणार असून तीन विविध आसनक्षमतेची नाट्यगृहे, तीन कलादालने, खुला रंगमंच आणि उपाहारगृह बांधण्याचे नियोजित आहे. उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांनीही या नव्या प्रस्तावाला सहमती दर्शविल्याने येत्या काही दिवसांत प्रत्यक्ष काम सुरू होण्याची शक्यता आहे. दरम्यान, मेट्रोच्या प्रस्तावित स्कायवॉक आणि पार्किंगसाठीच शहराचे सांस्कृतिक वैभव आणि सुवर्णमहोत्सवी वर्षांत पदार्पण केलेली रंगमंदिराची वास्तू पाडून तिच्या पुनर्विकासाचा घाट घालण्यात येत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

भारतीय जनता पक्षाची महापालिकेत एकहाती सत्ता आल्यानंतर तत्कालीन स्थायी समिती अध्यक्ष मुरलीधर मोहोळ यांनी महापालिका अंदाजपत्रकात बालगंधर्व रंगमंदिराच्या पुनर्विकासाची संकल्पना मांडली. मात्र महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व पु. ल. देशपांडे यांच्या संकल्पनेतून साकारलेले बालगंधर्व रंगमंदिर पाडण्यास विरोध (पान १२ वर)





### पुनर्विकास नेमका कशासाठी?

पुणे मेट्रो प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील वनाज ते रामवाडी या मार्गिकेचे काम सध्या सुरू आहे. या मार्गिकेचे एक स्थानक नदीपात्रात असून जंगली महाराज रस्त्यावरील संभाजी उद्यान येथे महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने स्कायवॉक प्रस्तावित केला आहे. या स्कायवॉकचे नियोजन करताना पादचारी आणि मेट्रोच्या प्रवाशांसाठी पार्किंग उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. त्यासाठी संभाजी उद्यानातील जागेबरोबरच बालगंधर्व रंगमंदिरातील पार्किंगची जागा उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळेच बालगंधर्व रंगमंदिराच्या पुनर्विकासाचा घाट घालण्यात आला असल्याचा आरोप होत आहे.

**“बालगंधर्व रंगमंदिराच्या प्रवासाच्या स्मृती कायमस्वरूपी जतन केल्या जातील. करोना संकटामुळे पुनर्विकासाचा मुद्दा लांबणीवर पडला होता. पुणेकरांना अभिमान वाटेल, अशा पद्धतीने नवीन बालगंधर्व रंगमंदिर उभारण्यात येईल. – मुरलीधर मोहोळ,** माजी महापौर

### प्रस्तावात काय?

सध्याचे बालगंधर्व रंगमंदिर साडेबावीस हजार चौरस फूट जागेवर असून मूळ वास्तू पाडून साडेतीन लाख चौरस फुटांचे रंगमंदिर बांधण्यात येणार आहे. नव्या वास्तूमध्ये ८०० ते ९०० दुचाकी आणि ३५० चारचाकी वाहनांची पार्किंग व्यवस्था असेल. कलावंत आणि रसिकांची मागणी लक्षात घेऊन एक ऐवजी तीन नाट्यगृहे नियोजित आहेत. एक हजार, पाचशे आणि तीनशे अशी त्यांची आसनक्षमता असेल. सध्याच्या पाचशे चौरस फुटांचे कलादालन पाडून तेथे दहा हजार चौरस फुटाचे एक आणि प्रत्येकी पाच हजार चौरस फुटांची दोन अशी एकूण तीन नवी कलादालने उभारण्याचे प्रस्तावित आहे. याशिवाय खुला रंगमंच आणि उपाहारगृहाचेही नियोजन आहे.

# होरपळ सुरूच

## ब्रह्मपुरीचा पारा ४४.९ : चक्रीवादळामुळे पावसाळी स्थितीचा अंदाज

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राजस्थानपासून मध्य प्रदेशपर्यंत उष्णतेची लाट कायम आहे. या भागांतून येणाऱ्या उष्ण वाऱ्यांच्या परिणामामुळे विदर्भात उष्णतेची लाट आणि देशातील उच्चांकी तापमान कायम आहे. विदर्भ आणि मराठवाड्यापाठोपाठ आता मध्य महाराष्ट्रातही अनेक भागांत तापमानात वाढ झाल्याने होरपळ वाढली आहे.

राजस्थान, पंजाब, हरियाणा आणि मध्य प्रदेशपासून विदर्भापर्यंत सध्या उष्णतेची लाट आहे. विदर्भासह या सर्व भागांतील कमाल तापमान ४२ ते ४४ अंशांच्या आसपास आहे. मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, झारखंड, गुजरात, छत्तीसगड, तमिळनाडू आदी राज्यांतील तापमानाचा पारा ४० ते ४२ अंशांवर आहे. देशातील उष्णतेच्या लाटेच्या सर्व भागांमध्ये आणि महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रातील तापमानाचा पारा आणखी तीन दिवस वाढलेला राहण्याची शक्यता आहे. विदर्भ, राजस्थान आणि उत्तर- मध्य प्रदेशमध्ये १२ मेपर्यंत, उत्तर महाराष्ट्रात ९ मेपर्यंत, तर हरियाणा, दिल्ली, पंजाब आदी राज्यांत १२ मेपर्यंत उष्णतेची लाट राहणार आहे. रविवारी (८ मे) विदर्भातील ब्रह्मपुरी येथे राज्यातील उच्चांकी ४४.९ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. वर्धा, चंद्रपूर, अमरावती, अकोला आदी जिल्ह्यांतही तापमानाचा पारा ४४ अंशांपुढे होता. मराठवाड्यात औरंगाबाद येथे ४० अंशांपुढे, तर परभणी आणि नांदेड येथे ४१ अंशांपुढे तापमानाची नोंद झाली. मध्य महाराष्ट्रात रविवारी तापमानात काही प्रमाणात वाढ झाली. पुणे शहरात हंगामात दुसऱ्यांदा तापमानाचा पारा ४० अंशांपुढे गेला. कोल्हापूर, नाशिक, सोलापूर आणि सातारा या जिल्ह्यांतही तापमान ४० ते ४१ अंशांदरम्यान नोंदविले गेले. मुंबई परिसरासह कोकण विभागात मात्र सर्वत्र तापमानाचा पारा सरासरीच्या जवळपास आहे.

**उष्णतेची लाट**

हवामान विभागाच्या नव्या अंदाजानुसार १२ मेपर्यंत विदर्भात उष्णतेच्या लाटेची स्थिती राहणार आहे. प्रामुख्याने अकोला, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ आदी जिल्ह्यांत तापमानाचा पारा वाढलेला राहील. मध्य महाराष्ट्रात आणखी एक दिवस उष्णतेच्या लाटेची स्थिती असणार आहे. धुळे, जळगाव, नाशिक, नगर या जिल्ह्यांत उन्हाचा चटका तीव्र असेल.

**चक्रीवादळाची स्थिती काय?**

बंगालच्या उपसागरातील पूर्वमध्य भागातील तीव्र कमी दाबाच्या क्षेत्राचे रूपांतर रविवारी ‘असानी’ या चक्रीवादळात झाले. हे चक्रीवादळ सध्या उत्तर-पश्चिम दिशेने भारताच्या किनारपट्टीच्या दिशेने येत आहे. ओदिशातील पुरीपासून १००० किलोमीटर, तर आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणमपासून ते ९४० किलोमीटर अंतरावर आहे. पुढील बारा तासांत ते तीव्र होणार आहे. ओदिशा आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीपासून काही अंतरावर चक्रीवादळ किनाऱ्याकडे न जाता पूर्वोत्तर भागाकडे वळणार आहे. मात्र, या कालावधीत त्याचा वेग ११५ किलोमीटरपर्यंत पोहोचणार आहे. त्यामुळे ओदिशा, आंध्र प्रदेशमध्ये १० आणि ११ मे रोजी मुसळधार वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे.



छाया : अमित चक्रवर्ती

**पारा घसरण्याची शक्यता** बंगालच्या उपसागरामध्ये ‘असानी’ या चक्रीवादळाची निर्मिती झाल्याचे भारतीय हवामानशास्त्र विभागाने रविवारी (८ मे) जाहीर केले. हे चक्रीवादळ ओदिशा आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीच्या जवळ असताना महाराष्ट्रात काही भागांत पावसाळी वातावरण तयार होणार असल्याने तापमानाचा पारा काही प्रमाणात खाली येऊन दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

### पाऊस कुठे?

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले चक्रीवादळ १०, ११ मे रोजी तीव्र स्वरूप घेणार आहे. या कालावधीत राज्यात काही भागांत हलक्या पावसाची शक्यता आहे. दक्षिण कोकणात १० ते १२ मेदरम्यान, तर पश्चिम महाराष्ट्रातही दक्षिण भागात काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील उर्वरित भागात आकाश अंशतः ढगाळ राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे तापमानात काही प्रमाणात घट शक्य आहे.

# व्याज दरवाढीची वेळ आश्चर्यकारक!

## निर्मला सीतारामन यांचे मत

**पीटीआय, मुंबई**

**रिझर्व्ह बँकेने** अलीकडेच व्याजदरांत केलेली वाढ आश्चर्यकारक नव्हती. मात्र, तिची वेळ आश्चर्यकारक आहे, असे मत अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी व्यक्त केले.

ऑगस्ट २०१८ नंतर पहिल्यांदाच रिझर्व्ह बँकेने ४ मे रोजी रेपो दरात ४० बेसिस पॉइंटची वाढ केली, तसेच सीआरआर ५० बेसिस पॉइंट्सनी वाढवून ४.५ टक्के केला. युक्रेनमधील युद्धाचा परिणाम म्हणून कच्च्या तेलाच्या किंमतीत वाढ झाल्याने अर्थव्यवस्थेवर चलनफुगवट्याचा दबाव आल्याचे बँकेने म्हटले होते. मार्चमध्ये ६.९ टक्के असलेला किरकोळ महागाई दर एप्रिलमध्ये ७.७ टक्क्यांपर्यंत नोंदला जाण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.



या पार्श्वभूमीवर सीतारामन यांनी मुंबईतील एका कार्यक्रमात या निर्णयाबाबत मतप्रदर्शन केले. ‘‘रिझर्व्ह बँकेमार्फत व्याज दरवाढीची वेळ आश्चर्यकारक आहे, पण ही कृती मात्र नाही, कारण हे होणारच होते याचा लोकांनी विचार केला होता. मात्र, पतधोरण समितीच्या दोन बैठकांदरम्यान हा निर्णय घेण्यात आल्याने त्याचे आश्चर्य वाटले’, असे निर्मला सीतारामन म्हणाल्या. रिझर्व्ह बँकेच्या व्याजदरवाढीवर त्यांनी प्रथमच प्रतिक्रिया दिली आहे.

रिझर्व्ह बँकेच्या व्याजदार वाढीच्या निर्णयाचा सरकारच्या नियोजित पायाभूत सुविधा प्रकल्पांतील गुंतवणुकीवर काहीही परिणाम होणार नाही, असे सीतारामन यांनी आवर्जून सांगितले.

महागाई वाढत असताना रशियाकडून सवलतीत तेल मिळत असेल तर ते खरेदी करणे व्यवहार्यच ठरते, असे नमूद करत त्यांनी रशियाकडून तेलआयातीचे समर्थन केले.

# साखरेचे विक्रमी उत्पादन

## ३४२ लाख मेट्रिक टन : देशभरात अद्यापही २१९ कारखान्यांत उत्पादन सुरूच

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** ऊस उत्पादनात लक्षणीय वाढ झाल्याने यंदा देशात विक्रमी ३४२ लाख मेट्रिक टन साखरेचे उत्पादन झाले आहे. गेल्या वर्षीच्या साखर उत्पादनापेक्षा हे प्रमाण १४ टक्के जास्त आहे. विशेष म्हणजे अजूनही देशातील ५२० पैकी २१९ साखर कारखाने सुरूच असल्याने साखर उत्पादन ३५५ लाख मेट्रिक टनांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर यंदा साखर निर्यातही ९५ लाख मेट्रिक टनांपर्यंत जाण्याचा अंदाज आहे.

देशात २०१७-१८ मध्ये ३१२ लाख मेट्रिक टन, २०१८-१९ मध्ये ३२२ लाख मेट्रिक टन तर २०१९-२० मध्ये २५९ लाख मेट्रिक टन साखरचे उत्पादन झाले होते. यंदा देशभरात ५२० साखर कारखान्यांनी उत्पादन घेतले. एरवी मार्चपर्यंत साखर कारखान्यांचे गाळप पूर्ण होते. पण, उसाचे पीक मोठ्या प्रमाणात झाल्याने आता मे महिना सुरू झाला तरी देशातील २१९ साखर कारखान्यांमध्ये ऊस गाळप व साखर उत्पादन सुरूच आहे. मागच्या वर्षी याच काळात १०६ साखर कारखाने सुरू होते. यंदा त्या तुलनेत दुप्पट साखर कारखाने सुरू आहेत. मागील तीन वर्षांचा विचार करता २०१७-१८ मध्ये एप्रिलअखेरपर्यंत ११० साखर कारखाने सुरू होते. २०१८-१९ मध्ये ९० कारखाने सुरू होते. तर २०१९-२० मध्ये ११२ साखर कारखाने सुरू होते.

गेल्या वर्षी संपूर्ण साखर हंगामात एकूण ३११ लाख मेट्रिक टन साखर उत्पादन झाले होते. यंदा आतापर्यंत झालेले ३४२ लाख मेट्रिक टन साखर उत्पादन आणि अजूनही २१९ साखर कारखाने सुरूच असल्याचे लक्षात घेतले तर एकूण ३५५ लाख मेट्रिक टनांपेक्षा अधिक साखर उत्पादन होण्याची शक्यता आहे. यात जवळपास ३५ लाख मेट्रिक टन साखर होईल इतका रस आधीच इथेनॉल उत्पादनाकडे वळवण्यात आला आहे हे लक्षात घेतले तर यंदाच्या विक्रमी उत्पादनाची कल्पना येईल, असे राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे यांनी सांगितले.

देशात विक्रमी साखर उत्पादन होत असताना (पान १२ वर)

### साखर निर्यातीतून ३० हजार कोटी

देशातील ८५ लाख मेट्रिक टन साखरेचे निर्यात करार झाले असून हंगामात एकूण ९५ लाख मेट्रिक टन साखर निर्यात होण्याचा अंदाज आहे. भारतातून यंदा सर्वाधिक १५ टक्के साखर इंडोनेशिया, १० टक्के बांगलादेश आणि अफगाणिस्तान, सोमालिया, मलेशिया आदींना प्रत्येकी तीन टक्के साखर निर्यात झाली आहे. देशातील साखर कारखान्यांना निर्यातीमधून एकूण ३० हजार कोटी रुपयांचा महसूल मिळण्याचा अंदाज असल्याचे प्रकाश नाईकनवरे यांनी सांगितले.



## काश्मीरमध्ये चकमकीत दोन दहशतवादी ठार



**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यात रविवारी सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत लष्कर-ए-तोयबाच्या एका पाकिस्तानी दहशतवाद्यासह दोन दहशतवादी ठार झाले.

दक्षिण काश्मीरमधील कुलगामच्या चेयान देवसर भागात दहशतवादी लपल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी या भागाला वेढा घालून शोधमोहीम सुरू केली. या वेळी झालेल्या चकमकीत दोन दहशतवादी मारले गेले, असे एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले. त्यात हैदर नावाच्या पाकिस्तानी दहशतवाद्याचा समावेश आहे. बंदीपुरा येथे अलीकडेच झालेल्या दोन दहशतवादी गुन्ह्यांत तो सहभागी होता. चकमकीत ठार झालेला शाहबाझ शाह नावाचा दुसरा दहशतवादी कुलगाम येथील होता. १३ एप्रिल रोजी सतीश कुमार सिंह या नागरिकाच्या हत्येत त्याचा सहभाग होता.

## हिमाचल विधानसभेच्या द्वारावर खलिस्तानी झेंडे

**धर्मशाळा :** हिमाचल प्रदेश विधानसभा परिसराच्या मुख्य द्वारावर खलिस्तानी झेंडे लावल्याचे, तसेच भिंतीवर घोषणा खरडल्याचे आढळले, असे पोलिसांनी रविवारी सांगितले. हे झेंडे मुख्य प्रवेशद्वार क्रमांक एकच्या बाहेरच्या बाजूने लावण्यात आले होते. काल उशिरा रात्री किंवा आज पहाटे हे घडले असावे. आम्ही ते झेंडे हटवले आहेत. या प्रकरणी गुन्हा दाखल केला जाईल, असे कांगडाचे पोलीस अधीक्षक खुशाल शर्मा यांनी सांगितले.

# रायगडमध्ये बस दरीत कोसळून ३ ठार, २९ जखमी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**अलिबाग :** रायगड जिल्ह्यात माणगाव -श्रीवर्धन मार्गावर घोणसे घाटात खासगी बस दरीत कोसळून रविवारी सकाळी भीषण अपघात झाला. त्यात तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर २९ प्रवासी जखमी झाले.



नालासोपारा येथून ३२ प्रवाशांना घेऊन ही बस बोर्ली - श्रीवर्धनकडे निघाली होती. सकाळी पावणेआठच्या सुमारास घोणसे घाटात एका वळणावर चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे पुलाचा कठडा तोडून बस ५० ते ६० फूट खोल दरीत कोसळली.

या अपघातात अश्विनी बिरवाडकर (रा. धनगरमलई), मधुकर बिरवाडकर (रा. धनगरमलई) आणि सुशांत रिकामे, (रा.वडघर पाचलोली) या तिघांचा मृत्यू झाला. अपघातात २९ जण जखमी झाले.

अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि स्थानिक बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली. त्यांनी मदत व बचावकार्य करून जखमींना रुग्णालयात नेले.जखमींवर म्हसळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करण्यात आले. त्यातील १५ जणांना माणगाव उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले.

शासनाकडून शंभर टक्के अनुदानाची रक्कम प्राप्त


# साहित्य संस्थांचा आर्थिक गाडा रुळावर

**विद्याधर कुलकर्णी, लोकसत्ता**

**पुणे :** करोना प्रादुर्भाव ओसरल्यानंतर राज्य शासनाकडून तीन टप्प्यांमध्ये अनुदानाची पूर्ण रक्कम प्राप्त झाल्यामुळे साहित्य संस्थांचा आर्थिक गाडा रुळावर येण्यास सुरुवात झाली आहे. दहा लाख रुपयांच्या अनुदानामुळे संस्थांच्या खर्चाला हातभार लागला आहे.

करोना प्रादुर्भाव आणि टाळेबंदीचा परिणाम सर्वच घटकांवर झाला. साहित्य संस्थाही त्यास अपवाद *(पान ४ वर)*

### पत्रिकेच्या छपाईसाठी विनियोग



करोनाचा शिरकाव झाला त्या वर्षी केवळ दहा टक्के अनुदान मिळाले होते. या वर्षी सुरुवातीला ३५ टक्के, नंतर १५ टक्के आणि आता उदगीर साहित्य संमेलनापूर्वी उर्वरित ५० टक्के रक्कम मिळाली, असे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी सांगितले. अनुदानाच्या रकमेचा विनियोग साहित्यिक उपक्रम आणि महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या छपाईसाठी केला जातो. परिषदेचे १६ हजार आजीव सभासद आहेत. करोना काळात ऑनलाइन स्वरूपात अंक प्रकाशित केला जात होता. मात्र, आता अनुदान मिळाल्यामुळे अंक पुन्हा मुद्रित स्वरूपात प्रसिद्ध केला जात आहे. अंकाच्या छपाईचा खर्च किमान १५ लाख रुपयांच्या घरात येतो. उर्वरित रक्कम प्रायोजक आणि जाहिरातींच्या माध्यमातून उभारली जाते, असेही जोशी यांनी सांगितले.

किरकोळ बाजारात दर ४०० ते ८०० रुपये डझन

# हापूस सर्वसामान्यांच्या आवाक्यात!

**राहुल खळदकर, लोकसत्ता**

**पुणे :** हंगामाच्या शेवटच्या टप्प्यात हापूस सर्वसामान्यांच्या आवाक्यात आला असून, प्रतवारीनुसार बाजारात एक डझन आंब्यांचा दर ४०० ते ८०० रुपयांदरम्यान आहे. गेल्या आठवड्यात एक डझन आंब्याचे दर ९०० ते १२०० रुपये होते. अक्षय तृतीयेनंतर आंब्यांची आवक वाढली असून, दरात घसरण नोंदविण्यात आली.

यंदा हवामान बदलाचा कोकणातील हापूस आंब्यांवर मोठा परिणाम झाला. फेब्रुवारी महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात बाजारात हापूसची आवक सुरू झाली. त्यानंतर मार्च महिन्यात ती नियमित झाली. हंगामाच्या पहिल्या टप्प्यात हापूसचे दर चढे होते. आवकही अपेक्षेएवढी होत नव्हती. त्यामुळे आंब्यांचे दर सामान्यांच्या आवाक्यात नव्हते, असे श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील आंबा व्यापारी करण जाधव यांनी सांगितले.

अक्षय तृतीयेदरम्यान आंब्याची आवक वाढली. गेल्या आठवड्यात १ ते ३ मेदरम्यान मार्केट यार्डातील फळबाजारात कोकणातून एकूण मिळून २५ ते ३० हजार पेट्या हापूसची आवक झाली. अक्षय तृतीयेला आंब्यांची आवक वाढली होती. मात्र, मागणी जास्त असल्याने आंब्यांचे दर चढे होते. त्यानंतर रविवारी (८ मे) मार्केट यार्डातील फळबाजारात कोकणातून हापूसच्या दहा ते पंधरा हजार पेट्यांची आवक झाली. आंब्यांची आवक वाढल्याने दरात घट झाली. किरकोळ बाजारात एक डझन आंब्याचे दर प्रतवारीनुसार ४०० ते ८०० रुपये दरम्यान आहेत. हापूसच्या पेटीमागे एक हजार ते १२०० रुपयांनी घट झाल्याचे जाधव यांनी सांगितले.



### आंब्यांचे दर

**कच्चा हापूस** (चार ते सहा डझन पेटी) : ८०० ते १२०० रुपये
**तयार हापूस** (चार ते सहा डझन पेटी) : १८०० ते २००० रुपये
**कच्चा हापूस** (पाच ते दहा डझन पेटी) : १८०० ते २२०० रुपये
**तयार हापूस** (पाच ते दहा डझन पेटी) : २२०० ते ३००० रुपये

**“बाजारात हापूस आंब्याची आवक वाढली आहे. दरात घट झाल्याने आता सामान्यांना हापूसची चव चाखता येणार आहे. हंगाम संपण्यास दहा ते पंधरा दिवसांचा कालावधी बाकी आहे. या कालावधीत आंब्यांचे दर आवाक्यातच राहतील. – अनिरुद्ध भोसले,** आंबा व्यापारी, अध्यक्ष, श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड अडते संघटना

# उसाबाबत धोरणकर्तेच संभ्रमात

**दत्ता जाधव, लोकसत्ता**



**पुणे :** राज्यात शिल्लक उसाचा प्रश्न गंभीर होत आहे. साखर आयुक्तालय आपल्या परीने ऊस तोडणीचे नियोजन करीत आहे. शेतकरी संघटना, भाजप प्रणीत किसान मोर्चासह अन्य नेते शिल्लक ऊस तोडणीसाठी दबाव वाढवीत आहेत. दुसरीकडे शुक्रवारी पुण्यात झालेल्या खरीप आढावा बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार ऊस प्रश्नावरून संभ्रमात असल्याचे दिसून आले. एकूण प्रशासन, राजकीय नेते आणि साखर कारखानदार असे सर्वजण ऊस प्रश्नावरून संभ्रमात असल्याचे चित्र आहे.

यंदा हंगामाच्या अखेरच्या टप्प्यात शिल्लक उसाचे गाळप करण्याचे मोठे आव्हान साखर कारखान्यांपुढे निर्माण झाले आहे. आजअखेर सुमारे ४० - ५० लाख टन ऊस शिल्लक असल्याचा दावा विविध शेतकरी संघटना करीत आहेत. मात्र, साखर आयुक्त कार्यालय फक्त २५ लाख टन ऊस शिल्लक असल्याचे सांगत आहे. २ मेअखेर राज्यात १११ कारखाने सुरू आहेत.

राज्यातील कारखान्यांनी एप्रिलअखेर १३३३ लाख क्विंटल साखर उत्पादन केले आहे. मराठवाडा विभागात शिल्लक उसाचा प्रश्न अधिक गंभीर झाल्याचा आरोप शेतकरी संघटना करीत आहेत. राज्यात आजअखेर सुमारे ४० लाख टन ऊस शिल्लक आहे. त्यात मराठवाड्यातील सर्वाधिक सुमारे ३० लाख टन उसाचा समावेश आहे.

> **“साखर आयुक्तालयाने ऊस तोडणीचे चांगले नियोजन केले आहे. आता फक्त मराठवाड्यातच ऊस शिल्लक आहे, १४० हार्वेस्टर तोडणी करीत आहेत. मागील वर्षाच्या तुलनेत ५ मेअखेर २३० लाख टन उसाचे अधिक गाळप केले आहे. सुमारे २५ लाख टन ऊस शिल्लक आहे.**
>
> **-शेखर गायकवाड,** साखर आयुक्त

**शिल्लक ऊस नेमका किती?**

भाजपच्या किसान मोर्चाच्या वतीने साखर आयुक्तालयासमोर आंदोलन करून निवेदन देण्यात आले. या निवेदनात राज्यात ५० लाख टन ऊस शिल्लक असल्याचा दावा केला आहे. खासदार उदयनराजे भोसले फक्त साताऱ्यात ५०० एकरावरील ऊस शिल्लक असल्याचे सांगत आहेत. स्वाभिमानीचे नेते कालिदास आपेट फक्त मराठवाड्यातच ४० लाख टन ऊस शिल्लक असल्याचा दावा करीत आहेत. राजू शेट्टी शिल्लक उसाचा नेमका आकडा सांगता येणार नाही, असे म्हणत आहेत. त्यामुळे राज्यात नेमका किती ऊस शिल्लक आहे, या बाबत संभ्रम आहे.

उसाला पाणी जास्त लागते. शिल्लक उसाचा प्रश्नही आहे, त्यामुळे उसाचे क्षेत्र कमी करून सोयाबीनचे क्षेत्र वाढवा, असे अजित पवार यांनी सांगितले. मात्र, लगेचच ऊस शेतकऱ्यांना शाश्वत, चांगले पैसे देणारे पीक आहे. इथेनॉल कारखाने काढले पाहिजेत, असेही ते म्हणाले. त्यामुळे उसाचा प्रश्न नेमका कसा हाताळायचा, या बाबतच संभ्रम असल्याचे दिसून येत आहे.

## मराठी विद्यापीठ स्थापनेसाठी अशासकीय तज्ज्ञ समितीची प्रतीक्षा

**नागपूर :** मराठी विद्यापीठ स्थापनेसाठी अशासकीय तज्ज्ञांची समिती आठ दिवसांत नियुक्त करण्याची घोषणा राज्य सरकारने केली होती, मात्र आठ महिने उलटूनही त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. याबाबत राज्य सरकार मूग गिळून बसले आहे, असा आरोप करीत समिती नियुक्तीची घोषणा तत्काळ करावी, अशी मागणी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी केली. समिती स्थापण्याचे काम कुठे अडले? याबाबत वारंवार पाठपुरावा करूनही काही कळवले जात नाही असा आरोप त्यांनी केला आहे.

अशासकीय तज्ज्ञांची समिती तातडीने नियुक्त करावी, अशी विनंती महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडीचे संयोजक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी शिक्षणमंत्री तसेच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र लिहून केली आहे.

## आदित्य ठाकरे १० जूनला अयोध्या दौऱ्यावर

**मुंबई:** हिंदुत्वावरून मनसे आणि शिवसेनेत सुरू झालेल्या कुरघोडीच्या राजकारणाने नवे वळण घेतले असून श्रीरामाचे दर्शन आणि आशीर्वाद घेण्यासाठी पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे १० जूनला अयोध्येला जाणार असल्याचे शिवसेना खासदार संजय राऊत यांनी रविवारी पत्रकारांशी बोलताना जाहीर केले. त्याच वेळी तिकडे अयोध्येत ‘असली आ रहा है नकली से सावधान’ अशा शब्दांत फलकबाजीतून आदित्य ठाकरेंच्या अयोध्या दौऱ्याची घोषणा करत मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्या ५ जूनच्या अयोध्या दौऱ्याला लक्ष्य करण्यात आले आहे.

‘हिंदुत्व’, ‘हनुमान चालीसा’ हे विषय हाती घेऊन मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी राजकीय भूमिकेची नवी भगवी शाल पांघरली आहे. त्यातील पुढचे पाऊल म्हणून राज ठाकरे यांचा ५ जूनला अयोध्या दौरा जाहीर झाला. त्यास उत्तर देण्यासाठी आदित्य ठाकरे यांचा अयोध्या दौरा जाहीर करण्यात आला आहे. आदित्य ठाकरे हे १० जूनला अयोध्या दौऱ्यावर जाणार आहेत. आमचा हा राजकीय दौरा नाही तर श्रीरामाचे दर्शन व आशीर्वाद घेण्यासाठी आदित्य ठाकरे जात आहेत, असे सांगत नाव न घेता राज ठाकरे यांचा अयोध्या दौरा राजकीय कारणांसाठी असल्याचे सूचित केले. तसेच अयोध्येमध्ये नकली भावनेतून जाणाऱ्याला रामलल्लाचा आशीर्वाद मिळत नाही, त्यांना विरोधच होणार अशी प्रतिक्रिया भाजपच्या नेत्याने राज ठाकरे यांच्या दौऱ्याला विरोध केल्याबाबतच्या प्रश्नावर दिली. अयोध्येत असली- नकलीबाबतचे फलक कोणी लावले माहिती नाही. उत्तर प्रदेशची जनता सुजाण आहे, असे विधानही राऊत यांनी केले.

## आंतरधर्मीय विवाहासाठी आलेल्या जोडप्यामुळे पांढरी येथे तणाव

### हाणामारीत युवक जखमी

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**अमरावती :** आंतरधर्मीय विवाहासाठी आलेल्या जोडप्याला काही लोकांच्या विरोधाचा सामना करावा लागल्याची घटना अंजनगाव सुर्जी तालुक्यातील पांढरी खानमपूर येथे घडली. अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यासमोर दोन गटात झालेल्या हाणामारीत एक युवक जखमी झाला आहे.

चांदूरबाजार तालुक्यातील दहिगाव पूर्णा येथील युवक मुंबईतील विरारमधील एका कंपनीमध्ये नोकरी करत होता. तिथे त्याची ओळख मुंबई येथील विरारमध्ये राहणाऱ्या त्याच कंपनीत काम करणाऱ्या मुस्लीमधर्मीय २० वर्षीय मुलीसोबत झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमामध्ये झाले आणि दोघांनी एकमेकांसोबत लग्न करण्याचा निर्णय घेतला.

मुलीने जेव्हा याबाबतीत आपल्या आई- वडिलांना सांगितले तेव्हा मुलीच्या आई- वडिलांनी मुलगा हा आपल्या जातीधर्माचा नसल्यामुळे विरोध दर्शवला. ही माहिती मुलीने युवकाला सांगितली तेव्हा दोघांनीही आई-वडिलांच्या विरोधाला न जुमानता विरोध झुगारून विरार येथून पांढरी (खानमपूर) येथील मुलाच्या मावशीकडे आले, मावशीच्या परिवाराला सर्व प्रकार सांगितला. त्यांना अगोदर लग्न करण्याच्या दृष्टीने पथ्रोट येथील आर्य समाज येथे नेले परंतु तिथे तांत्रिक अडचणींमुळे लग्न होऊ शकले नाही.

या घटनेची माहिती जेव्हा अंजनगाव सुर्जी येथील मुलीच्या समुदायाला कळली तेव्हा. दोन तीनशे नागरिकांच्या जमावाने पांढरी गाठली व त्यांनी मुलीवर सदर मुलासोबत लग्न न करण्यासाठी दबाव आणला, परंतु मुलगी तिच्या निर्णयावर ठाम असल्यामुळे या दबावाचा तिच्यावर कुठल्याच प्रकारचा परिणाम झाला नाही. तणाव वाढत असल्याने मुलाच्या नातेवाईकांनी अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्याला फोनद्वारे कळवले. पोलिसांनी गांभीर्य लक्षात घेता तत्काळ पांढरी गाठून दोघांनाही चौकशीसाठी पोलीस ठाण्यात आणले. त्याच दरम्यान दोन्ही गटात वाद निर्माण झाला. त्यात काही युवकांमध्ये हाणामारी झाली, त्यात पंकज रायबोले ऊर्फ दादू (२०) हा युवक जखमी झाला.

## राष्ट्रीय लोकअदालतीतून ४८३ कोटींचे तडजोड शुल्क वसूल

**मुंबई :** मुख्य महानगर दंडाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबईतील सगळ्या महानगर दंडाधिकाऱ्यांसमोर शनिवारी पार पडलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीत ४ अब्ज ८३ कोटी २५ लाख ३९ हजार आणि १२४.५५ रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

या राष्ट्रीय लोकअदालतीत ५ हजार ५५५ दावे निकाली काढण्यात आले. दंड आकारून निकाली काढण्यात येणाऱ्या फौजदारी प्रकरणांसह धनादेश न वटणे, देयक व तडजोड कायदा आणि अन्य कायद्याअंतर्गत दाखल प्रकरणांचा तडजोडीद्वारे निकाली काढण्यात आलेल्या दाव्यांमध्ये समावेश होता.

मुंबई उच्च न्यायालयाच्या राज्य विधि सेवा प्राधिकरणाचे सदस्य सचिव डी. पी. सुराणा, शहर दिवाणी व सत्र न्यायालयाच्या प्रधान न्यायाधीश व मुंबई जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष ऊर्मिला एस. जोशी-फाळके, मुंबईच्या मुख्य महानगर दंडाधिकारी सायली टी. दंडे, मुंबई जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाचे सचिव हितेंद्र वाणी तसेच मुंबईतील अतिरिक्त महानगर दंडाधिकारी, न्यायालयीन अधिकारी आणि कर्मचारी वर्गाच्या अथक प्रयत्नांतून ही राष्ट्रीय लोकअदालत यशस्वीरीत्या पार पडली.

## पोलिसांच्या किरकोळ रजावाढीचा प्रस्ताव प्रलंबित

**अनिल कांबळे, लोकसत्ता**

**नागपूर :** पोलिसांच्या किरकोळ रजावाढीचा प्रस्ताव अजूनही मंत्रालयात धूळ खात पडला आहे.

पोलीस विभाग सोडून अन्य शासकीय विभागातील कर्मचाऱ्यांना पाच दिवसांचा आठवडा असून सणासुदीलाही सुट्या असतात. दुसरीकडे राज्यातील कायदा व सुव्यवस्था सांभाळणाऱ्या पोलिसांना मात्र हक्काच्याही रजा मिळणे दुरापास्त झाले आहे. पोलिसांना १२ ऐवजी २० किरकोळ रजा (सीएल) मिळाव्या, अशी मागणी राज्यभरातील पोलिसांची होती. तत्कालीन पोलीस महासंचालक संजय पांडे यांनी फेसबुक लाईव्हद्वारे या मागणीची गांभीर्याने दखलही घेतली. त्यांनी लगेच २० किरकोळ रजावाढ प्रस्ताव तयार केला आणि गृहमंत्रालयाला पाठवला. विधिमंडळाच्या अधिवेशनात गृहराज्यमंत्री शंभूराज देसाई यांनीही पोलिसांच्या रजावाढीचे आश्वासन दिले आणि प्रस्ताव मंजूर करून लवकरच पोलिसांना किरकोळ रजावाढ देण्यात येईल, असे सांगितले होते. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून रजावाढीचा प्रस्ताव गृहमंत्रालयात धूळ खात पडला आहे.

गंभीर गुन्ह्यांचा किचकट तपास आणि नेहमीच्या व्हीआयपी बंदोबस्तामुळे पोलिसांवर कामाचा ताण असतो. अपुऱ्या मनुष्यबळामुळे तपास करण्यासाठीसुद्धा पोलिसांना तारेवरची कसरत करावी लागते. कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि मुलांच्या शिक्षणाकडेही दुर्लक्ष होते.

पोलीस कर्मचाऱ्यांना वर्षभरात ४५ अर्जित रजा आणि २२ वैद्यकीय रजा लागू असतात. यासोबतच त्यांना १२ किरकोळ रजाही मंजूर आहेत.

## रिक्त पदे भरायचीच नाहीत, तर न्यायाधिकरणे कशाला हवीत?

### केंद्र सरकारच्या उदासीन भूमिकेवर उच्च न्यायालयाचे ताशेरे

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** रिक्त पदे भरायचीच नाहीत तर न्यायाधिकरणे हवीत कशाला ? अशा शब्दांत विविध न्यायाधिकरणांतील रिक्त जागा भरण्याबाबतच्या केंद्र सरकारच्या उदासीन भूमिकेवर उच्च न्यायालयाने ताशेरे ओढले.

विविध न्यायाधिकरणांतील अधिकाऱ्यांच्या नियुक्तीत केंद्र सरकार दिरंगाई करत असल्याने याचिकाकर्त्यांची गैरसोय होत असल्याबद्दलही मुख्य न्यायमूर्ती दीपंकर दत्ता आणि न्यायमूर्ती वीरेंद्रसिंह बिश्त यांच्या खंडपीठाने नाराजी व्यक्त केली. न्यायाधिकरणांसाठी अधिकारी कोणी उपलब्ध करायचे ? अशी विचारणा करून याचिकाकर्त्यांची अवस्था पाहा. केंद्रीय औद्योगिक न्यायाधिकरणाची (सीजीआयटी) स्थिती ही कर्ज वसुली अपिलीय न्यायाधिकरणासारखीच (डीआरएटी) झाली आहे. एवढेच नव्हे, तर केंद्र सरकार रिक्त पदे भरण्यात अपयशी ठरल्यामुळे कायद्याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या उपाययोजना निष्फळ ठरत असल्याचे मुख्य न्यायमूर्तींनी सुनावले.

**काय झाले ?**

कॅनरा बँकेच्या १३१ कनिष्ठ श्रेणी कर्मचाऱ्यांचा बँकेशी केंद्रीय औद्योगिक न्यायाधिकरणात वाद सुरू आहे. त्यातच पाच कर्मचाऱ्यांना बँकेने कामावरून काढून टाकल्याने अन्य कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. मात्र न्यायाधिकरणातील अधिकाऱ्यांअभावी त्यांच्या प्रकरणावर सुनावणी होऊ शकलेली नाही. त्यामुळे हे प्रकरण उच्च न्यायालयात आले असून कर्मचाऱ्यांनी न्यायाधिकरणाचे कामकाज सुरू होईपर्यंत कर्मचाऱ्यांना कारवाईपासून दिलासा देण्याची मागणी केली आहे. या याचिकेवरील सुनावणीच्या विविध न्यायाधिकरणांतील रिक्त पदे भरण्याबाबत केंद्र सरकारच्या भूमिकेवर न्यायालयाने ताशेरे ओढले.

**फटका कर्मचाऱ्यांना नको**

ही रिक्त पदे भरण्याच्या प्रक्रियेतील प्रगतीची माहिती केंद्र सरकारतर्फे न्यायालयाला देण्यात आली. तसेच न्यायाधिकरणाचे काम सुरू होईपर्यंत या कर्मचाऱ्यांना अंतरिम दिलासा न देण्याचीही मागणी केली. मात्र रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया कूर्मगतीने सुरू असल्याचे सुनावून न्यायालयाने बँकेच्या कर्मचाऱ्यांना न्यायाधिकरणातील रिक्त पदे भरली जाईपर्यंत कारवाईपासून अंतरिम दिलासा दिला.

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
1972-2022
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
प्रस्तुत
लोकसत्ता मार्ग यशाचा २४




TJSB SB NexGen
A Multifaceted Savings Account
- Free Personal Accidental Insurance Cover of ₹ 2 lakhs
- Preferential ROI for Education loan, loan for purchase of laptops, tablets, mobiles, etc.
- Cashback offers on transaction through Rupay Debit Card

TJSB SAHAKARI BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED BANK
1972-2022
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
www.tjsbbank.co.in | Toll Free: 1800 223 466 / 1800 266 3466
*T&C Apply

# केंद्रिय विद्यापीठे—परीक्षा प्रक्रिया

**कॉमन युनिव्हर्सिटी** एन्ट्रान्स टेस्ट (अंडर ग्रॅज्युएट) सीयूईटीमधील भाग दोन साठी विषय सूची—अकाउंटन्सी/ बुक कीपिंग, अॅग्रिकल्चर, अँथ्रॉपॉलॉजी, बॉयलॉजी/ बॉयलॉजिकल सायंस/ बायोटेक्नॉलॉजी/ बायोकेमिस्ट्री, बिझिनेस स्टडीज, केमिस्ट्री, एन्व्हिरॉन्मेंटल सायंस, कॉम्प्युटर सायन्स/ इन्फॉर्मेटिक्स प्रॅक्टिसेस, इकॉनॉमिक्स/ बिझिनेस इकॉनॉमिक्स/ इंजिनीअरिंग ग्रॅफिक्स/ आंत्रप्रिन्युरशीप/ फाईन आर्टस्/ व्हिज्युएल आर्टस् (स्कल्पचर/ पेंटिग)/ कमर्शिअल आर्टस्/ जिऑग्रॅफी/जिऑलॉजी, हिस्ट्री, होमसायन्स, नॉलेज ट्रॅडिशन— प्रॅक्टिसेस इन इंडिया, लीगल स्टडीज, मास मीडिया/ मास कम्युनिकेशन, मॅथेमॅटिक्स, परफॉर्मिंग आर्टस् (डान्स—कथ्थक/ भरतनाट्यम/ कथकली/ ओडिसी/ कुचिपूडी/ मणिपुरी), ड्रामा (थिएटर), म्युझिक (जनरल/ हिंदुस्थानी/ कर्नाटकी/ रवींद्र/ परक्युशन/ नॉन परक्युशन), फिजिकल एज्युकेशन/ नॅशनल कॅडेट कॉरप्स, योग, फिजिक्स, पोलिटिकल सायंस, सायकॉलॉजी, संस्कृत, सोशिऑलॉजी, टीचिंग ॲप्टिट्यूड.

या विषयांचा अभ्यासक्रम नॅशनल टेस्टिंग एजंसीच्या (https://cuet.samarth.ac.in.) संकेस्थळावर ठेवण्यात आला आहे.

भाग तीन— सामान्य चाचणी— ७५ पैकी ६० प्रश्न सोडवावे लागतील. कालावधी— ६० मिनिटे. या भागाचे एकूण गुण ३०० असतील. प्रश्न बहुपर्यायी आणि वस्तुनिष्ठ पध्दतीचे असतील. यामध्ये सामान्य ज्ञान, चालू घडामोडी, सामान्य बौध्दिक क्षमता, संख्यात्मक क्षमता, तार्किक क्षमता (सर्व सामान्य गणिताची सूत्रे, संकल्पना आदींवर हे प्रश्न विचारले जातील.) विश्लेषणात्मक क्षमता.

ही परीक्षा संगणकाधारित (कॉम्प्युटर बेस्ड टेस्ट)असेल. ही परीक्षा दिवसातून दोन वेळा (स्लॉट) घेण्यात येईल. पहिल्या स्लॉटचा वेळ सकाळी साडे नऊते सव्वा बारा असा आहे. दुसऱ्या स्लॉटचा वेळ दुपारी तीन ते संध्याकाळी पाऊने सात असा आहे.

ही परीक्षा झाल्यावर तीन दिवसात cuet.samarth.ac.in या संकेतस्थळावर उत्तर पत्रिका प्रकाशित करण्यात येईल. त्याची जाहीर सूचना वृत्तपत्रे/ इतर माध्यमे यामध्ये प्रकाशित करण्यात येईल. या उत्तरांशी सुसंगत उत्तरे नसल्यास, संबंधित विद्यार्थी आपली तक्रार नोंदवू शकतो. तथापि त्यासाठी विद्यार्थ्यास शुल्क भरावे लागेल. ही उत्तर पत्रिका दोन ते तीन दिवस संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

**विद्यापीठे आणि अभ्यासक्रम (४)**

बनारस हिंदू विद्यपीठ — https://www.bhu.ac.in

अभ्यासक्रम— (१) बॅचलर ऑफ व्होकेशन इन (हॉस्पिटॅलिटी अॅण्ड टुरिझम मॅनेजमेंट/ रिटेल अॅण्ड लॉजिस्टिक्स मॅनेजमेंट/ अॅग्रीबिझिनेस आंत्रप्रिन्युरशीप/ कॉम्प्युटर अॅप्लिकेशन/ हॉस्पिटल अॅडमिनिस्ट्रेशन अॅण्ड मॅनेजमेंट/ बँकिंग, इंशुरन्स अॅण्ड रिटेलिंग/ कॅटरिंग टेक्नॉलॉजी अॅण्ड हॉटेल मॅनेजमेंट/ फॅशन टेक्नॉलॉजी अॅण्ड अॅपेरल डिझाइन/ मॉर्डन ऑफिस मॅनेजमेंट/ फूड प्रोसेसिंग अॅण्ड मॅनेजमेंट/ मेडिकल लॅब टेक्नॉलॉजी), (२) बॅचलर ऑफ परफॉर्मिंग आर्टस्— कथ्थक/ बॅचलर ऑफ परफॉर्मिंग आर्टस्— भरतनाट्यम/ बॅचलर ऑफ परफॉर्मिंग आर्टस् — फ्ल्युट/ बॅचलर ऑफ परफॉर्मिंग आर्टस्—व्हॉयोलिन/ बॅचलर ऑफ परफॉर्मिंग आर्टस् — सतार/ बॅचलर ऑफ परफॉर्मिंग आर्टस्—तबला/ बॅचलर ऑफ परफॉर्मिंग आर्टस् — उत्तर भारतीय शास्त्रीय संगीत. (३) बीटेक इन फूड टेक्नॉलॉजी/ डेअरी टेक्नॉलॉजी/ (४) बीए— एलएलबी.

**जवाहरलाल नेहरू विद्यापीठ** https://www.jnu.ac.in/main/

**अभ्यासक्रम**—(१) बी.एस्सी—एम.एस्सी इंटिग्रेटेड कोर्स इन आयुर्वेद बॉयलॉजी (२) बीए (ऑनर्स) इन (पर्शियन/ पाश्तो/ अरेबिक/ जॅपनीज/ कोरिअन/ चायनीज/ फ्रेंच/ रशियन/ जर्मन/ स्पॅनिश), (३) सर्टिफिकेट ऑफ प्रोफिशियन्सी इन (मंगोलियन/ भाषा इंडोनेशिया/ उर्दू /पाश्तो/ उजबेक/ हिब्रू/ संस्कृत कॉम्प्युटेशनल लिंग्विस्टिक्स/ पाली/ योग फिलॉसॉफी/ वेदिक कल्चर/ संस्कृत)

**पाँडिचेरी युनिव्हर्सिटी** https://www.pondiuni.edu.in/

**अभ्यासक्रम** — (१) इंटिग्रेटेड एम. एस्सी — अप्लाईड जिऑलॉजी, (२) इंटिग्रेटेड एम.एस्सी — केमिस्ट्री, (३) इंटिग्रेटेड एम.एस्सी—फिजिक्स, (४) इंटिग्रेटेड एम.एस्सी—मॅथेमॅटिक्स, (५) इंटिग्रेटेड एम.एस्सी — कॉम्प्युटर सायंस, (६) इंटिग्रेटेड एम.एस्सी—स्टॅटिस्टिक्स, (७) इंटिग्रेटेड बी.ए—एम.ए— हिस्ट्री, (८) इंटिग्रेटेड बी.ए—एम.ए— पोलिटिक सायंस, (९) इंटिग्रेटेड बी.ए—एम. ए— सोशिऑलॉजी, (१०) इंटिग्रेटेड बी.ए— एम.ए— सोशल अॅण्ड इकॉनॉमिक अॅडमिनिस्ट्रेशन अॅण्ड लॉ

डॉ.बी.आर आंबेडकर स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स— https://base.ac.in/

**अभ्यासक्रम**— इंटिग्रेटेड एम.एस्सी इकॉनॉमिक्स.

नॅशनल रेल अॅण्ड ट्रान्सपोर्टेशन इंस्टिट्यूट https://www.nrti.edu.in/

**अभ्यासक्रम** — (१) बीबीए इन ट्रान्सपोर्टेशन मॅनेजमेंट, (२) बी.एस्सी इन ट्रान्सपोर्टेशन टेक्नॉलॉजी

**डॉ.अब्दूल कलाम टेक्निकल युनिव्हर्सिटी** https://aktu.ac.in/

**अभ्यासक्रम**— (१) बीटेक अॅग्रिकल्चर, बीटेक बायोटेक्नॉलॉजी, (२) बीफार्मसी, (३) बॅचलर ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, (४) बॅचलर ऑफ फाइन आर्टस्, (५) बॅचलर ऑफ डिझाइन

**हैदराबाद युनिव्हर्सिटी** https://uohyd.ac.in/

**अभ्यासक्रम**— (१) इंटिग्रेटेड एम.एस्सी इन मॅथेमॅटिकल सायंस, इंटिग्रेटेड एम.एस्सी इन फिजिक्स, इंटिग्रेटेड एम.एस्सी इन केमिकल सायंस, इंटिग्रेटेड एम.एस्सी इन बॉयलॉजी, इंटिग्रेटेड एम.एस्सी इन अप्लाईड जिऑलॉजी , इंटिग्रेटेड मास्टर ऑफ ऑप्टोमेट्री, इंटिग्रेटेड एम.एस्सी इन पब्लिक हेल्थ, (२) इंटिग्रेटेड एम.ए इन लँग्वेज सायंस, इंटिग्रेटेड एम.ए इन इकॉनॉमिक्स, इंटिग्रेटेड एम.ए इन सोशल सायंस, इंटिग्रेटेड एम.ए इन पोलिटिकल सायंस, इंटिग्रेटेड एम.ए इन सोशिऑलॉजी, इंटिग्रेटेड एम.ए इन आंथ्रॉपॉलॉजी

**दिल्ली युनिव्हसिटी** http://du.ac.in/

**अभ्यासक्रम** — (१) बॅचलर ऑफ बिझिनेस इकॉनॉमिक्स, (२) बीबीए इन फायनांशिअल इंव्हेस्टमेंट ॲनॅलिसीस, (३) बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, (४) बीए (ऑनर्स) इन हिंदुस्थानी म्युझिक (तबला/ पखवाज), (५) बीए (ऑनर्स) इन हिंदुस्थानी म्युझिक— वोकल/ इंस्ट्रुमेंटल (सतार/ सरोद/ गिटार/ व्हायोलिन/ संतूर), (६) बॅचलर ऑफ व्होकेशन इन (सॉफ्टवेअर डेव्हलमेंट/ वेब डिझायनिंग/ बँकिंग ऑपरेशन्स/ रिटेल मॅनेजमेंट अॅण्ड आयटी/ हेल्थ केअर मॅनेजमेंट/ प्रिटिंग टेक्नॉलॉजी), (७) फाईव्ह इअर इंटिग्रेटेड प्रोग्रॅम इन जर्न्यालिझम — इंग्रजी/ हिंदी, (८) बीए ऑनर्स इन मल्टी मीडिया अॅण्ड मास कम्युनिकेशन, (९) बीए (ऑनर्स) इन स्पॅनिश/ इटालियन/ जर्मन/ फ्रेंच/ पर्शियन/ अरेबिक/ उर्दू/ बेंगाली/ पंजाबी/ हिंदी/ संस्कृत, (१०) बीटेक इन इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अॅण्ड मॅथेमॅटिकल इनोव्हेशन

**बेन्नेट युनिव्हर्सिटी** https://www.bennett.edu.in/

**अभ्यासक्रम**— (१) बीटेक इन कॉम्पुटर सायंस इंजिनीअरिंग, (२) बीटेक इन इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड कॉम्प्युटिंग, (३) बीटेक इन इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड कॉम्युनिकेशन इंजिनीअरिंग, (४) बीटेक इन इंजिनीअरिंग फिजिक्स, (५) बीटेक इन मेकॅनिकल इंजिनीअरिंग, (६) बीटेक इन बायोटेक्नॉलॉजी, (७) इंटिग्रेटेड बीटेक—एमटेक इन बायोटेक्नॉलॉजी, (८) बीबीए, (९) बीए— एलएलबी, (१०) बीबीए—एलएलबी (ऑनर्स), (११) बीए— जर्न्यालिझम अॅण्ड मास कम्युनिकेशन—इंग्लिश, (१२) बीए— जर्न्यालिझम अॅण्ड मास कम्युनिकेशन— हिंदी, (१३) बीए—फिल्म, टीव्ही, वेब सिरीज, (१४) बॅचलर ऑफ कॉम्प्युटर अॅप्लिकेशन, (१५) बीए— लिबरल स्टडीज, (१६) बीएस्सी (ऑनर्स) कॉम्प्युटिंग, (१७) बीएस्सी (ऑनर्स) फिजिक्स

**सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ गुजरात** https://www.cug.ac.in/

**अभ्यासक्रम**— (१) इंटिग्रेटेड ड्युएल डिग्री बीए — एमए इन सोशल सायंस, (२) बीए (आनर्स) इन— चायनिज, बीए (आनर्स) इन — जर्मन स्टडीज

**डॉ हरीसिंघ गौर विद्यापीठ** http://www.dhsgsu.ac.in

अभ्यासक्रम— (१) बीए, (२) बीए—बीएड, (३) बीएफए, (४) बीएस्सी —बीएड (मॅथ), (५) बीबीए, (६) बीए— एलएलबी, (७) बी.फार्मसी, (८) बॅचलर ऑफ कॉम्प्युटर अॅप्लिकेशन

**गुरु घसिदास विद्यापीठ** https://www.ggu.ac.in/

**अभ्यासक्रम**— (१) बॅचलर ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स इन (अ) कथ्थक/ भरतनाट्यम/ कथकली/ ओडिसी, (ब) ड्रामा— थिएटर, (क) म्युझिक— हिंदुस्थानी/ कर्नाटकी/ रवींद्र संगीत/ पर्क्युसन/ नॉन पर्क्युसन, (२) बीएस्सी इन — (डेअरी टेक्नॉलॉजी/ ऑर्ग्यानिक फार्मिंग), (३) बीए—एलएलबी, (४) बीकॉम— एलएलबी, (५) बॅचलर ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, (६) बॅचलर ऑफ कॉम्प्युटर अॅप्लिकेशन, (७) बी.फॉर्म, (८) बीएस्सी— फॉरेस्ट्री, (९) बी.एस्सी (ऑनर्स) — फॉरेंसिक सायंस/रुरल टेक्नॉलॉजी/ झुऑलॉजी/ फिजिक्स/ मॅथेमॅटिक्स/ इलेक्ट्रॉनिक्स/ कॉम्प्युटर सायंस/ बॉटनी/ केमिस्ट्री/ बायोटेक्नॉलॉजी/ अँथ्रॉपॉलॉजी/ पोलिटिकल सायंस/ जर्न्यालिझम अॅण्ड मास कम्युनिकेशन/ हिस्ट्री/ हिंदी/ इंग्रजी/ इकॉनॉमिक्स

द इंग्लिश अॅण्ड फॉरेन लँग्वेज युनिव्हर्सिटी https://www.efluniversity.ac.in

**अभ्यासक्रम**— (१) बीए (ऑनर्स/ रिसर्च) — जर्न्यालिझम अॅण्ड मास कम्युनिकेशन, (२) बीए (ऑनर्स/ रिसर्च) — इंग्लिश, (३) बीए (ऑनर्स/ रिसर्च)—अरेबिक, (४) बीए (ऑनर्स/ रिसर्च) —चायनीज, (५) बीए (ऑनर्स/ रिसर्च) — फ्रेंच, (६) बीए (ऑनर्स/ रिसर्च) — जर्मन, (७) बीए (ऑनर्स/ रिसर्च) — जॅपनीज, (८) बीए (ऑनर्स/ रिसर्च)—कोरिअन , (९) बीए (ऑनर्स/रिसर्च)— पर्शियन, (१०) बीए (ऑनर्स/रिसर्च) — रशियन, (११) बीए (ऑनर्स/रिसर्च)— स्पॅनिश, (१२) बीए (ऑनर्स/रिसर्च) — डिजिटल कम्युनिकेशन, (१३) बीए (ऑनर्स/रिसर्च)— परफॉर्मन्स आर्टस्, ह्युमॅनिटी, (१४) बीए (ऑनर्स/रिसर्च)— इटालियन.

**- सुरेश वांदिले**

## मोटार दरीत कोसळून ५ ठार

पीटीआय, न्यू टिहरी

**हृषीकेश- बद्रीनाथ** महामार्गावरील तोताघाटीनजीक रविवारी सकाळी एक मोटार खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातात, स्वतःच्या लग्नासाठी खरेदी करून परतणाऱ्या एका तरुणीसह पाच जण ठार झाले.

ही मोटार हृषीकेशहून चमोलीला जात असताना सकाळी ७ वाजताच्या सुमारास हा अपघात झाला. चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे मोटार अडीचशे मीटर खोल दरीत जाऊन कोसळली आणि आत बसलेले पाचही जण जागीच ठार झाले. यापैकी एक मृतदेह हाती लागला आहे, अशी माहिती देवप्रयागचे ठाणेदार देवराज शर्मा यांनी दिली.

पिंकी (२५), प्रताप सिंह (४०) व त्यांची पत्नी भागीरथी (३६), तसेच त्यांची दोन मुले विजय (१५), मंजू (१२) अशी मृतांची नावे असून ते सर्व बान खेड्याचे रहिवासी होते. पिंकीचे लग्न १२ मे रोजी होणार होते. त्यासाठी खरेदी करून हे कुटुंबीय घरी परतत होते.

## राजस्थानात ८ कोटी रुपयांची चांदी जप्त

**जयपूर :** राजस्थानच्या उदयपूर जिल्ह्यात पोलिसांनी विटा व दागिन्यांच्या स्वरूपातील आठ कोटी रुपये किंमतीची १२०० किलोग्रॅमहून अधिक वजनाची चांदी जप्त केल्या आहेत.

याबाबत गुप्त माहिती मिळाल्यानंतर, पोलिसांच्या एका पथकाने शुक्रवारी रात्री अहमदाबादहून आग्र्याला जाणारी एक खासगी बस अडवली आणि आत शोध घेतल्यानंतर चांदीच्या विटा व दागिने जप्त केले, असे अधिकाऱ्यांनी रविवारी सांगितले.

या मौल्यवान वस्तूंबाबत बसचा चालक समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही.

## दिनदर्शिका

**सोमवार, ९ मे २०२२**
भारतीय सौर वैशाख १९ शके १९४४
मिती वैशाख शुक्लपक्ष अष्टमी : १८ : ३३ पर्यंत.
नक्षत्र : आश्लेषा १७ : ०८ पर्यंत
चंद्र : कर्क १७ : ०८ पर्यंत

- **मेष** - थोरांची कृपा राहील.
- **वृषभ** - धाडसी निर्णय घ्याल.
- **मिथुन** - कुटुंब साथ देईल.
- **कर्क** - मनोबल वाढेल.
- **सिंह** - स्वास्थ्य जपा.
- **कन्या** - नवी कंत्राटे मिळतील.
- **तूळ** - नोकरीत अनुकूलता.
- **वृश्चिक** - धनलाभाचा दिन.
- **धनू** - आहारावर नियंत्रण ठेवा.
- **मकर** - भावनांचा आदर करा.
- **कुंभ** - आळस करणे टाळा.
- **मीन** - संततीची गोड बातमी.

**शुभ राशी - कन्या, वृश्चिक**

## नेटक्लिप्स




व्हिडीओ बघण्यासाठी वरील क्यूआर कोड स्कॅन करा..

• दृश्य कथा • दैनिक ब्रीफिंग
• वाचनीय लेख • बातम्यांचा अनुभव

लो लोकसत्ता.COM

- या गणपतीला मातीचा गणपती म्हणून का ओळखलं जातं?- गोष्ट पुण्याची : भाग ३७
- जाणून घ्या : काय आहे आदित्य ठाकरे यांचा ड्रीम प्रोजेक्ट

## वाचकांची पसंती

- 'असली आ रहा रहा है, नकली से सावधान', अयोध्येत शिवसेनेची पोस्टरबाजी, राज ठाकरेंवर निशाणा
- 'राज्यात धार्मिक स्थळांवरून उतरवलेले भोंगे पुन्हा लावण्याची हिंमत...'; योगींचा इशारा
- 'असनी' चक्रीवादळ बंगालच्या उपसागरात दाखल; हवामान खात्याचा सतर्कतेचा इशारा
- 'बँक कोणाच्या बापाच्या घरची नाही, त्यामुळे...', सदावर्तेंची एसटी बँक निवडणुकीबाबत मोठी घोषणा

**वैद्यकीय अभ्यासक्रमातील लैंगिक क्रियांचे वर्गीकरण**

# 'अनैसर्गिक' शब्द बाद

## राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचा निर्णय

लोकसत्ता प्रतिनिधी

**वर्धा :** आधुनिक वैद्यकीय अभ्यासक्रमातील लैंगिक क्रियांच्या वर्गीकरणातून 'अनैसर्गिक' हा शब्द बाद करण्याचा निर्णय राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने घेतला आहे. सेवाग्रामचे डॉ. इंद्रजीत खांडेकर यांच्यासह इतर चार तज्ज्ञांच्या समितीने शिफारस केल्यानंतर आयोगाने हा निर्णय घेतला. 'एमबीबीएस'च्या न्याय वैद्यकशास्त्र या विषयातील गुदासंभोग (सोडोमी), मुखमैथुन यासारख्या लैंगिक क्रियांच्या वर्गीकरणात आता अनैसर्गिक शब्दाचा उपयोग करता येणार नाही.



**"सोडोमी ही पूर्णपणे नैसर्गिक स्थिती आहे. ती मानवी लैंगिकतेचा नैसर्गिक व सामान्य प्रकार असल्याचे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयानेसुद्धा नोंदवले आहे. म्हणूनच स्वेच्छेने व संमतीने होणाऱ्या लैंगिक (गुदा, मुखमैथुन) क्रिया यांना वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या अनैसर्गिक वर्गीकरणातून बाद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.** - डॉ. इंद्रजीत खांडेकर

### समितीचा निष्कर्ष काय?

समितीच्या मते, कुठलीही लैंगिक क्रिया व्यक्तीला व जोडीदाराला अनुकूल असेल तर ती क्रिया हानीकारक किंवा अनैसर्गिक नाही, अशी वैद्यकीय भूमिका आहे. तरीही दुर्दैवाने पारंपरिक लैंगिक संभोगाव्यतिरिक्त वापरल्या जाणाऱ्या इतर लैंगिक क्रियांना अनैसर्गिक संबोधले जाते. योनीद्वारे होणारा संभोग किंवा इतर कुठल्याही लैंगिक क्रियेमुळे जर जोडीदाराला त्रास होत असेल तर ती क्रिया अपायकारक समजली जाते. तसेच ती क्रिया बळजबरीने किंवा अल्पवयीन मुलांमुलीसोबत केली जात असेल तरच ती हानीकारक, असामान्य, आरोग्यास अपायकारक आहे, असे मानले जाते.

वैद्यकीय अभ्यासक्रमात फक्त योनीद्वारे होणाऱ्या संभोगाला नैसर्गिक व इतर लैंगिक क्रियांना अनैसर्गिक संबोधले जात होते. आता यापुढे असे वर्गीकरण करता येणार नाही. वैद्यकीय अभ्यासक्रमातील 'एलजीबीटी' समुदायाबाबतच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी मद्रास उच्च न्यायालयाने निर्देश दिले होते. वैद्यक आयोगाच्या वैद्यकीय शिक्षण मंडळाच्या अध्यक्ष अरुणा वाणीकर यांनी त्या अनुषंगाने एक तज्ज्ञ समिती स्थापन केली होती. यात डॉ. इंद्रजीत खांडेकर, डॉ. विजेंद्रकुमार (दिल्ली), डॉ. प्रभा चंद्रा (बंगळूरू) व डॉ. सुरेखा किशोर (गोरखपूर) या तज्ज्ञांचा समावेश होता. या समितीने 'अनैसर्गिक'बाबतचा आपला अहवाल दिला आहे.



# बद्रीनाथ मंदिर भाविकांसाठी खुले

पीटीआय, बद्रीनाथ

**वैदिक मंत्रोच्चाराच्या** घोषात आणि पारंपरिक धार्मिक विधींच्या साथीने बद्रीनाथ मंदिराची कवाडे रविवारी सकाळी सव्वासहा वाजता भाविकांसाठी उघडण्यात आली.

भगवान विष्णूचे हे मंदिर उघडण्याचा समारंभ पाहण्यासाठी देश-विदेशातील हजारो भाविक उपस्थित होते. मुख्य पुजारी ईश्वरीप्रसाद नंबुद्री यांनी धार्मिक विधी केले, तर वेदपाठींनी स्तोत्रे म्हटली. या प्रसंगासाठी मंदिर व त्याचा परिसर झेंडूच्या फुलांनी सुशोभित करण्यात आला होता.

चारधाम यात्रेतील इतर तीन मंदिरे भाविकांसाठी यापूर्वीच खुली झाली आहेत. बद्रीनाथ मंदिराची दारे उघडल्यामुळे चारधाम यात्रा पूर्णपणे सुरू झाली आहे. गंगोत्री व यमुनोत्री ३ मे रोजी, तर केदारनाथ मंदिर ६ मे रोजी खुले झाले होते.

गेली दोन वर्षे करोना महासाथीचा चारधाम यात्रेला फटका बसल्यामुळे भाविकांसाठी मंदिराची दारे उघडण्यास मोठा विलंब झाला होता. हा विलंब आणि करोनामुळे भाविकांवर लादण्यात आलेले निर्बंध यामुळे मंदिरात येणाऱ्या भाविकांची संख्या रोडावली होती.

दोन वर्षांच्या खंडानंतर ही यात्रा करोनाविषयक निर्बंधांशिवाय होत असून यात्रेकरू उत्साहात आहेत. मंदिरात प्रार्थना करण्याची आपली पाळी येण्याची वाट पाहात भाविकांनी शनिवारी उशिरा रात्रीच रांगेत उभे राहण्यास सुरुवात केली होती.

# रशियाच्या बॉम्बहल्ल्यात १२ पेक्षा जास्त नागरिक ठार झाल्याची भीती

## युक्रेनमधील शाळा उद्ध्वस्त, ढिगाऱ्याखाली ६० नागरिक अडकले

एपी, झापोरिझिया (युक्रेन)

**रशियाने युक्रेनमध्ये** केलेल्या बॉम्बहल्ल्यात १२ पेक्षा जास्त नागरिक मारले गेल्याची भीती आहे. येथील बिलोहोरिव्हका या गावातील एका शाळेच्या तळघरात ९० नागरिकांनी आश्रय घेतला होता. तेथे हा हल्ला झाला.

रशियाचे सैन्य पूर्व आणि दक्षिण युक्रेनच्या खेड्यांत, गावे व शहरांवर बॉम्बहल्ले करत आहे. युक्रेनच्या औद्योगिक परिसरापैकी एक असलेल्या लुहान्स्क भागाचे गव्हर्नर सेर्ही हैदेई म्हणाले, की बिलोहोरिव्हका या गावातील एका शाळेवर शनिवारी झालेल्या बॉम्बहल्ल्यामुळे तेथे आग लागली. त्या ठिकाणी मदत पथकाला दोन मृतदेह सापडले. त्यांनी ३० नागरिकांची सुटका केली.

या शाळेच्या ढिगाऱ्याखाली ६० जण अडकले असावेत. त्यांचा मृत्यू झाल्याची भीती हैदेई यांनी टेलिग्रामवर व्यक्त केली. प्रिव्हिलिया गावात बॉम्बहल्ल्यात ११ आणि १४ वर्षीय दोन मुले ठार झाली. युक्रेनची राजधानी कीव्हचा ताबा घेण्यात अपयश येत असल्याने डोन्बास परिसरावर रशियाच्या सैन्याने लक्ष केंद्रित केले आहे. येथे २०१४ पासून रशियाचा पाठिंबा असलेले फुटीरतावादी कारवाया करत आहेत. त्यांनी काही प्रदेशही ताब्यात घेतला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या या सर्वांत भीषण युरोपीयन युद्धात दोन्ही बाजूंचे मोठे नुकसान होत आहे. युक्रेनच्या लष्कराने अनपेक्षितरीत्या प्रभावी बचावतंत्र अवलंबल्याने हे युद्ध लांबले आहे. मात्र, या युद्धात आपल्याला यश येत आहे, हे सोमवारी विजयदिनी



दाखवण्यासाठी रशिया मारिओपोल बंदरावर संपूर्ण ताबा मिळवण्याची घाई करत आहे. मारिओपोल शहरातील पोलाद प्रकल्पात आश्रय घेतलेल्या उर्वरित महिला, मुले, ज्येष्ठ नागरिकांची शनिवारी मुक्तता करण्यात आली. या प्रकल्पात असलेल्या युक्रेनच्या पथकांनी शरण येण्यास नकार देत आंतरराष्ट्रीय मदत मागितली आहे. मारिओपोलवरील संपूर्ण ताब्यानंतर रशियाला युक्रेनच्या पूर्वी ताब्यात घेतलेल्या क्रिमियाच्या द्वीपकल्पाशी जमिनीवरून थेट संपर्क करणे सोपे जाणार आहे.

## मोदी हे हिटलरचे अनुकरण करतात - संजय राऊत

**मुंबई :** आपला प्रचार, विरोधकांबाबत अपप्रचार करण्यासाठी वारंवार रेटून बोलण्याची हिटलरनीती केंद्रातील भाजप



सरकारने अवलंबलेली आहे. ज्या प्रकारचे कार्यक्रम (इव्हेंट) हिटलर करायचा, त्याच प्रकारचे कार्यक्रम आता पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत, असा टोला शिवसेना खासदार संजय राऊत यांनी लगावला आहे. शिवसैनिकांच्या सोशल मीडिया सेलचा मेळावा मुंबईत पार पडला, त्यात ते बोलत होते. शिवसेनेशिवाय सोशल मीडिया पुढे जाऊ शकत नाही. बाळासाहेब आमचे फेस होते, त्या वेळी सोशल मीडिया कुठे होती? हिटलर सगळ्यांना प्रिय होता, बाळासाहेबांनादेखील आवडायचा. आता पंतप्रधानांनाही हिटलर आवडतो. मोदी हिटलरचे अनुकरण करतात. ज्या प्रकारचे कार्यक्रम हिटलर करायचा त्याच प्रकारचे कार्यक्रम मोदी करत आहेत, असे म्हणत मी टीका करत नाही, अशी पुस्तीही त्यांनी जोडली.

# जॉन ली यांची हाँगकाँगच्या नेतेपदी निवड

एपी, हाँगकाँग

**हाँगकाँगमधील लोकशाहीवादी** चळवळ दडपून टाकण्यासाठी प्रयत्न करणारे कट्टरवादी सुरक्षा प्रमुख जॉन ली यांची रविवारी प्रामुख्याने चीनधार्जिण्या समितीने केलेल्या मतदानात शहराचा यापुढील नेता म्हणून निवड करण्यात आली.

या निवडणुकीतील एकमेव उमेदवार असलेल्या ली यांनी झालेल्या मतदानापैकी ९९ टक्क्यांहून अधिक मते मिळवून ही निवडणूक जिंकली. मतदार असलेल्या सर्व, म्हणजे १५०० समिती सदस्यांची बीजिंगमधील मध्यवर्ती सरकारने काळजीपूर्वक छाननी केली होती.

ली हे १ जुलै रोजी सध्याच्या नेत्या कॅरी लाम यांची जागा घेतील. लाम यांची पाच वर्षांची कारकीर्द




त्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी प्रचंड लोकशाहीवादी निदर्शने, जवळजवळ संपूर्ण मतभेद मोडून काढणारी दडपशाही, आरोग्य यंत्रणा कोलमडून टाकणारी अलीकडची करोना लाट यांनी गाजली. यामुळे, पाश्चिमात्य धर्तीचे स्वातंत्र्य असलेला आंतरराष्ट्रीय बिझिनेस हब म्हणून असलेली हाँगकाँगची प्रतिष्ठा डागाळली होती.

लाम यांनी एका निवेदनाद्वारे ली यांचे अभिनंदन केले आणि आपण निवडणुकीचा निकाल चीनला सादर करू असे सांगितले.

केवळ चीनशी एकनिष्ठ असलेले 'देशभक्त' निवडून येऊ शकतील याची खात्री करण्यासाठी या निवडणुकीपूर्वी हाँगकाँगच्या मतदान कायद्यांमध्ये गेल्या वर्षी मोठे बदल करण्यात आले होते.

# राणा दाम्पत्याबाबत राज्य सरकारने क्रौर्याच्या सर्व मर्यादा ओलांडल्या

## देवेंद्र फडणवीस यांची टीका

लोकसत्ता प्रतिनिधी

**नागपूर :** अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांना राज्य सरकारने ज्या पद्धतीने वागणूक दिली ती अतिशय गंभीर आहे. गुन्हेगारांनादेखील अशी वागणूक दिली जात नाही. राणा दाम्पत्याबाबत राज्य सरकारने कौर्याच्या सर्व मर्यादा ओलांडल्या, अशी टीका विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांनी केली.

फडणवीस नागपुरात आले असता प्रसारमाध्यमांशी बोलत होते. फडणवीस यांनी शनिवारी रात्री



रुग्णालयात जाऊन नवनीत राणा यांची भेट घेतली. राणा यांची प्रकृती आता स्थिर होत आहे. मात्र त्यांना गेल्या १४ दिवसांत राज्य सरकारने पोलिसांच्या माध्यमातून जी वागणूक दिली, ती गंभीर आहे. एका गुन्हेगारालाही अशी वागणूक दिली जात नाही, असे फडणवीस म्हणाले. दरम्यान, येत्या १४ तारखेला सर्वांचे 'मास्क' काढणार असल्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी जाहीर केले आहे. याबाबत विचारले असता, मुख्यमंत्री 'मास्क' काढणार असतील तर ते चांगलेच आहे, अशी कोटी फडणवीसांनी केली.

# साहित्य संस्थांचा आर्थिक गाडा रुळावर

*(पान १ वरून)* नाहीत. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद, मुंबई मराठी साहित्य संघ, मराठवाडा साहित्य परिषद आणि विदर्भ साहित्य संघ या पाच संस्थांसह कोकण मराठी साहित्य परिषद आणि कोल्हापूर येथील दक्षिण महाराष्ट्र साहित्य परिषद अशा सात साहित्य संस्थांना राज्य शासनातर्फे गेल्या वर्षी केवळ एक लाख रुपयांचे अनुदान प्राप्त झाले होते. मात्र, या वर्षी तीन टप्प्यांमध्ये मिळून दहा लाख रुपयांचे अनुदान मिळाल्यामुळे संस्थाचालकांवरील आर्थिक भार हलका होण्यास मदत झाली आहे.

राज्यातील सात साहित्य संस्थांना यापूर्वी वार्षिक पाच लाख रुपयांचे अनुदान दिले जात होते. बडोदा येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये साहित्य संस्थांच्या अनुदानामध्ये दुपटीने वाढ करण्याची घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. त्यानुसार गेल्या वर्षी प्रत्येकी दहा लाख रुपयांचे अनुदान प्राप्त झाले होते.

मात्र, लगेच दुसऱ्या वर्षी करोनामुळे अनुदानाच्या रकमेपैकी केवळ दहा टक्के रक्कम संस्थांना मिळाली होती. त्यामुळे संस्थांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागले होते. मात्र, आता अनुदानाची रक्कम प्राप्त झाल्यामुळे संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना खर्च करण्याचे बळ प्राप्त झाले आहे.

**"शासनाकडून तीन टप्प्यांमध्ये अनुदानाची रक्कम प्राप्त झाली. शेवटच्या टप्प्यामध्ये पाच लाख रुपयांचा धनादेश मिळाला.संस्थेच्या दैनंदिन खर्चासाठी २५ टक्के, साहित्यिक कार्यक्रम, ग्रंथालय आणि विभागीय साहित्य संमेलन यासाठी उर्वरित ७५ टक्क्यांचा निधी वापरावा, असे शासनाचे निकष आहेत. त्यानुसार निधीचा विनियोग केला जात आहे.**
- कौतिकराव ठाले पाटील, अध्यक्ष, मराठवाडा साहित्य परिषद

# कर्नाटक : १ हजार मंदिरांत पहाटे 'हनुमान चालीसा'

पीटीआय, मंड्या

**कर्नाटकातील १ हजाराहून** अधिक मंदिरांमध्ये ९ मेपासून सकाळी ५ वाजता हनुमान चालीसा किंवा ओंकार किंवा भक्तिगीते वाजवली जातील, असे श्री राम सेनेचे प्रमुख प्रमोद मुतालिक यांनी रविवारी सांगितले. मशिदींवर लावलेल्या भोंग्यांविरुद्ध कारवाई करण्यात राज्य सरकार अपयशी ठरल्याचा आरोपही त्यांनी केला.

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी त्यांच्या राज्यात धार्मिक स्थळांवरील बेकायदेशीर भोंग्यांविरुद्ध कारवाई केली आणि इतर ठिकाणच्या भोंग्यांचा आवाज कमी करायला लावला, त्याप्रमाणे 'हिंमत दाखवण्याचे' आवाहन मुतालिक यांनी मुख्यमंत्री बसवराज बोम्मई व गृहमंत्री अरग ज्ञानेंद्र यांना केले.

'कर्नाटकभरात आम्ही १ हजाराहून अधिक मंदिरांशी संपर्क केला आहे. उद्यापासून (सोमवार) सकाळी ५ वाजता हनुमान चालीसा किंवा ओंकार किंवा भक्तिगीते वाजवण्याचे मंदिराचे पुजारी, धर्माधीश आणि व्यवस्थापन समित्यांनी मान्य केले आहे. हा प्रतिसाद अतिशय चांगला आहे', असे मुतालिक म्हणाले.

## शब्दकोडे- ७२३



**आडवी विधाने :**
(१) हवा नाकावाटे आत घेणे व सोडणे (५) एक सुगंधी द्रव्य
(७) अडचण, गरज (८) खिडकीची काच वा काचेची खिडकी
(९) समेट, समझोता (११) एका वनस्पतीचे नाव (१३) वाचा, बोल
(१५) कलाबतू (१६) रेव, रेती (१७) आग, भडका
(१८) गवताची काडी (२०) पालट, फेर
(२१) पांढरे केस काळे दिसावेत म्हणून डोक्याला लावतात तो रंग
(२२) ढचकळी, डकार (२३) शेंगेचे कवच, साल
(२८) मुकुट, किरीट (३०) हिमतुषार (३१) फुलांचे आगर; वसंत ऋतू
(३४) अपमान, मानखंडना (३६) लाजाळू, नम्र
(३७) पशू, श्वापद

**उभी विधाने :**
(१) कुत्रा (२) नशिबाची परीक्षा, लॉटरी (३) पृथ्वीभोवतालचे वायूचे वेष्टन
(४) वेळ, फुरसत (५) मायाळू, दयाळू (६) चाल, पद्धत
(१०) समुद्रमंथनातून निघालेले भयंकर विष (१२) चित्रपट ज्यावर दाखवला जातो तो शुभ्र पडदा (१४) आक्षेप, प्रतिबंध,मज्जाव (१६) लहान गाव
(१७) जिना, पायरी (१९) सोन्या चांदीचा व्यवहार करणारा (२०) अज, बोकड
(२४) धोबी, परीट (२५) वेल, वल्लरी (२६) लोणी (२७) वसूल करण्याची क्रिया, जमा (२९) गर्दी, समुदाय, समूह (३०) दश (३१) नांगराचा लोखंडी फाळ; लहान पहार (३२) आदर, गळ्यामागील भाग
(३३) धुळीचा कण, रेणू (३५) प्राण्यांतील पुरुष जात

**- सरोज ताठरे**

## सुडोकू - ७२३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | | | | | | | | ६ |
| | | ९ | ७ | १ | | | | |
| | | | | ८ | ६ | | ५ | |
| | | ८ | २ | | ९ | | ३ | |
| | ३ | ४ | | | | ५ | २ | |
| | २ | | ४ | | १ | ८ | | |
| | ६ | | ५ | ९ | | | | |
| | | | | ६ | ३ | ७ | | |
| ४ | | | | | | | | ५ |

## सुडोकू - ७२२चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ८ | ४ | २ | १ | ३ | ७ | ५ | ९ |
| २ | ५ | ३ | ४ | ९ | ७ | ६ | १ | ८ |
| ९ | १ | ७ | ५ | ८ | ६ | ४ | २ | ३ |
| १ | ७ | ५ | ६ | २ | ८ | ९ | ३ | ४ |
| ३ | ९ | ६ | १ | ५ | ४ | ८ | ७ | २ |
| ४ | २ | ८ | ३ | ७ | ९ | ५ | ६ | १ |
| ५ | ३ | ९ | ७ | ४ | २ | १ | ८ | ६ |
| ८ | ६ | १ | ९ | ३ | ५ | २ | ४ | ७ |
| ७ | ४ | २ | ८ | ६ | १ | ३ | ९ | ५ |

## शब्दकोडे - ७२२चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स | ना | ग | र | | म | ख | ला | शी | |
| प | द | र | | क | द | र | | त | र्क |
| शे | | ग | ल | ब | त | | क | ल | |
| ल | ग | ट | | रा | | ना | ल | | त |
| | हि | | गा | | उ | दा | ह | र | ण |
| अ | व | हे | ल | ना | | र | | क | स |
| च | र | क | | व | क्र | | द | म | डी |
| ल | | ट | स | र | | क | र | पा | |
| | ता | | का | स | रा | | व | त | न |
| अ | जा | ग | ळ | | वा | चा | ळ | | क्र |

## लोकमानस

loksatta@expressindia.com

### आमच्या भवितव्याला जबाबदार कोण?

**'एमपीएससीकडून आठ** प्रश्न रद्द' (वृत्त ८ मे) हा काही पहिल्यांदा घडलेला प्रकार नाही. करोनाकाळानंतर आयोगामार्फत ज्या परीक्षा घेण्यात आल्या त्या सर्व परीक्षांत हेच घडले. राज्यसेवा पूर्वपरीक्षा २०२० मध्ये चार प्रश्न रद्द, राज्यसेवा पूर्वपरीक्षा २०२१ मध्ये आठ प्रश्न रद्द, राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२० मध्ये २३ प्रश्न रद्द, संयुक्त गट ब पूर्वपरीक्षा २०२० मध्ये पाच प्रश्न रद्द, एएमव्हीआय मुख्य परीक्षा २०२० मध्ये पाच प्रश्न रद्द, स्थापत्य अभियांत्रिकी मुख्य परीक्षा सात प्रश्न रद्द आणि आता संयुक्त गट ब पूर्वपरीक्षेत तब्बल आठ प्रश्न रद्द व तीन प्रश्नांची उत्तरे बदलून दिली असा साधारण ११ प्रश्नांचा घोळ. हे असेच होत असेल तर आम्ही विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करायचा? पहिली उत्तरतालिका ते दुसऱ्या उत्तरतालिकेदरम्यानचा कालावधी हा मुख्य परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी महत्त्वाचा असतो. विद्यार्थी त्या वेळेचा सदुपयोग करतात, पण अचानक दुसऱ्या उत्तरतालिकेत एकूण प्रश्नांच्या दहा टक्के प्रश्न रद्द होत असतील तर प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या तज्ज्ञांच्या कार्यक्षमतेवरच संशय निर्माण होतो. आयोगाचे सहसचिव सांगतात की, प्रश्न रद्द करणे हा प्रक्रियेचा भाग आहे. ४ सप्टेंबर रोजी झालेल्या संयुक्त गट ब परीक्षेतील तीन प्रश्नांची उत्तरे बरोबर असताना ते रद्द केले गेले. त्याचा परिणाम आम्हा १३ हजार उमेदवारांना सहन करावा लागत आहे. सहसचिवांच्या या तज्ज्ञ गटामुळे गेल्या आठ महिन्यांत आमची मुख्य परीक्षा झालेली नाही. प्रश्नपत्रिका तयार करताना काही चुका होऊ शकतात हे मान्य, पण एवढ्या प्रमाणात?

पहिल्या उत्तरतालिकेत ५० गुण असलेला उमेदवार आता ३९ गुणांवर आला आहे. त्याच्या भवितव्याची जबाबदारी कुणाची?

**– प्रशांत बेलकर** (परीक्षार्थी), श्रीनगर, नांदेड

### विद्यार्थ्यांचे प्रश्न ऐकायला कुणाला वेळ नाही

**महाराष्ट्र लोकसेवा** आयोगाची संयुक्त गट ब पूर्वपरीक्षा २०२१ ची दुसरी उत्तरतालिका नुकतीच प्रकाशित झाली आणि पुन्हा एकदा विद्यार्थ्यांच्या भविष्याला सुरुंग लागला. त्याबाबत काही मुद्दे.

- परीक्षा ते उत्तरतालिकांच्या प्रकाशित करण्यात लागणारा हा कालावधी दीर्घ (तंत्रज्ञानाच्या वेगवान युगातही) असून त्यातही नियमितता फारच दुर्मीळ आहे.
- एमपीएससीचे इतके अनुभवी तज्ज्ञ आहेतच कोण ज्यांच्यावर एवढे प्रश्न रद्द करण्याची वेळ येते आणि उत्तर बदलण्याचा विषय तर न बोललेलाच बरा. राज्याने सोपवलेले हे गंभीर काम ते असे पुनःपुन्हा चव्हाट्यावर का आणतात?

सहसचिव विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याचा प्रश्नच नाही, असे बिनबुडाचे आणि अतार्किक विधान करतात. या परीक्षा पद्धतीबद्दल मला असलेल्या माहितीवरून सांगते की, एकूण गुण १००, वेळ ६० मिनिटे म्हणजे प्रत्येक प्रश्नाला १३.३३ मिनिटे. रद्द झालेले प्रश्न आठ म्हणजे वाया गेलेला वेळ १३.३३ मिनिटे आणि रद्द झालेल्या प्रश्नांची विषयनिहाय विभागणी पाहता ते सर्व प्रश्न असे होते जे सहज सोडवायला वेळ दिला.

राज्यशास्त्र-१, इतिहास-३, भूगोल-२, अर्थशास्त्र-१, अंकगणित-बुद्धिमत्ता-१ = ८. आता समजा, माझ्यासारखे आणखी काहींना अंकगणित बुद्धिमत्ता प्रश्नांपर्यंत पोहोचता आले नाही. जे सोडवले तेच आठ प्रश्न आता रद्द झाले आहेत, तर तो गेलेला वेळ पुढच्या प्रश्नांसाठी वापरता आला असता आणि माझे नुकसान नसते झाले. पण आता ते झाले आहे. वेळेचे समीकरण प्रत्येक वेळी जमत नाही, असे अनेक जण आहेत. तेव्हा असे प्रश्न रद्द होण्याचे प्रकार घडावेतच का? विद्यार्थ्यांचे प्रश्न लक्षात घ्यायला कोणाला सवड नाही आणि तळमळ तर नाहीच.

**– वर्षा भगवान ठुले** (परीक्षार्थी), गंगाखेड, परभणी

### मुळात ही वेळ आयोगावर का येते?

**'महाराष्ट्र लोकसेवा** आयोगाकडून आठ प्रश्न रद्द' हे वृत्त वाचले. याआधीही जवळपास सगळ्याच परीक्षांमध्येही कमीअधिक प्रमाणात असेच होत आले आहे. त्यातून विद्यार्थ्यांच्या मनात आयोगाविषयी प्रचंड नाराजी आहे. (संयुक्त मुख्य परीक्षा-२०२० चा वाद अजूनही कोर्टात प्रलंबित आहे.) या सगळ्या गोंधळात काही प्रश्न पडतात.

- प्रश्नच रद्द करायची वेळ आयोगावर का येते? तेही एवढ्या मोठ्या प्रमाणात?
- प्रश्न रद्द होण्याची परंपरा पहिल्यापासूनच आहे तर ती यापुढेही चालूच ठेवायची का?
- प्रत्येक परीक्षेसाठी न्यायालयाचा दरवाजा ठोठावणे, परीक्षा खोळंबणे, परीक्षार्थींचे नुकसान यासाठी काही प्रबळ आणि दूरगामी उपाय लोकसेवा आयोग करणार आहे की नाही?
- आयोगातील उच्चपदस्थ अधिकारी म्हणतात की, 'प्रश्न रद्द झाल्याने विद्यार्थ्यांचे कुठलेही नुकसान होत नाही. ते सरसकट सगळ्यांचे रद्द होतात.' मुळात हे विधान ते कुठल्या तर्कांच्या आधारावर करतात?

**– एस. एस. पानमंद,** अहमदनगर

### अपुऱ्या मनुष्यबळाचा प्रश्न सोडवा...

**उत्तरे रद्द** करण्याची परंपरा याही वेळी कायम राखत एमपीएससीने संयुक्त पूर्वपरीक्षेतील आठ प्रश्न रद्द केले व तीन प्रश्नांची उत्तरे बदलली. खरे पाहता आयोग ही घटनात्मक संस्था आहे, पण मागील काही परीक्षा विशेषतः पूर्वपरीक्षेतील रद्द होणाऱ्या प्रश्नांचे प्रमाण पाहता कुठे तरी काही तरी कमी पडत आहे. आयोगाचे सहसचिव म्हणतात की, यात परीक्षार्थींचे नुकसान व्हायचा प्रश्नच नाही, मात्र ज्यांची ही परीक्षा केवळ .२५ इतक्या कमी फरकाने राहते त्यांना नक्कीच फरक पडत असणार. यामुळेच मागील संयुक्त पूर्वपरीक्षेत तिसरी उत्तरतालिका जाहीर करूनही काही परीक्षार्थी न्यायालयात गेले आणि याचा परिणाम त्या परीक्षेच्या मुख्य परीक्षेवर झाला. अजूनही ती परीक्षा कधी होईल याची निश्चिती नाही! त्यामुळे चुकीचे पर्याय अथवा इतर कोणत्याही कारणामुळे प्रश्न रद्द होता कामा नये. मागील तीन वर्षांत विविध कारणांमुळे या क्षेत्रातील अनिश्चितता वाढली आहे. त्यामुळे याबाबत आयोग आणि शासन यांनी किमान काळजी घेणे गरजेचे आहे. राज्य सरकारने केवळ आयोग सक्षम करू अशी घोषणा केली, मात्र प्रत्यक्षात काही केले नाही. केवळ नवीन सदस्य नेमून आयोग कसा सक्षम होणार? आज कदाचित अपुऱ्या मनुष्यबळामुळे आयोगावर येतो आहे. पण त्यातून होणारा विलंब विद्यार्थ्यांचे नुकसान करतो. याबाबत लवकरात लवकर विद्यार्थिहिताचा निर्णय व्हावा, हीच अपेक्षा.

**– उमाकांत स्वामी,** पालम, परभणी

### किसिंजर शांतताप्रेमी कधी होते?

**'किसिंजर ते जयशंकर'** हा विक्रमसिंह मेहता यांचा लेख (५ मे) वाचल्यावर काही गोष्टींची आठवण झाली म्हणून हा पत्रप्रपंच. उत्तर व्हिएतनामचे नेते ले डुक थो आणि किसिंजर यांना १९७३ मध्ये शांततेचे नोबेल संयुक्तपणे देण्यात आले होते. आपापल्या देशातर्फे व्हिएतनाम युद्ध थांबवण्यासाठी त्यांनी १९७३ मध्ये ज्या वाटाघाटी केल्या, त्यासाठी हे पारितोषिक त्यांना मिळाले. पण खुद्द नोबेलसाठी निवड करणाऱ्या समितीच्या काही सदस्यांना किसिंजर यांची निवड पटली नव्हती. या समितीच्या दोन सदस्यांनी नंतर राजीनामा दिला. किसिंजर यांच्या निवडीबद्दल अनेक जाणकारांनी त्या काळी नाराजी व्यक्त केली होती. या ऐन वाटाघाटींच्या दरम्यान किसिंजर यांनी हनोई या राजधानीच्या शहरावर बॉम्बहल्ला करण्याचा आदेश अमेरिकन सैन्याला दिला होता, हे विवादाचे सर्वात महत्त्वाचे कारण होते. हेन्री किसिंजर यांनी नोबेल स्वीकारले; पण व्हिएतनामाचे नेते ले डुक थो यांनी किसिंजरसोबत हे पारितोषिक घ्यायला नकार दिला. 'या पारितोषिकासाठी किसिंजर यांची केलेली निवड ही त्या समितीने केलेली मोठी चूक होती; कारण आक्रमक देश आणि ज्यांच्यावर आक्रमण झाले या दोघांनाही ही समिती एकाच मापाने मोजत होती' असे ले डुक थो यांनी नंतर दहा वर्षांनी एका मुलाखतीत सांगितले.

किसिंजर यांची राजकीय कारकीर्द रक्तपाताने डागाळलेली आहे. १९६९ ते १९७६ या काळातल्या अमेरिकन परराष्ट्रविषयक धोरणाचे ते प्रमुख सूत्रधार होते. १९७० मध्ये चिले या देशात निवडणूक होऊन मार्क्सवादी नेते साल्वादोर आयंदे यांच्या नेतृत्वाखाली डावी आघाडी विजयी झाली. पण अमेरिकेला ही घटना आवडण्यासारखी नव्हती. तिच्यासंबंधी कारस्थानांवर 'देखरेख करण्यासाठी' अमेरिकेत ४० सदस्यांची एक समिती निवडण्यात आली. किसिंजर तिचे अध्यक्ष होते. शेवटी (अर्थातच अमेरिकेच्या 'देखरेखी'च्या साहाय्याने) चिलेमधल्या जनरल पिनोशे यांनी लष्करी उठाव घडवून आणला आणि आयंदे या कटात मारले गेले. यानंतर सांतियागो (चिलेची राजधानी) शहरात एका फुटबॉल मैदानात तीन हजार कार्यकर्ते मारले गेले.

बांगलादेशच्या निर्मितीच्या वेळच्या काही घटना किसिंजर यांच्या एकूण वर्तनाशी सुसंगत अशाच आहेत. १९७० मध्ये त्या वेळच्या एकत्रित पाकिस्तानात झालेल्या निवडणुकीत शेख मुजीबूर रहमान यांच्या अवामी लीगला घसघशीत मते मिळाली. नंतर मुजीबूर यांना अटक झाली. त्यामुळे बांगलादेशातल्या जनतेत असंतोष माजला. तो चिरडून टाकण्याच्या याह्या खान यांच्या प्रयत्नात धरपकडी, तुरुंगवास आणि छळ हे सगळे झाले. या साऱ्याला हेन्री किसिंजर यांचा आशीर्वाद होता. 'इकडे काही गंभीर घटना घडत आहेत' अशा आशयाच्या तारा ढाक्यातल्या अमेरिकी वाणिज्य दूतावासाचे प्रमुख आर्चर ब्लड यांनी किसिंजर आणि निक्सन यांच्या शासनाला पाठवल्या. अमेरिकेच्या शासनाने स्वीकारलेल्या धोरणाशी असहमती दर्शवणारे संदेश या वाणिज्य दूतावासाने अमेरिकेच्या शासनाकडे पाठवले; पण किसिंजर-निक्सन दुकलीने याकडे साफ दुर्लक्ष करून याह्या खानांना पाठिंबा देण्याचे धोरण तसेच चालू ठेवले.

वर दिलेली उदाहरणे हे काही नमुने आहेत. किसिंजर यांची कारकीर्द अशा अनेक रक्तरंजित घटनांनी भरलेली आहे. १९७७ मध्ये आपले पद सोडताना त्यांनी अनेक पुरावे आणि दस्तावेज अमेरिकन लायब्ररी ऑफ काँग्रेसमध्ये जमा केले. मात्र आपल्या मृत्यूनंतर पाच वर्षेपर्यंत ते जाहीर करू नयेत असा करार त्यांनी लायब्ररीबरोबर केला. तेव्हा हे सर्व वगळून 'आज किसिंजर सक्रिय असते तर...' अशी त्यांच्या मुत्सद्देगिरीची भलामण किती सार्थ आहे हे पाहण्यासारखे आहे.

**– अशोक राजवाडे,** मालाड (मुंबई)

# भाजपच्या रिंगणात शिवसेनेचा खेळ

**भाजपने फासे टाकावेत आणि शिवसेनेने त्यात फसावे, अशा वळणावर राज्याचे राजकारण जात असल्याची शंका येते. यामागील कारणे दोन : पहिले कारण काही नेत्यांच्या वक्तव्यांशी, तर दुसरे काँग्रेस व राष्ट्रवादीच्या मौनाशी संबंधित आहे...**

**मधु कांबळे**

**केंद्रात बलाढ्य** बहुमताचे भाजपचे सरकार आणि विरोधी पक्ष म्हणजे, काँग्रेस तोळामासा अशी अवस्था. त्यातही केंद्र सरकारने काही निर्णय घेतले की, ते कसे चुकीचे आहे, म्हणून त्यावर प्रतिक्रिया, किंवा काही प्रश्नांवर निर्णय घेत नाही, म्हणून टीका, एवढेच काम सध्या काँग्रेसला आहे, असे दिसते. विरोधी पक्ष म्हणून काँग्रेसची गेल्या सात वर्षांत स्वतंत्र व परिणामकारक अशी राजकीय रणनीती पाहायला मिळाली नाही. राष्ट्रीय पातळीवर काँग्रेस हा केवळ प्रतिक्रियावादी विरोधी पक्ष झाला आहे, असे वाटते.

महाराष्ट्रात त्याच्या उलट स्थिती आहे. म्हणजे भक्कम विरोधी पक्ष असलेल्या भाजपने चतुर खेळी करावी आणि त्यात सत्ताधारी महाविकास आघाडीने खेळत राहावे, या अर्थाने राज्यात आघाडी सरकारच प्रतिक्रियावादी झाले आहे की काय अशी स्थिती आहे.

महाराष्ट्रात भाजपला आता सध्या तरी काँग्रेस वा राष्ट्रवादी काँग्रेसचे फार काही देणेघेणे नाही. भाजपच्या दृष्टीने राजकीय घातपात घडवून सत्ताधीश झालेल्या शिवसेनेला त्यांना नामोहरम करायचे आहे. त्याचे कारण जगजाहीर आहे, शिवसेनेमुळे भाजपला राज्याच्या सत्तेला मुकावे लागले. शिवसेनेचा हा राजकीय घाव भाजपच्या जिव्हारी लागला आहे. म्हणून शिवसेनेला सुखाने सत्ता भोगू द्यायची नाही, असा जणू भाजपने चंगच बांधला आहे. असे विषय काढायचे की, शिवसेनेला त्यांच्या तालावर नाचवायचे किंवा घायाळ करायचे, त्यातून आघाडीत बेबनाव निर्माण होतोय का, त्याचीही चाचपणी करायची. तीस वर्षे युतीत राहिलेल्या भाजपला शिवसेनेची दुखरी नस पक्की माहीत आहे. शिवसेनेसाठी राजकीयदृष्ट्या अडचणीचा ठरणारा मुद्दा म्हणजे हिंदुत्व. त्यावरच भाजपने रिंगण आखून, त्यात शिवसेनेला खेळवायला सुरुवात केली आहे. शिवसेना भाजपवर प्रतिहल्ला करण्याच्या नादात, हिंदुत्ववादी भूमिका घेत आहे, त्याचा आघाडीच्या सत्ताबंधावर आघात होऊ शकतो, सत्ताबंध तुटून आघाडी विखरू शकते, भाजपला तेच हवे आहे, त्याचे भान शिवसेनेला आहे असे दिसत नाही.

उदाहरणार्थ, मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुस्लीम धर्मीयांचा रमजान हा उपवासाचा महिना सुरू असतानाच, मशिदीवरील भोंग्याचा विषय काढल्याने महाराष्ट्रात तणावाचे वातावरण तयार झाले. भाजपने ठाकरे यांच्या भोंग्यांविरुद्धच्या आवाजात आपलाही आवाज मिसळला. तो एवढ्याचसाठी की आता शिवसेना काय करते बघू. मशिदींच्या ध्वनिवर्धकांवरून वातावरण तापू लागले, परंतु मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे आणि त्यांचे समर्थक भाजपलाही अगदी संयतपणे, परंतु परिणामकारक असे प्रत्युत्तर दिले. राज्यातील सरकार वा मुख्यमंत्री मशिदीवरील भोंगे काढण्याच्या राज ठाकरे यांच्या मागणीच्या विरोधात आहेत, हा संदेश विनाकारण निर्माण करण्यात आलेल्या तणावाच्या खाली आलेल्या समुदायाला काहीसा दिलासा देणारा होता. परंतु भाजपने नंतर बाबरी मशीद प्रकरणाचा फास टाकला आणि शिवसेना त्यात अडकल्याचे दिसते.

सत्तेसाठी राजकारण कोणत्या थराला जात आहे, याचे भान प्रमुख्याने आज प्रसिद्धीच्या झोतात आणि वादाच्या केंद्रस्थानी असलेल्या भाजप, शिवसेना व मनसे या पक्षांना व त्यांच्या नेतृत्वाला आहे, असे दिसत नाही. राज ठाकरे यांना या देशाची राज्यघटना, लोकशाही व कायद्याचे राज्य मान्य असेल तर, त्यांची जी मागणी आहे, त्यासाठी त्यांनी सनदशीर मार्गाचा अवलंब करायला हवा. ती योग्य असेल तर, त्या पक्षाच्या समर्थकांप्रमाणे सर्वसामान्यांचाही त्याला पाठिंबा मिळू शकतो. उदाहरणार्थ सार्वजनिक ठिकाणी ध्वनिवर्धकाच्या (सर्वच धर्मीयांकडून होणाऱ्या) वापराबाबत उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयाचे सुस्पष्ट निर्देश आहेत आणि 'राज्य सरकारने ध्वनिप्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम- २०००' खाली योग्य त्या कार्यवाहीसाठी २८ जुलै २०१५ रोजी आदेशही काढलेले आहेत.

दुसरे उदाहरण म्हणजे एका नागरी संघटनेच्या जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने देशभरातील सर्वच धर्मीयांची अनधिकृत धार्मिक स्थळे निष्कासित करणे, स्थलांतरित करणे व नियमित करणे याबाबत २९ सप्टेंबर २००९ रोजी एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. त्याच्या अंमलबजावणीचे काय झाले, हा विषय वेगळा आहे. परंतु, नियम व कायद्याचा भंग करणारी कोणती गोष्ट घडत असेल, तर त्याविरोधात सनदशीर मार्गाने, कायदेशीर मार्गाने दाद मागता येते.

ध्वनिक्षेपकाच्या वापरावरील बंधने हा काही एका धर्मापुरता विषय मर्यादित नाही, तो ध्वनिप्रदूषणाशी म्हणजेच केवळ माणसांच्याच नव्हे तर पशुपक्ष्यांच्याही आरोग्याशी संबंधित आहे, परंतु 'मशिदीवरील भोंगे उतरवा' अशी आव्हानात्मक भाषा करणे, त्यातून एक तणावाचे वातावरण तयार होणे, हे कोणालाच परवडणारे नाही. भोंग्याविरुद्धच्या कर्कश आवाजाने फार काही फरक पडत नाही, असे लक्षात आल्यानंतर किंवा भोंग्याने धुमसणाऱ्या आगीत बाबरी उद्ध्वस्तीकरण प्रकरणाचे तेल टाकून राजकीय भडका उडविण्याची विचारपूर्वक चतुर खेळी भाजपने केली. ज्यांनी विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपद तसेच राज्याचे मुख्यमंत्रीपद पाच वर्षे भूषविले, त्या पदावर असताना मुस्लीम धर्मीयांसह सर्व धर्मीयांना त्यांच्या-त्यांच्या सणावाराला शुभेच्छा दिल्या, त्या खुद्द देवेंद्र फडणवीस यांनी १ मे रोजीच्या जाहीर सभेत 'मशिदीवरील भोंगे काढायची हिंमत नाही आणि म्हणे बाबरी मशीद आम्ही पाडली,' अशी भाषा करीत शिवसेनेला विशेषतः मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना डिवचले. लगेच दुसऱ्याच दिवशी शिवसेनेने फडणवीस यांना प्रत्युत्तर देत बाबरी मशीद पाडली, त्या वेळी शिवसेनेचे लोक तेथे कसे होते, याचे दाखले, पुरावे देणे सुरू केले. आम्हीच कसे बाबरी पाडायला होतो, हे सांगण्याची भाजप व शिवसेनेची स्पर्धा सुरू झाली आहे, नव्हे जणू काही बाबरी पाडली म्हणजे शौर्य गाजविले अशा प्रकारचा सूर दोन्ही बाजूंकडून ऐकवला जाऊ लागला. मुळात हीच अतिशय गंभीर व चिंताजनक बाब आहे.

देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते आणि आज ते विधानसभेतील विरोधी पक्षनेते आहेत, ही दोन्ही पदे घटनात्मक आहेत. घटनात्मक पदावर बसलेल्या व्यक्तीने सर्व प्रकारचे भान ठेवून बोलावे, अशी सर्वसाधारण अपेक्षा असते. फडणवीस यांनी सोमय्या मैदानावरील १ मे रोजीच्या जाहीर सभेत 'बाबरी पाडली, त्या वेळी आपण स्वतः तेथे हजर होतो', असे विधान केले. त्या वेळी शिवसेना कुठे होती, असा सवालही त्यांनी केला. २९ वर्षांचा जुना विषय उकरून काढताना त्यांनी असा मुद्दा मांडला की ती मशीद नव्हती, परकीय आक्रमणाचा तो ढांचा होता, तो उद्ध्वस्त केला. हा शब्दच्छल होता. भारतात एके काळच्या परकीय आक्रमणांचे अवशेष वास्तुरूपाने कमीअधिक प्रमाणात अनेक ठिकाणी अजूनही पाहायला मिळतात. ते उद्ध्वस्त करण्याचा अधिकार घटनेने वा कायद्याने कुणाला दिला आहे का? फडणवीसांनी हा विषय आताच का काढला यामागे, शिवसेनेला बाबरी मशीद उद्ध्वस्तीकरणाच्या प्रकरणावर बोलण्यासाठी उद्युक्त करून आघाडीत बिघाड होतो का, याची चाचपणी करण्याची गणितेही असू शकतात, हा राजकारणाचा भाग झाला. तरी, बाबरी उद्ध्वस्तीकरण हा 'गुन्हेगारी स्वरूपाचा कट' मानणारा तपास झाला आणि त्यावर आधारित खटलेही न्यायालयांपर्यंत गेले, हाही इतिहास आहे. तो कोणत्या हेतूसाठी विसरायचा? तेथे फडणवीस कशासाठी हजर राहिले होते? प्रश्न गंभीर आहे आणि तो त्यांनीच निर्माण केला आहे.

भाजपच्या या खेळीला शिवसेनाही बळी पडली. शिवसेनेचे खासदार व प्रवक्ते संजय राऊत हेदेखील बाबरी पाडण्यात शिवसेनेचा सहभाग कसा होता, हे सांगायला मागे हटले नाहीत. मुद्दा असा आहे की, संजय राऊत हे खासदार आहेत आणि ते पदही घटनात्मक आहे. राऊत मांडतात ती शिवसेनेची भूमिका किंवा बाजू, म्हणजे ती शिवसेनेचे पक्षप्रमुख म्हणून व मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरे यांची भूमिका मानली जाऊ शकते. बाबरी पाडली गेली, त्यानंतर देशभर दंगली पेटल्या, बॉम्बस्फोट झाले, हजारो माणसे मारली गेली. त्या एका घटनेमुळे देशाने खूप भोगले, त्या जखमा आता कुठे काहीशा सुकून गेल्या आहेत, त्या खरवडून पुन्हा भळभळायला लावण्यात काय अर्थ आहे? कुणाला त्यातून समाधान मिळणार आहे आणि कोणत्या प्रकारचे?

राज्यात शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे आघाडी सरकार आहे. टोकाचे विरोधी विचार असलेले हे तीन पक्ष एकत्र आले ते सत्तेसाठी. किमान समान कार्यक्रमावर हे तीन पक्ष एकत्र आले व त्यांनी राज्यात सरकार स्थापन केले. त्या किमान समान कार्यक्रमाचा आधार घेतला आहे. राज्यघटनेचे धर्मनिरपेक्षता हे तत्त्व त्यासाठी आधारभूत म्हणून मान्य केले आहे. अशा वेळी ज्यांच्या हाती राज्याच्या सत्तेचे सुकाणू आहे, त्यांनीच म्हणजे शिवसेनेने बाबरी मशीद पाडल्याची कबुली द्यावी आणि त्याचा अभिमान बाळगावा, हा घटनेच्या ढाच्यावरील आघात नाही का?

यात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिकाही केवळ प्रतिक्रियावादी आहे. राज ठाकरे यांच्या भाषणांमुळे धार्मिक तेढ निर्माण होते, अशी टीका काँग्रेस व राष्ट्रवादीचे नेते करतात. परंतु सत्तेतील भागीदार शिवसेना बाबरी पाडल्याची कबुली देतो, त्यामुळे एका समुदायामध्ये अस्वस्थता व असुरक्षितता निर्माण होते, याचा कोण विचार करणार? राष्ट्रवादी काँग्रेसची राजकीय भूमिका थोडी लवचीक आहे, असे म्हणता येईल. परंतु काँग्रेस तर स्वतःला धर्मनिरपेक्ष पक्ष मानतो, त्या मुद्द्यावर त्यांनी शिवसेनेबरोबर सत्तेत जाण्याचा निर्णय घेतला, मग भाजपवर कुरघोडी करण्याच्या नादात किंवा भाजपच्या खेळीला बळी पडत शिवसेना किमान समान कार्यक्रमाच्या आधारावरच आघात करू पाहात आहे, त्याबद्दल काँग्रेसचे काही म्हणणे आहे का?

madhukar.kamble@expressindia.com

डॉ. जयदेव पंचवाघ यांचे 'चेतासंस्थेची शल्यकथा' हे साप्ताहिक सदर या अंकात नाही.

## भाषासूत्र

### भाषेचे सौंदर्य टिकवण्याचे कर्तव्य

**पुढील वाक्य** वाचा... 'दारू पिल्यावर तो आपल्या पत्नीला मारझोड करायचा' या वाक्यातील सदोष शब्दयोजना 'दारू पिल्यावर' ही आहे. 'पी' या धातूची क्रियापदाची अशी रूपे इतकी ऐकायला मिळतात की विचारू नका? ती दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला तर उत्तर मिळते- 'अहो, पण ती रूपे आता भाषेत इतकी रूढ झाली आहे, की ती स्वीकारायला काय हरकत आहे? आम्हाला ती चुकीची वाटत नाहीत.'

एक मात्र जाणवते, ते म्हणजे बोलताना अशा प्रकारची सदोष रूपे लोक योजत असले, तरी लेखनात अशी रूपे सहसा आढळत नाहीत याला कारण मुद्रक या चुका सुधारत असणार, हे नक्की.

**पी** (पिणे) हा ईकारान्त एकाक्षरी धातू आहे. आणखीही काही ईकारात एकाक्षरी धातू मराठीत आहेत. जसे- **भी** (भिणे), **बी** (बिणे), याशिवाय, एकाक्षरी एकारान्त धातू- **ने** (नेणे), **घे** (घेणे), **ले** (लेणे) (लेणे याचा अर्थ परिधान करणे), एकाक्षरी ओकारान्त धातू- **दो** (दोघे) या सर्व धातूची वर्तमानकाळाची रूपे नियमित होतात जसे- पी- पितो, पिते, पितात इत्यादी. नेतो, नेते, नेतात इत्यादी. हो (होणे), 'तू पुढे हो' मात्र इतर रूपे होतो, होतीस इत्यादी भूतकाळी रूपे आहेत. आणखीही वेगळी रूपे होतात, ती पाहू या.

**अनियमित रूपे-** या धातूने प्रत्यय लागून होणारी रूपे- **पी** (पिणे)- प्या, प्यालो, प्यालीस, प्यावे, प्यावी, प्यावेस, प्यायला इत्यादी. **भी-** (भिणे) - भ्या, भ्यावा, भ्यालो, भ्यालास, भ्यालीस, भ्याल्या, भ्यायला इत्यादी. **वी** (विणे)- गाय व्याली, व्याल्या, व्याव्यात, व्यावीस, व्यायता इत्यादी. **ने** (नेणे) - न्या, नेले, नेली, न्यावा, न्यावेस, न्यायी, न्यावीत, न्यायला इत्यादी. **घे** (घेणे)- घ्या, घ्यावा, घ्यावी, घ्याल, घ्यावे, घ्याव्यात, घ्यायला इत्यादी. **ले** (लेणे)- ल्या, ल्याली, ल्यावेत, ल्यावी, ल्यात, ल्यावेस, ल्यायला इत्यादी. **हो** (होणे)- भूतकाळी रूपे- (भी) होतो, होती, होतास, होते, इत्यादी.

**अनियमित रूपे-** व्हा, व्हाल, व्हावा, हाव्या, इत्यादी.

**भूतकाळी अनियमित रूपे-** झालो, झालीस, झालात, झाला, झाली, झाल्या, झालात, झाले इत्यादी.

या अनियमित रूपांकडे दुर्लक्ष न करता योग्य रूपे वाक्यरचना करताना योजावीत. भाषेचे सौंदर्य आणि योग्य शब्दांचा वापर करून भाषेचे स्वरूप टिकवणे वा विद्रूप न करणे हे आपल्या सर्व भाषकांचे कर्तव्यच आहे

**– यास्मिन शेख**

## साम्ययोग

### एका दर्शनाची पृष्ठभूमी

**'साम्ययोग' हा** शब्द समोर आला की आणखी दोन शब्द आठवतात. 'साम्यवाद' आणि 'साम्यसूत्रे'. यातील साम्यवाद आणि साम्ययोग अशी तुलना करत साम्ययोग कसा अपरिहार्य आहे यावर विनोबांनी लिहिले आहे. तसेच १०८ साम्यसूत्रांमधील काहींवर विनोबांची व्याख्यानेही उपलब्ध आहेत.

एखादा विषय जाणायचा तर माहिती, त्यावर पूर्वसूरींची मते, संशोधकाची भूमिका आणि शेवटी निष्कर्ष, या रीतीने एखाद्या प्रश्नाकडे पाहिले जाते. विनोबा तसे करत नाहीत. ते वरील सर्व मुद्दे एका प्रथम सूत्रात सांगतात. उदा. 'हरिरेव जगत् जगदेव हरिः' या एका सूत्रात लौकिक आणि आध्यात्मिक या दोन्हींचे नाते स्पष्ट होते.

विनोबांच्या विचारांचा पाया असा शास्त्रीय आहे. त्यांची अभिव्यक्ती मात्र सोपी आहे. आज ही विचारपद्धती काहीशी विस्मृतीत गेली आहे. परंतु साम्ययोगाचे अध्ययन करताना ती माहीत हवी. त्या अनुषंगाने विनोबांचे भारतीय दर्शनांमध्ये नेमके काय योगदान आहे तेही जाणायला हवे.

दर्शन शब्द ऋषींशी जोडलेला आहे. 'दर्शनात् ऋषिः' अशी ऋषी शब्दाची व्याख्या आहे. तर 'मुनी' म्हणजे मनन करणारा. ऋषींनी तत्त्वांचे दर्शन घ्यावे. त्यांनी किंवा नंतरच्या पिढीने मनन, चिंतन आणि आचरणातून ते दर्शन विकसित करावे ही आपल्या दर्शनांची रीत आहे.

कोणत्याही दर्शनाचे बीज रुजावे म्हणून त्यांचे ग्रथन करणे गरजेचे असते. हे ग्रथन, चिंतन, मननास अनुकूल असावे म्हणून त्यांना सूत्ररूप दिले जाते. अशा सूत्रकारांमध्ये भगवान शंकर हे आद्य नाव आहे. त्यांच्या 'शिवसूत्रजालांवर' म्हणजे शिवसूत्रांवर संपूर्ण व्याकरणशास्त्र उभे आहे, अशी मान्यता आहे.

यानंतर भगवान पतंजली, महर्षी व्यास, गौतम, कणाद, कपिल आदी नावे सूत्रकार म्हणून समोर येतात. पाठोपाठ योग, व्याकरण, वैद्यक, न्याय आदी शास्त्रांचे स्मरण होते. या सूत्रांचा आटोपशीर परिचय म्हणजे वृत्ती आणि विस्तार म्हणजे भाष्य.

विनोबांनी या सर्व अंगांनी साम्ययोगाची मांडणी केली आहे. या विचारपद्धतीचा उपयोग करत त्यांनी ख्रिश्चन, इस्लाम आदी धर्मांच्या शिकवणुकीचे सारही काढले.

या विचारपद्धतीचे सामान्य माणसाला ओझे होऊ नये म्हणून त्यावर सुलभ भाष्य लिहिले. गीताई, गीता प्रवचने, हे साहित्य याचे उत्तम उदाहरण आहे.

पारंपरिक दर्शनांना विनोबांनी नवे आयामही दिले. त्यांचा साम्ययोग हा संतांना शरण आहे. तो आधुनिक आहे आणि समन्वयाचा विस्तार करणारा आहे.

कोणत्याही भाष्यकारांपेक्षा संत श्रेष्ठ आहेत, हे त्यांचे मत, पुरेसे स्पष्ट आहे. आध्यात्मिक परंपरेला विज्ञानाची जोड असेल तरच खरी धर्मस्थापना होईल, ही त्यांची भूमिका आहे. विनोबांनी या दोन्ही ज्ञानशाखांचा समन्वय साधताना त्यांच्या मर्यादाही सांगितल्या आहेत.

हे तत्त्वज्ञान रोजच्या प्रश्नांना भिडणार नसेल तर ते निरर्थक आहे इतकी स्वच्छ भूमिका घेत साम्ययोग उभा आहे.

तत्त्वज्ञ, आचरण करणारा, समन्वयक, आधुनिक विचारांना उचित महत्त्व देणारा आणि म्हणून दार्शनिक हे विनोबांचे आणि तत्पूर्वी साम्ययोगाचे रूप आहे. भारतीय दर्शन परंपरा कोणत्याही काळात मार्गदर्शक आहे हे विनोबांनी सिद्ध केले आहे.


**– अतुल सुलाखे**

jayjagat24 @gmail.com

## कुतूहल

### कार्बन चक्र

**कार्बन हा** पृथ्वीवरील जीवाचा मूलाधार आहे. पृथ्वीवर विविध रासायनिक स्वरूपांत आढळणारा कार्बन सतत जीवमंडल, मृदामंडल, भूमंडल, जलमंडल, वायुमंडल अशा विविध मंडलांत विविध स्वरूपांत फिरत असतो. यालाच कार्बन चक्र असे म्हणतात. या चक्रात सर्व घटना निसर्गक्रमानुसार घडत असतात. त्यामुळे पृथ्वीवरील जीवसृष्टी टिकून राहण्यास मदत होते. पृथ्वीवरील वनस्पती खाऱ्या आणि गोड्या पाण्यात आढळतात. शैवाल आणि एकपेशीय सायनोबॅक्टेरिया असे स्वयंपोषी सजीव (Autotrophs) प्रकाशसंश्लेषणाद्वारे वातावरणातील कार्बन डायऑक्साइडचे शर्करेत रूपांतर करतात. यावरतीच जगातील परपोशी (Heterorophs) प्राणी आणि सूक्ष्म जीव जगतात. मातीच्या स्तराप्रमाणे विविध सूक्ष्म जीव विघटन क्रियेद्वारा पर्यावरणाच्या सफाई मोहिमेत सहभागी होतात. मृत जीवसृष्टीपासून जीवाश्म निर्माण होतात. त्यापासून कार्बोनेट, कोळसा आणि जीवाश्म इंधन असे कार्बनयुक्त पदार्थ निर्माण होतात. सर्वच जिवंत प्राण्यांच्या श्वसनक्रियेमुळे, जीवाश्म इंधनाच्या ज्वलनामुळे, ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे आणि इतर जैविक गतिविधींमुळे कार्बन डायऑक्साइडच्या रूपात कार्बन वातावरणात मिसळतो.



जिवंत प्राण्यांना स्वसंवर्धनासाठी कर्बोदकांचा वापर करावा लागतो. पृथ्वीवरील आणि सागरातील जीवांचा कार्बन चक्रात मोठा सहभाग असतो. जिवंत प्राण्यांत कार्बनचे प्रमाण १८ टक्के असते. तर पृथ्वीच्या वातावरणात हे प्रमाण आत्ता ०.०४ टक्के आहे आणि ते दिवसेंदिवस वाढत आहे. पृथ्वीवरील जैविक सृष्टीच्या माध्यमातून कार्बनचा साठा आणि कार्बनचे स्रोत तयार होत असतात. समुद्रातील फायटोप्लांगटन्स (वनस्पती प्लावक) जवळजवळ ११ अब्ज टन कार्बन समुद्राच्या पोटात दर वर्षी शोषून घेतात. त्यामुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साइड बऱ्याच प्रमाणात कमी होतो. जलाशयातील स्वयंपोषी सूक्ष्म जीव हे अवाढव्य काम निरंतन करत असतात. त्यामुळे परपोषी जीवांना अन्नपुरवठा होतो. गेल्या १५० वर्षांत औद्योगिकीकरणामुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढते आहे. तसेच मिथेन व इतर हरितगृह वायूंच्या प्रमाणातदेखील लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे वैश्विक उष्म्यासारखे संकट ओढवले आहे. या वाढणाऱ्या तापमानाचा कार्बन चक्रात काम करणाऱ्या सूक्ष्म जीवांवर विपरीत परिणाम होतो व हे चक्र बिघडते. वातावरणातील कार्बन डायऑक्साइड पाण्यात विरघळल्यामुळे कार्बोनिक आम्लाची निर्मिती होते आणि यामुळे आजूबाजूचे खडक विरघळायला सुरुवात होते. २०१५ सालच्या पॅरिस परिषदेमध्ये बऱ्याच देशांनी यावर उपाययोजना करण्यासाठी विविध मार्ग सुचवले आहेत. जीवाश्म इंधनाचा वापर शून्यावरती आणून अपारंपरिक ऊर्जा स्रोत वापरणे हाच कार्बन चक्र टिकवून ठेवण्याचा एकमेव उपाय आहे.


**– डॉ. जयश्री सैनिस**

**मराठी विज्ञान परिषद**

**ईमेल :** office@mavipa.org

**संकेतस्थळ :** www.mavipa.org

# मैत्रीबंधासाठीच्या अटीशर्ती!

## रशिया आणि चीनचे खरे महत्त्वाकांक्षी रंग दिसल्यानंतर युरोपीय समुदायाच्या दृष्टीने ऊर्जा आणि व्यापारासाठी लोकशाहीवादी भारत महत्त्वाचा ठरू लागला आहे.

**पंतप्रधान नरेंद्र** मोदी यांचा २०२२ मधील पहिलाच परदेश दौरा विद्यमान परिस्थितीमध्ये महत्त्वाचा होता. या वर्षी फेब्रुवारीच्या अखेरच्या आठवड्यात रशियाने युक्रेनवर फुटकळ कारणांसाठी आक्रमण केल्यामुळे करोनातून कशाबशा सावरू लागलेल्या जगाला इंधन, धान्य, खनिजांच्या खंडित पुरवठा शृंखलेचा सामना करावा लागत आहे. या आक्रमणासाठी शिक्षा म्हणून रशियावर निर्बंध लादायचे, रशियन मालावर व सहकार्यावर बहिष्कार घालायचा म्हणजे येथून पुढे काही काळ विविध घटकांच्या पुरवठ्यासाठी रशियाला गृहीत धरायचे नाही, हे तर स्पष्टच आहे. त्याचबरोबर, युद्धध्वस्त युक्रेनला उसंत द्यावयाची तसेच मदतही करायची, तर विविध भागीदाऱ्यांची फेरआखणी करावी लागणार हेही उघड आहे. ही फेरआखणी कशी करायची? रशियाकडून मिळणाऱ्या मदतीवर कोणी, किती पाणी सोडायचे? असे केल्यास पर्यायी मदत देण्याची क्षमता इतर देशांमध्ये किती आहे? या सर्व प्रश्नांची उत्तरे अत्यंत गुंतागुंतीची असून त्यांची उकल सोपी नाही. रशियन खनिजांवर, जीवाश्म इंधनावर, धान्यावर, लष्करी सामग्रीवर तुलनेने अत्यल्प अवलंबून असलेल्या अमेरिकेने रशियाबाबत अत्यंत आक्रमक भूमिका घेणे स्वाभाविक. इतरांना ते शक्य नाही. यात प्रमुख युरोपीय देश आले आणि भारतही. भारताच्या भूमिकेविषयी पुढारलेल्या जगताला विशेष रस आहे, कारण सर्वांत मोठी लोकशाही, अवाढव्य बाजारपेठ आणि अजस्र कुशल कामगार पुरवठादार ही गुणत्रयी असलेल्या या देशाला जागतिक संकटांच्या आवर्तनांमध्ये साहजिक महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यातच आता खात्रीच्या लसदात्याबरोबरच पर्यायी धान्य पुरवठादार ही भूमिकाही भारताला निभावावी लागण्याची शक्यता आहे. गेल्या महिन्याभरात भारतात सर्व बड्या देशांचे मुत्सद्दी वा नेते येऊन गेले आणि नुकतेच मोदीही युरोपात जाऊन आले, ते काही केवळ 'तुम्ही कोणाचे, आम्ही कोणाचे' याची चाचपणी करण्यासाठी नव्हे. विधायक आणि विकासमूलक भागीदारीसाठी विशेषतः युरोपीय देश आणि भारत परस्परांना सक्षम, विश्वासार्ह सहकारी मानू लागले आहेत का, याची चिकित्सा यानिमित्ताने करणे इष्ट ठरेल.

मोदींच्या युरोपभेटीचे पहिले स्थळ होते जर्मनी आणि शेवटचे स्थळ होते फ्रान्स. युरोपीय व्यापारी आणि चलन समुदायातील हे दोन सर्वांत मोठे आणि प्रभावशाली देश. जर्मनीची अवस्था विद्यमान परिप्रेक्ष्यात काहीशी भारतासारखीच. फरक इतकाच की आपण रशियावर संरक्षण सामग्रीसाठी प्राधान्याने अवलंबून आहोत, तर जर्मनी नैसर्गिक वायू पुरवठ्यासाठी. तरीही जर्मनीने अधिक आश्वासकपणे रशियाच्या विरोधी भूमिका घेतली. पण तसा आग्रह त्यांनी भारतासमोर धरला नाही. भारताचे हे सर्वांत ठळक यश मानावे लागेल. ब्रिटिश पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांच्यापासून ते जर्मन चॅन्सेलर ओलाफ शोल्त्झ यांच्यापर्यंत बहुतांनी आता 'भारताची कळ आम्हाला समजते' अशी भूमिका घेतलेली आहे, ते योग्यच आहे. गतसप्ताहात युरोपीय आयोगाच्या प्रमुख उर्सुला व्हॉन डेर लेयेन भारतात आल्या त्या वेळी त्यांनी, भारत आणि युरोपीय समुदायाने परस्पर भागीदारी अधिक घट्ट करावी असे सांगताना रशियाशी अधिक आक्रमक प्रतारणा करण्याविषयी सूचित केले होते. जर्मन चॅन्सेलर शोल्त्झ आणि पुढे फ्रान्सचे पुनर्निर्वाचित अध्यक्ष इमान्युएल मॅक्रॉन यांनी तसला आग्रह अजिबात धरला नाही हे उल्लेखनीय आहे. जर्मनी हा अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रातील भारताचा जुना भागीदार, तर संरक्षण सामग्री क्षेत्रात फ्रान्स हा भारताचा भरवशाचा नवभागीदार. जर्मनीने आता हरित तंत्रज्ञान, डिजिटल तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्य देऊ केले आहे. अणुऊर्जा क्षेत्रातील महत्त्वाचे तंत्रज्ञान भारताला फ्रान्सकडून मिळू शकते. एका बाजूला नवीकरणीय ऊर्जेची गरज आणि उपलब्धता, त्यास कारणीभूत ठरलेली वातावरण बदलाची विक्राळ बनत चाललेली समस्या, तर दुसरीकडे वाढत चाललेली ऊर्जेची भूक यांचा मेळ साधण्याची कसरत भारतातील विद्यमान आणि भविष्यातील सरकारांना करावयाची आहे. असे तंत्रज्ञान विकसित करण्याची युरोपीय देशांची क्षमता निःसंशय अनुकरणीय अशीच. यासाठीच निव्वळ सामरिक आणि राजनैतिक बंध अधिक घट्ट करण्याबरोबरच तंत्रज्ञान सहकार्याच्या दृष्टीनेही मोदी यांचा दौरा महत्त्वाचा होता. या दौऱ्यातील नॉर्डिक आणि स्कॅँडेनेव्हियन राष्ट्रप्रमुखांच्या भेटीगाठी हा या दौऱ्यातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरला.

> **नवीकरणीय ऊर्जेची गरज आणि उपलब्धता, त्यास कारणीभूत ठरलेली वातावरण बदलाची समस्या, तर दुसरीकडे वाढती ऊर्जेची भूक यांचा मेळ साधण्याची कसरत भारतातील विद्यमान आणि भविष्यातील सरकारांना करावयाची आहे.**

मानवी विकास निर्देशांक, अभिव्यक्तिस्वातंत्र्य, प्रदूषणविरहित जीवनशैली, बालसंगोपन या निकषांवर अमेरिका आणि पश्चिम युरोपातील देशही मागास ठरावेत इतकी प्रगती विशेषतः डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन, फिनलँड या देशांनी केलेली आहे. या सर्व देशांच्या राष्ट्रप्रमुखांशी एकत्रित आणि स्वतंत्र भेटीगाठी हा मोदींच्या युरोप दौऱ्यातील आणखी एक महत्त्वाचा पैलू ठरला. डिजिटायझेशनच्या क्षेत्रात भारत महत्त्वाकांक्षी पावले उचलत आहे. जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी पर्यायी ऊर्जास्रोतांचा वापर वाढवण्यावर आपण भर देत आहोत. या दोन्ही प्रवासांमध्ये स्कॅँडेनेव्हियन देशांचे सहकार्य महत्त्वाचे ठरू शकते. या सहकार्याला मोदीभेटीमुळे निश्चितच शाश्वत आणि आश्वासक चालना मिळाली असे म्हणावे लागेल. ब्रिटनपाठोपाठ युरोपातील या महत्त्वाच्या देशांशी सहकार्याला नवी दिशा मिळाल्यास, भविष्यात मोजक्या देशांवर अवलंबून राहिल्याचे दुष्परिणाम भोगावे लागणार नाही. रशिया, अमेरिका, चीन, जपान आणि आखाती देश या सहकार्यपर्वापेक्षा हे पर्व अधिक फलदायी ठरू शकते. रशिया आणि चीनने गेल्या काही महिन्यांमध्ये आक्रमकपणा दाखवून आपले खरे महत्त्वाकांक्षी रंग दाखवून दिले. एकविसाव्या शतकात असले आचरट प्रकार त्यांच्यासारख्या महासत्तांकडून अपेक्षित नव्हते. त्यामुळेच ऊर्जा आणि व्यापारासाठी या दोन देशांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहिलेल्या युरोपीय समुदायाला नवे सहकारी, नवी समीकरणे धुंडाळावी लागत आहेत. लोकशाहीवादी भारत हा त्यामुळेच युरोपच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरू लागला आहे. तो नवा सहकारी नाही, पण त्याच्याबरोबर नवीन समीकरणे मात्र निर्माण होऊ शकतात अशी खात्री युरोपीय देशांना वाटते.

तरीही आपल्याला काही पथ्ये पाळावीच लागतील. नियमाधिष्ठित व्यवस्थेविषयी (रुलबेस्ड सिस्टीम) पश्चिम युरोपीय आणि स्कॅँडेनेव्हियन देश विशेष आग्रही असतात. यात धार्मिक सहिष्णुता, अभिव्यक्तिस्वातंत्र्य, पारदर्शी व्यवस्थेला महत्त्वाचे स्थान आहे. या आघाड्यांवर भारताचे प्रगतिपुस्तक नेहमीच उत्तेजनार्थ वा उत्तारित श्रेणीत हिंदोळणारे. ही बेतास बात कामगिरी पुढील सहकार्यासाठी मारक ठरू शकते. आपल्या लोकशाहीचे किंबहुना आपल्या कोणत्याही पैलूचे विपरीत मूल्यांकन बाकीच्यांनी आणि विशेषतः बहुराष्ट्रीय संस्थांनी केलेले हल्ली आपल्याला मंजूर नसते. असा अपरिपक्वतादर्शक तळतळाट करण्याची सवय आपण सोडून दिली पाहिजे. आपण करतो ते योग्यच आहे आणि बाकीच्यांचा हेतू अशुद्ध असतो या भ्रमातून हा तळतळाट होत असतो. कधी अमेरिकी काँग्रेस, कधी ब्रिटिश पार्लमेंटमध्ये असे मुद्दे अनेकदा उपस्थित होत असतात. स्कॅँडेनेव्हियन देश या मुद्द्यांवर अधिक संवेदनशील आहेत हे आपण लक्षात घेतलेले बरे. या मैत्रीतून उद्भवणाऱ्या प्रकल्पांचे जाळे देशभरातील राज्यांमध्ये पसरले पाहिजे, मागास राज्यांनाही प्रकल्प उभे करण्यासाठी प्राधान्य मिळायला पाहिजे. त्यात विशिष्ट राज्यांनाच प्रकल्पांचे लोणी मिळणार आणि इतर राज्ये उपाशी राहणार हे टाळायला हवे. युरोपातील ज्या देशांशी आपण मैत्रीबंध दृढ करत आहोत, त्या देशांमध्ये विकास आणि कल्याणकारी धोरणांच्या बाबतीत राजकारणापलीकडे पाहण्याची सवय तेथील राज्यकर्त्यांना वर्षानुवर्षे अंगवळणी पडलेली आहे. त्यांच्या या अटीशर्ती ध्यानात ठेवलेल्या बऱ्या!

# विद्वेषाच्या राजकारणाचा खेळ!

लालकिल्ला

महेश सरलष्कर

**भाजप नेते तेजिंदरपाल सिंग बग्गा यांच्या अटकनाट्यामुळे देशातील टोकाच्या राजकारणाचे आणि काही वर्षांमध्ये बदलत गेलेल्या राजकारणातील संस्कृतीचे दर्शन तर घडलेच, पण त्यापलीकडे जाणारे गंभीर प्रश्नही समोर आले...**

**भाजपविरोधात 'टूलकिट'** तयार केल्याच्या आरोपाखाली दिल्ली पोलिसांनी पर्यावरण क्षेत्रातील कार्यकर्ती गेल्या वर्षी दिशा रवी हिला बेंगळूरुहून अटक केली होती. तर दोन वर्षांपूर्वी अभिनेता सुशांत राजपूतच्या मृत्यूची चौकशी करण्यासाठी बिहार पोलीस मुंबईत दाखल झाले होते. ही उदाहरणे फार जुनी नाहीत. आत्ता नुकतेच दोन दिवसांपूर्वी तर एका उठवळ पुढाऱ्याच्या अटकेवरून तीन राज्यांतील पोलिसांनी एकमेकांविरोधात शड्डू ठोकले होते. भाजपचे नेते तेजिंदरपाल बग्गा यांचे पंजाब पोलिसांनी 'अपहरण' केल्याचा गुन्हा दिल्ली पोलिसांनी नोंदवला आणि त्यावर हरियाणा पोलिसांनी तत्परतेने कारवाई केली. राजकीय उद्दिष्टपूर्तीसाठी पोलिसांचा कुठल्या स्तरावर जाऊन गैरवापर होऊ शकतो, हे केंद्रातील मोदी सरकारने आणि दिल्ली-पंजाबातील आम आदमी पक्षाच्या सरकारांनी या घटनेतून दाखवून दिले. देशात विद्वेषाचे राजकारण किती गंभीर स्वरूप धारण करू शकते, हे बग्गांच्या अटक आणि सुटकेच्या प्रकरणाने लोकांसमोर आणले आहे. गेल्या सात-आठ वर्षांमध्ये विद्वेषाचे राजकारण अधिकाधिक टोकदार बनले असल्याचे कोणताही राजकीय पक्ष नाकारू शकत नाही.

संसदीय लोकशाहीमध्ये निवडणुकीच्या राजकारणामध्ये एखादा पक्ष पराभूत होतो, दुसऱ्या पक्षाला सत्ता मिळते. निवडणूक जिंकण्यासाठीच लढायची असते, सत्ता मिळवायची असते, पण ती मिळाली नाही तर पाच वर्षे वाट पाहण्याची तयारी असावी लागते. ७० वर्षांच्या निवडणुकीच्या राजकारणामध्ये राजकीय पक्षांनी हार-जीत स्वीकारली. पण, केंद्रात भाजपप्रणीत सरकार स्थापन झाल्यानंतर राज्ये पादाक्रांत करण्याचा ध्येय ठेवले गेले आणि जिथे सत्ता मिळाली नाही, तिथे कुठल्याही मार्गाने ती मिळवण्याचा घाट घातला गेला. मध्य प्रदेशमध्ये भाजपचा पराभव झाल्यानंतर, करोनाच्या लाटेत भाजपने काँग्रेसचे आमदार फोडून पुन्हा सत्ता मिळवली. महाराष्ट्रामध्ये भाजपच्या सत्तेचा घास हातातून निसटला, त्यानंतर सैरभैर झालेल्या भाजपने सत्ता मिळवण्यासाठी आटापिटा केला. त्यासाठी वेगवेगळ्या क्लृप्त्या, मोहऱ्यांचा वापर केला. एखाद्या राज्यात सत्ता दुसऱ्या पक्षाच्या हाती असणे भाजपला मान्य नसते. सत्ता मिळवणे हेच राजकीय पक्षाचे एकमेव ध्येय असले पाहिजे आणि त्यासाठी २४ तास प्रयत्नशील राहिले पाहिजे असे भाजप मानतो. त्यातून देशात विद्वेषाचे राजकारण खेळले जाऊ लागले आहे. अन्यथा 'काँग्रेसमुक्त भारत' वा 'ममतामुक्त पश्चिम बंगाल' हे नारे भाजपला सुचलेच नसते. यापूर्वीही केंद्रात भाजपची सत्ता होती, पण तेव्हा भाजपच्या एकाही नेत्याला दुसरा पक्ष समूळ नष्ट करावा असे वाटले नव्हते. मोदींच्या नेतृत्वाखालील भाजपलाच 'अखंड भगवा' फडकावण्याची घाई झालेली दिसली!



राज्या-राज्यांत सत्ता आणायची असेल तर साम-दाम-दंड-भेद या चारही आयुधांचा वापर करणे गैर नसल्याचे भाजपने सिद्ध केले आहे. भाजपच्या जुन्याजाणत्या नेत्याने राज्यातील नेत्याला सबुरी सल्ला देत विचारले की, ''विरोधकांच्या मागे 'ईडी'चा ससेमिरा कशासाठी लावता? त्यांची सत्ता आली तर तेही बदला घेण्याचेच राजकारण करतील''... त्यावर, सध्याच्या राजकारणात 'ईडी'चा वापर केलाच पाहिजे, असे राज्यातील नेत्याचे प्रत्युत्तर होते. या नेत्याने 'बदला राजकारणा'चे पूर्ण समर्थन केले होते. राज्यातील अनेक नेते 'ईडी'ला घाबरूनच भाजपमध्ये गेले आहेत वा 'हनुमान चालीसा'चा नारा देत भाजपची पाठराखण करू लागले आहेत! केंद्रामध्ये काँग्रेसची सत्ता असताना गुजरातमधील नेत्याला १०० दिवस तुरुंगात टाकले होते, त्याचा बदला या नेत्याने केंद्रात भाजपची सत्ता आल्यानंतर कसा घेतला हे सगळ्यांनी पाहिले. ''तुम्ही आम्हाला १०० दिवस तुरुंगात टाकले तर, आम्ही तुम्हाला ११० दिवस तुरुंगात टाकू,'' हा इशारा त्याने खरा करून दाखवला. 'फार प्रसिद्धीच्या मागे लागू नको, किंमत चुकवावी लागेल' असे भाजपमधील नेते एकमेकांना सांगत असतील तर त्यामागे कोणती तरी भीती असू शकेल. आणि मग, असे असेल तर भाजपच्या नेत्यांचे दुसऱ्या पक्षातील नेत्यांशी वैयक्तिक सौहार्दाचे संबंध तरी कसे असू शकतील? या संबंधांवरही शंका घेतली जाणार नाही हे कशावरून? मग, 'विद्वेषाचे राजकारण करणे' हेच पक्षात आणि राजकारणात टिकून राहण्याचा एकमेव मार्ग बनला असेल तर आश्चर्य कशाला वाटावे?

अलीकडे भाजपने वापरलेले डावपेच इतर पक्षही वापरू लागले आहेत. दिल्लीत तेजिंदरपाल बग्गा प्रकरणात हाच विद्वेष दिसला. बग्गा यांनी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर जहाल टिप्पणी केल्यामुळे अटकेच्या कारवाईशिवाय 'आप'ला शांती मिळणार नव्हती. त्यांनी पंजाब पोलिसांना दिल्लीत पाठवले. आपलेच आयुध आपल्या विरोधात वापरले जात असल्याचे लक्षात आल्यानंतर, भाजपने दिल्ली पोलिसांना कामाला लावले, त्यांनीही बरहुकूम पावले उचलली. हरियाणात भाजपचेच सरकार... तिथल्या पोलिसांनीही बरहुकूम कारवाई केली. आप सरकारच्या ताब्यातील पोलिसांना केंद्राच्या आणि हरियाणाच्या अखत्यारीतील पोलिसांनी घेराव घातला. मुख्यमंत्र्यांवर टिप्पणी केली म्हणून 'आप'ला तातडीने कारवाई करावीशी वाटली आणि आमच्या नेत्याला हात लावण्याचे धाडस केले कसे, असा अहंभाव दाखवत भाजपने पलटवार केला. त्यासाठी तीनही ठिकाणच्या पोलिसांचा प्याद्यासारखा वापर केला गेला. सत्ताधारी नेत्याविरोधात बोलण्याची किंमत 'राजद्रोहा'ने चुकवावी लागते. उत्तर प्रदेशापासून महाराष्ट्रापर्यंत सत्ताधाऱ्यांना टीकाकारांवर अत्यंत टोकाचा गुन्हा दाखल करावासा वाटतो हे विद्वेषाचे राजकारण नसेल तर नेमके काय आहे? शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी अगदी वैयक्तिक टीका-टिप्पणी केली म्हणून शरद पवारांनी कधी ठाकरेंविरोधात गुन्हा दाखल केल्याचे पाहिले नाही. हे बदला घेण्याचे, विद्वेषाचे राजकारण केंद्रात मोदी सरकार आल्यानंतर सुरू झाले आहे, हे कोणालाही नाकारता येणार नाही. त्यापूर्वी फक्त तमिळनाडूमध्ये द्रमुक व अण्णाद्रमुक यांनी एकमेकांविरोधात इतके टोकाचे राजकारण केलेले पाहिले होते.

### उजवी 'अवकाश'भरणी?

बग्गा प्रकरणाने अधिक गंभीर मुद्दा ऐरणीवर आणला आहे. पंजाबमध्ये सत्ता आल्यानंतर 'काँग्रेस नव्हे, आम्हीच भाजपला पर्याय' अशी आक्रमक भूमिका 'आप'ने घेतली. देशातील विरोधी पक्षांचा अवकाश आम्ही व्यापू शकतो, असा दावा 'आप'ने केलेला आहे. विरोधकांचा अवकाश आपल्या विचारांशी साधर्म्य असणाऱ्या वा समांतर विचारांच्या पक्षांनी भरून काढला पाहिजे, या विचाराने यापूर्वीही राजकारण होत होते. पूर्वी केंद्रात काँग्रेसची सत्ता असताना विरोधकांची जागा समाजवादी वा कम्युनिस्ट वा तत्सम डाव्या विचारांचे पक्ष भरून काढत. त्या काळात लोकसभेत भाजपला जेमतेम दोन जागा जिंकता आल्या होत्या. विरोधकांचा परीघ उजव्या वा अतिउजव्या विचारांच्या पक्षांनी भरून काढला जात नव्हता. केंद्रात सत्तेतील पक्ष डाव्या विचारांकडे झुकलेला मध्यममार्गी तर विरोधकांमध्येही डाव्या विचारांचे पक्ष. पण, कालांतराने ही जागा उजव्या विचारसरणीचा आधार घेणाऱ्या भाजपने भरून काढायला सुरुवात केली. भाजप केंद्रात सत्तेत आल्यानंतर राजकारणाचा लोलक पूर्णपणे उजव्या बाजूला झुकला. मग, केंद्रात कडव्या हिंदुत्वाचा आधार घेत धर्माचे राजकारण करणारा भाजप तर विरोधकांमध्ये मध्यममार्गी काँग्रेस आणि अन्य पक्ष असे चित्र दिसू लागले. कमकुवत बनलेल्या काँग्रेसमुळे विरोधकांचा अवकाश सौम्य हिंदुत्वाच्या विचारांनी भरून काढण्याची प्रक्रिया सुरू झाली. देशाच्या राजकारणातील विरोधकांच्या अवकाशातून डावीकडे झुकलेल्या मध्यममार्गी काँग्रेसला बाहेर काढून सौम्य हिंदुत्वाचा आधार घेणाऱ्या 'आप'ला भरून काढायचा आहे. बग्गा प्रकरणातून 'आप' कडव्या भाजपविरोधाचे राजकारण करताना दिसते. दिल्ली महापालिका निवडणूक वा गुजरात विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने 'आप'चा भाजपविरोध पुनःपुन्हा उफाळून आलेला दिसेल. या सगळ्या रणनीतीतून भाजपविरोधात तृणमूल काँग्रेस वा द्रमुक वा काँग्रेसऐवजी 'आप' असा राजकारणातील दिशा बदल होण्याची शक्यता 'आप'कडून सातत्याने मांडली जात आहे. डावे पक्ष वा मध्यममार्गी पक्षांऐवजी विरोधकांचा अवकाश 'आप'सारख्या सौम्य हिंदुत्ववादी पक्षानी भरून काढला तर भाजपच्या राजकारणासाठी हा बदल पूरक ठरेल. त्यामुळे 'आप'चा भाजपविरोधी आक्रमकपणा भाजपला लाभाचा असेल. याचा अर्थ भाजप वा 'आप'चे विद्वेषाचे वा बदला घेण्याचे राजकारण हा देखावा नव्हे. भाजपने देशातील राजकारणाची संस्कृती बदलून टाकली आहे, आता एकमेकांविरोधात अतिटोकाची भूमिका घेतली जाईल. काँग्रेसची जागा घेण्यासाठी 'आप'ला भाजपविरोधात आक्रमक व्हावे लागेल. मध्यममार्गी वा डाव्या पक्षांचे राजकारण कायमस्वरूपी संपुष्टात आणण्यासाठी भाजपही अतिटोकाचे राजकारण करत राहील. पण, हे करत असताना दीर्घकालीन पूरक राजकारणाचे आराखडे आखले जात असतात. संघ आणि भाजप नेहमीच दीर्घकालीन राजकारणाचा विचार करतात, मग 'आप'ची उपयुक्तता भाजपच्या लक्षात आली नसेल असे कोण म्हणेल? राजकारणामध्ये उभे-आडवे धागे विणले जात असतात. देशात होत असलेल्या विद्वेषाच्या राजकारणामधील आडवे धागेही भाजपविरोधकांना लक्षात घ्यावे लागणार आहेत. विरोधकांचा अवकाश सौम्य हिंदुत्ववादी पक्षांच्या हवाली न करण्याची जबाबदारी डाव्या-मध्यममार्गी पक्षांचीच असेल.

mahesh.sarlashkar@expressindia.com

## विश्लेषण

# गर्भपाताचा अधिकार धोक्यात?

भक्ती बिसुरे

**अमेरिकेत १९७३** मध्ये गर्भपाताचा अधिकार घटनात्मक करण्यात आला. आता ५० वर्षांनंतर अमेरिकी स्त्रियांचा गर्भपाताचा अधिकार नष्ट होणार, अशी शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे तेथील समाजात अस्वस्थता आहे. हे प्रकरण नेमके काय आहे, त्याचा आढावा-

### गर्भपाताच्या कायद्याबाबत नेमके काय घडले?

गर्भपाताला कायदेशीर मान्यता देणाऱ्या 'रो विरुद्ध वेड' या ऐतिहासिक खटल्याचा निर्णय रद्दबातल करावा का यासंदर्भात अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने तेथील सर्व न्यायालयांचे प्रस्ताव मागवले होते. बहुतांश न्यायालयांनी या प्रस्तावाच्या बाजूने आपले मत दिले. पण त्यासंदर्भातला अहवाल फुटला आणि 'पोलिटिको' या संकेतस्थळावर प्रसिद्ध झाला. अमेरिकी न्यायालये रो विरुद्ध वेड खटल्याचा निर्णय रद्दबातल करण्याच्या तयारीत आहेत, परिणामी अमेरिकन महिलांना १९७३ पासून मिळालेला गर्भपाताचा अधिकार डावलला जाण्याची शक्यता आहे, हे समजल्यावर अमेरिकेत खळबळ उडाली. नागरिकांनी वॉशिंग्टनमधील सर्वोच्च न्यायालयाबाहेर मोठ्या संख्येने आपला निषेध व्यक्त केला. वेगवेगळ्या चौकटीतील महिला मतभेद विसरून या मुद्द्यावर एकत्र येताना दिसत आहेत. गर्भपाताचा अधिकार अबाधित राखण्यासाठी लढा देण्याचा मनोदय अमेरिकी समाजाकडून व्यक्त होत आहे.

### कायदा नेमका काय आणि तो कसा अस्तित्वात आला?

नॉर्मा मॅकॉर्व्हे ऊर्फ जेन रो या टेक्सासमध्ये राहणाऱ्या स्त्रीला १९६९ मध्ये तिसऱ्यांदा गर्भ राहिल्यावर गर्भपात करायचा होता. अमेरिकेत तेव्हा आईच्या जिवाला धोका असेल तरच गर्भपाताला कायदेशीर परवानगी होती. अशा परिस्थितीत टेक्सासमधील गर्भपातविषयक कायदे कालबाह्य आहेत, असा आरोप करत जेनची वकील सारा वेडिंग्टनने अमेरिकन फेडरल कोर्टाचे स्थानिक न्यायाधीश हेन्री वेड यांच्याविरोधात खटला दाखल केला. टेक्सासच्या मॉडर्न डिस्ट्रिक्ट कोर्टाच्या तीन न्यायाधीशांच्या पीठाने या खटल्यात जेनच्या बाजूने निकाल दिला. त्यानंतर टेक्सास न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. जानेवारी १९७३ मध्ये अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयानेही जेनच्याच बाजूने निर्णय दिला. गर्भ ठेवायचा की नाही, याबद्दलचा निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार संबंधित स्त्रीला असून गर्भधारणेच्या पहिल्या तीन महिन्यांत सरकार त्यांना कोणत्याही कारणास्तव अडवू शकत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. गर्भधारणेच्या दुसऱ्या तिमाहीत सरकार काही प्रमाणात हस्तक्षेप करू शकते तर तिसऱ्या तिमाहीत आईच्या जीवाला धोका असेल तर तो वाचवणे एवढ्या एका कारणासाठीच सरकारला संबंधित स्त्रीला गर्भपाताला परवानगी देता येईल असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. या कायद्याने अमेरिकेत प्रचंड वादविवाद निर्माण केला. अशा पद्धतीने गर्भपाताला परवानगी असू नये असे मत असणारे आणि गर्भपात करणे हा संबंधित स्त्रीचा वैयक्तिक प्रश्न असून शासन यंत्रणा तिच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या परिघात प्रवेश करू शकत नाही, आणि तिचा गोपनीयतेचा अधिकार हिरावून घेऊ शकत नाही, असे मत असणारे अशा दोन्ही बाजू एकमेकांना भिडल्या. व्यक्तिस्वातंत्र्य, गोपनीयतेचा मुद्दा अधोरेखित करणारा हा खटला 'रो विरुद्ध वेड' खटला म्हणून ओळखला जातो.




### अमेरिकेत या वादाचे पडसाद काय आहेत?

मे २०२१ मध्ये गॅलप या अमेरिकी कंपनीने केलेल्या सर्वेक्षणात बहुसंख्य अमेरिकी जनता गर्भपाताच्या अधिकाराच्या बाजूने उभी असल्याचे दिसते. त्यात ८० टक्के अमेरिकन या निर्णयाच्या बाजूने आहेत. १९७५ मध्ये हे प्रमाण ७६ टक्के एवढे होते. प्यू रिसर्च सेंटरच्या मते ५९ टक्के सज्ञान व्यक्ती गर्भपात कायदेशीर असावा असे मानतात. गर्भपात नैतिक आहे असे मानणाऱ्यांचे प्रमाण मे २०२१ च्या सर्वेक्षणात सर्वाधिक म्हणजे ४७ टक्के एवढे दिसून आले आहे. अमेरिकेच्या सिनेटने एका निवेदनाद्वारे आपण या विरोधात असून तसा निकाल लागलाच तर तो अत्यंत दुर्दैवी आणि निषेधार्ह असेल असे म्हटले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनीही ट्विटरवर आपली प्रतिक्रिया नोंदवली असून, त्यामध्ये 'महिलांचा निवडीचा अधिकार हा मूलभूत आहे असे मी मानतो. गर्भपाताचा अधिकार हा गेली ५० वर्षे अमेरिकन भूमीमध्ये रुजलेला आहे. आमच्या कायद्याची ओळख आणि पारदर्शकता दर्शवणारा हा अधिकार रद्द होणे योग्य नाही, याबाबत येईल त्या निर्णयचा सामना करण्यास आम्ही तयार असू' असे स्पष्ट केले आहे.

### या वादात कोण कायद्याच्या बाजूने कोण विरोधात?

रो विरुद्ध वेड खटल्याचा निकाल रद्दबातल होण्याबाबतच्या चर्चांना उधाण आले असतानाच अमेरिकेतील कोणते गट वर्षानुवर्षे महिलांचा गर्भपाताचा कायदा मान्य करतात आणि कोणते गट त्या विरोधात आहेत हे पाहणे रंजक आणि महत्त्वाचे आहे. ८७ टक्के नागरिक गर्भवती महिलेचा जीव धोक्यात असल्यास गर्भपात करण्याच्या मताचे आहेत तर ७४ टक्के नागरिक जन्माला येणाऱ्या बाळाला गंभीर आजार किंवा व्यंग असेल तर गर्भपात करण्याच्या मताशी सहमत आहेत. डेमोक्रॅट पक्षाचे प्रतिनिधी गर्भपात अधिकाराच्या बाजूचे आहेत. रिपब्लिकन्समध्ये हे प्रमाण अवघे ३९ टक्के एवढे आहे. ८२ टक्के निधर्मी नागरिक गर्भपाताच्या बाजूने आहेत तर ७७ टक्के प्रोटेस्टंट्स गर्भपाताच्या संपूर्ण विरोधात आहेत. ६२ टक्के महिला गर्भपाताचा अधिकार हवा असे मानतात तर ५६ टक्के पुरुष तो कशाला हवा या विचाराचे आहेत. कृष्णवर्णीयांमध्ये गर्भपाताचा अधिकार मानणाऱ्यांचे प्रमाण ६७ टक्के, आशियाई अमेरिकनांमध्ये ते ६८ टक्के तर हिस्पॅनिक्समध्ये ते जेमतेम ५७ ते ५८ टक्के एवढे आहे. वाढत्या वयाबरोबर नागरिकांमधील गर्भपाताच्या अधिकाराला असलेले समर्थन कमी होत गेल्याचे काही सर्वेक्षणांमधून समोर आले आहे.

### यासंदर्भात काय होण्याची शक्यता आहे?

'पोलिटिको' या संकेतस्थळाच्या हाती लागलेल्या निर्णयाच्या प्रतीतील माहितीवरून गर्भपात करू इच्छिणाऱ्यांवर अनावश्यक ताण आणला न जाण्याची शक्यता आहे. मात्र, रो आणि नियोजित पालकत्वाबाबतच्या १९९२ च्या खटल्याचा निर्णय रद्द होण्याची शक्यता आहे. अमेरिकेत सध्या गर्भपात कायदेशीर आहे, मात्र जून महिन्यात याबाबत निर्णय जाहीर होण्याची शक्यता आहे.

bhakti.bisure@expressindia.com

## अन्वयार्थ

# स्वातंत्र्य नाकारणारे तपशील

**हैदराबाद येथील** हत्येची घटना अनेक तपशिलांमुळे चर्चेत आली. नागराजू हा दलित समाजातील तरुण. त्याने आशरीन सुलताना या मुलीशी लग्न केले म्हणून तिच्या भावाने तिच्या देखत, भर बाजारात चाकूचे वार करून त्याला मारले. तेव्हा आशरीन एकटीच, तिच्या हिंसाधुंद भावाला रोखण्याचा प्रयत्न करत होती. हा प्रकार पाहात थांबलेल्या जमावातील माणसांना ती मदतीचे आवाहन करत होती, पण कोणीही मध्ये पडेना. अखेर रक्तबंबाळ नागराजू निश्चेष्ट पडल्यावरच हा हिंसाकल्लोळ थांबला. हे सारे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी टिपले. नागराजू नुकताच पंचविशी गाठलेला, मोटारींच्या एका विक्रीदालनात नोकरीला होता. त्याच्यावर वार करणारा सय्यद मोबिन अहमद हा फळविक्रेता. बहिणीने परधर्मीयाशी, तेही तथाकथित खालच्या जातीच्या मुलाशी लग्न करणे पसंत नव्हते, या मोबिन अहमदला. म्हणून स्वतःच्या भवितव्याची पर्वा न करता त्याने हे टोकाचे पाऊल उचलले. मोबिन आणि त्याच्या साथीदाराला दुसऱ्याच दिवशी पोलिसांनी ताब्यात घेतले. मोबिन किंवा त्याचा साथीदार मसूद अहमद हे या आरोपांतून सुटण्याएवढे धनाढ्य नाहीत की त्यांचे राजकीय लागेबांधे नाहीत. त्यामुळे ही 'फाइल' कदाचित विनाविलंब आणि सरळपणेच मिटेल आणि शिक्षा होईल वगैरे. राजकारणासाठी-देखील ही घटना कितपत उपयोगी पडेल कोण जाणे. 'लव्ह जिहाद' म्हणून जी ओरड सुरू असते त्यात आपल्या पोरीबाळींना भुलवून मुसलमान लोकसंख्या वाढवताहेत, हा प्रचार केला जातो. इथे मात्र प्रकरण वेगळेच. पण मुसलमान माणसाने हिंदू तरुणाला मारले म्हणून या मृत तरुणाचा कैवार घ्यावा तर मुळात त्याने मुसलमान मुलीशी लग्न केलेले. थोडक्यात, हिंदूंना राजकारणासाठी ही घटना फारशी उपयुक्त ठरणारी नाही. दोनच वर्षांपूर्वी नलगोंडा जिल्ह्यात अशीच हत्या- तीही कॅमेऱ्यांसमोर- घडली होती पण त्या घटनेतील मृत तरुण, त्याची पत्नी आणि वार करणारा तिचा भाऊ हे सारे जण हिंदूच होते. त्या वेळी तो जसा कौटुंबिक मामला मानला गेला, तसे आताही होईल. मात्र अनपेक्षितपणे, हैदराबादचे खासदार आणि एमआयएम या पक्षाचे नेते असदुद्दीन ओवैसी यांनी नागराजूच्या हत्येचा निषेध करण्याची संधी सर्वांआधी घेतली. झाले ते चुकीचेच आहे, हा खूनच आहे आणि आरोपीला शिक्षा व्हायलाच हवी, हे सांगताना ओवैसी यांनी मुस्लीम विवाह कायदा आणि हिंदू विवाह कायदा यांचाच उल्लेख केला. वास्तविक धार्मिक प्रथांशी संबंध न ठेवता नोंदणी पद्धतीने विवाह करता येतो. पण याचा उल्लेख ओवैसींच्या भाषणात नव्हता, तसेच 'कुराणातही खुनाचा गुन्हा अतिहीन मानला जातो', यावर त्यांचा भर होता. हेही राजकारणच, हे निराळे सांगायला नको. या वेळी ती संधी ओवैसी यांनी साधली इतकेच.



आजही कुटुंबातील मुलीला, महिलांना वस्तूच नव्हे तर मालमत्ता समजले जाते, लोकसंख्यावाढीचे साधन मानले जाते आणि हे साधन दुसऱ्या धर्मासाठी, दुसऱ्या जातीसाठी वापरले जाणे हा कुटुंबाचा, जातीचा किंवा धर्माचाही अपमान मानला जातो. मग त्याची शिक्षा मुलीला, तिच्या नवऱ्याला किंवा दोघांना दिली जाते. याला पोलीस 'कौटुंबिक वाद' समजतात, तर धर्म पाहून हल्लीचे हिंदुत्ववादी 'लव्ह जिहाद' समजतात. असल्या घटनांतून सामाजिक वावटळी उठवण्यासाठी तपशीलच महत्त्वाचे ठरत असतात. जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य- जे आता कायद्याने धर्म वा जातच नव्हे तर भिन्न लैंगिकतेची अटही ठेवत नाही, ते डावलले जात असताना समाज गप्पच राहातो... नागराजूवर वार होत असताना बघे गप्प राहिले, तसा.

# अस्थिर बाजारात गरज सबुरीची!

आर्थिक क्षेत्रात यशस्वी होण्यास हुशार किंवा व्यावहारिकदृष्ट्या तरबेज असणे गरजेचे नसून, संयम आणि शिस्तबद्धता अधिक फायदेशीर ठरते. सध्याच्या अस्थिर बाजार स्थितीत सर्वांनी लक्षात घ्यावयाचा हा अत्यावश्यक मंत्रच...



'करूया अर्थनिग्रह'

**भक्ती रसाळ**

रिझर्व्ह बँकेकडून अचानक व्याजदरात वाढ घोषित झाल्याने गेल्या आठवड्यात भांडवली बाजाराने तीव्र नाराजी नोंदविली. तातडीची बैठक घेऊन झालेली दरवाढ ही म्युच्युअल फंड व्यवस्थापक वर्गालादेखील अनपेक्षित होती. एकंदरीत सध्या अनपेक्षित घटनांची मालिकाच सुरू आहे, त्यात ही नवीन भर. सामान्य गुंतवणूकदार वर्ग तीव्र महागाईने त्रस्त असताना गुंतवणुकांवरील लाभातही घट सोसत आहे. मुळात हा तोटा 'आभासी' नफ्यातील आहे! दीर्घावधीत भांडवली बाजार सदैव अपेक्षित परतावा देतोच. सामान्य गुंतवणूकदारांना जोखमींचे मूल्यमापन करून स्वतःच्या जीवनलक्ष्यांववर भिस्त ठेऊन भांडवली बाजाराशी संलग्न गुंतवणुका करणे हिताचे ठरते.

कुटुंबाच्या आर्थिक उद्दिष्टांवर आधारित नियोजन अस्थिर भांडवली बाजारात विश्वासार्ह उपापयोजना ठरते. तुमच्या ठरावीक अवधीनुसार आपले उद्दिष्ट साध्य होत आहे का, याचा सतत आढावा घेत राहायला हवा. अशा प्रकारचे पुनरावलोकन हे बाजारात अधेमधे होणाऱ्या पडझडीतून गुंतवणूकदारांच्या आर्थिक नियोजनाची घडी विस्कटणार नाही याची काळजी घेते.

**म्युच्युअल फंडातील कमी जोखमीचे अथवा अस्थिर भांडवली बाजारात उपलब्ध सोयीस्कर पर्याय –**

**१ बॅलन्स्ड अॅडव्हान्टेज फंड (बीएएफ)–**

सामान्य गुंतवणूकदाराला बाजारातील अस्थिरता, जागतिक जोखीम अशा संकटांचा अंदाज बांधणे अशक्य असते. बदलत्या भांडवली बाजारात म्युच्युअल फंड व्यवस्थापक अशा जोखमींचा अभ्यासपूर्वक अंदाज घेऊन योग्य ते बदल त्यांच्या चालू योजनेतील गुंतवणुकांमध्ये करतात. हे योजनेतील फेरबदल बाजारातील घडामोडींना सत्वर प्रतिसाद म्हणून वेगाने होत असतात. अस्थिर वातावरणात अशा फंडांमधील गुंतवणूक ही जोखीम व्यवस्थापनाकरिता उपयुक्त ठरते. हायब्रिड बॅलन्स्ड फंड, इक्विटी सेव्हिंग्ज फंड या सारख्या पर्यायांमध्ये समभागांतील गुंतवणुकीबरोबरीने कमी जोखीम असणाऱ्या गुंतवणूक साधनांचाही समावेश असल्याने, त्यांना बाजारातील अस्थिरतेवर मात करणे शक्य होते.

**२ रिस्कोमीटर –**

साधारणपणे गुंतवणूकदार योजनेची श्रेणी पाहून सर्वोत्कृष्ट योजनेत गुंतवणूक करतात. परंतु जोखमींच्या संकेतांकांकडे दुर्लक्ष करतात. 'रिस्कोमीटर' त्या फंडातील जोखमीचा स्तर दर्शविते. 'सेबी'ने घालून दिलेल्या नियमांनुसार 'रिस्कोमीटर' सहा विविध स्तरांनुसार, जोखमीचे सौम्य व तीव्र स्वरूप दर्शविते. 'सेबी'ने आखून दिलेले मापदंड छोट्या गुंतवणूकदारांचे नुकसान होऊ नये यासाठी आहेत. त्यामुळे आपल्या मेहनतीचा पैसा गुंतविताना 'रिस्कोमीटर'वरील जोखमीचा स्तर अवश्य अभ्यासावा.



## अस्थिर बाजारात 'एसआयपी' -

दीर्घकालीन उद्दिष्ट साध्य करण्याकरिता 'एसआयपी' सर्वोत्तम माध्यम आहे. बाजारातील अस्थिरता, चलनवाढ, कालावधी यावर दीर्घकालीन 'एसआयपी' गुंतवणुकीचा परतावा हमखास मात करतो. प्रत्यक्षात बाजारातील चढ-उतार हे सरासरीचा नियम लागू होऊन 'एसआयपी' गुंतवणूकदारास लाभाची संधी निर्माण करीत असतात. एसआयपी संयमाने दीर्घकाळ चालू ठेवणे गरजेचे आहे. तथापि ठरावीक मुदतीत या गुंतवणुकीतून मिळणारा परतावा ठरविलेल्या उद्दिष्टांपर्यंत पोहोचण्यास मदतकारक ठरत आहे काय, याचे नियतकालिक पुनरावलोकन मात्र आवश्यक आहे.

जोखमींच्या स्तर काय तो जाणून घ्या, त्यानुसार म्युच्युअल फंडांत योजनांची वर्गवारी उपलब्ध आहे. अस्थिर भांडवली बाजारात जोखमींच्या तीव्र किंवा सौम्य श्रेणीनुसार, गुंतवणुका करणे क्रमप्राप्त बनले आहे. योग्य जोखीम विभाजनासाठी पूरक ठरतील अशा जवळपास ३६ प्रकारात म्युच्युअल फंडांचे सध्या वर्गीकरण केले गेलेले आहे. गुंतवणूकदारांनी या वर्गीकरणाद्वारे योग्य श्रेणीतील फंड हा आपले जीवनलक्ष्य आणि उपलब्ध कालावधीनुसार निवडणे अपेक्षित आहे. कुटुंबाच्या जीवनलक्ष्यांचे अंदाजपत्रक मांडून, त्या खर्चाशी निगडित चलनवाढीचा दर लक्षात घेऊन डोळसपणे पैसा गुंतविणे, शिस्तबद्ध पद्धतीने ठरलेली उद्दिष्टे निरंतर पाठपुराव्याने साध्य करणे, केवळ संयम बाळगूनच शक्य आहे.

इंटरनेटवरून मिळणाऱ्या माहितीच्या आधारावर गुंतवणूक करणे जास्त जोखमीचे ठरल्याचे दिसून येते. सध्याच्या अस्थिर वातावरणात आर्थिक सल्लागाराशिवाय केल्या गेलेल्या गुंतवणुका जास्त तोट्यास निमंत्रण ठरत आहेत, ते यामुळेच. भांडवली बाजारातील गुंतवणुका या झटपट श्रीमंती मिळविण्याचा मार्ग नव्हे. आर्थिक नियोजनाचा पाया शिस्त आणि संयम आहे. ज्या गुंतवणूकदारांची जोखीम घेण्याची क्षमता कमी आहे त्या वर्गासाठी देखील कमीत कमी जोखीम असलेल्या गुंतवणुकांचे पर्याय उपलब्ध आहेत. छोटे व नवखे गुंतवणूकदार, ज्येष्ठ नागरिक यांनी असे मार्ग अनुसरण्यास हरकत नाही. गुंतवणुकांचे ध्येय हे विक्रमी परतावा मिळविणे नसून, स्वतःचे आर्थिक जीवनलक्ष्य ठरावीक मुदतीत साध्य करणे आहे, हे लक्षात घ्या. गुंतवणूकदारांनी

**३ दिशाभूल केली जाण्यापासून सावधता –**

सध्या व्हॉट्सअॅप, यूट्युब व तत्सम समाजमाध्यमांद्वारे कोणताही खात्रीदायक पुरावा नसताना अनेक प्रकारची माहिती व मजकूर आपल्यापर्यंत येऊन सारखा धडकत असतो. अशा कमअस्सल माहिती व अफवांचे आयुष्यमान अत्यल्प असले तरी त्याच्या प्रभावातून होणारी दिशाभूल मात्र घातक ठरू शकते. कोणत्याही आर्थिक घडामोडीशी निगडित नकारात्मक बातमी गुंतवणूकदारांना भरकटवू शकते. संपूर्ण खात्री केल्याशिवाय अशी माहिती वाचून त्याबरहुकूम निर्णय घेणे हे कधीही जास्त जोखमीचे ठरते.

आर्थिक क्षेत्रात यशस्वी होण्यास हुशार किंवा व्यावहारिकदृष्ट्या तरबेज असणे गरजेचे नसून, संयम आणि शिस्तबद्धता अधिक फायदेशीर ठरते. आर्थिक नियोजनाच्या सफलतेसाठी गुंतवणूकदारांची भावनिक सशक्तता ही जास्त पोषक असते.

*लेखिका पात्रताधारक वित्तीय नियोजनकार आणि व्यावसायिक विमा सल्लागार*
bhakteerasal@gmail.com

# ग्रोथ की व्हॅल्यू?



'जाहल्या काही चुका...'

**वसंत कुळकर्णी**

समभाग गुंतवणुकीत ग्रोथ आणि व्हॅल्यू या दोन मूलभूत गुंतवणूक पद्धती आहेत. 'ग्रोथ' पद्धतीत गुंतवणूकदार अशा कंपन्यांचा शोध घेतात ज्यांच्या उत्सर्जनात (अर्निंग) सातत्याने वाढ होत असते. तर 'व्हॅल्यू' गुंतवणूकदार अशा कंपन्यांच्या शोधात असतात ज्यांचे मूल्य (बाजारभाव नव्हे) गुंतवणूकयोग्य पातळीवर आहे.

या दोन्ही शैली एकमेकांना पूरक असल्यामुळे, सर्वसाधारणपणे त्यांचा एकत्र वापर होताना दिसतो. या दोन्ही शैली पोर्टफोलिओमध्ये विविधता आणण्यात मदत करतात. ढोबळमानाने मिडकॅप आणि स्मॉलकॅप फंड हे 'ग्रोथ' पद्धतीचे प्रतिनिधित्व करतात तर लार्जकॅप आणि व्हॅल्यू फंड हे 'व्हॅल्यू' रणनीतीची उदाहरणे आहेत. विस्तृत बाजार मूल्यांकनापेक्षा कमी मूल्यांकन असलेल्या कंपन्यांचा शोध घेत निधी व्यवस्थापक गुंतवणूक करतात. अनेकदा कंपन्यांच्या उत्सर्जनात अपेक्षित वृद्धी न दिसणे, नकारात्मक प्रसिद्धी किंवा कायदेशीर समस्या, या व अशा अनेक कारणांनी कंपनीच्या नजीकच्या काळातील उत्सर्जनाबाबत शंका निर्माण होऊन बाजारभावात घसरण झाल्याने 'ग्रोथ स्टॉक'चे परिवर्तन 'व्हॅल्यू स्टॉक'मध्ये होते. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या करोनाच्या सुरुवातीच्या काळात 'व्हॅल्यू स्टॉक' होत्या. करोना ऐन भरात असताना त्यांच्या मूल्यांत झालेल्या वाढीमुळे त्या कंपन्या 'ग्रोथ स्टॉक' झाल्या. तर अलीकडच्या घसरणीने ते पुन्हा 'व्हॅल्यू स्टॉक' झालेले दिसत आहेत.

सतत उत्सर्जनात वाढ झाल्याने कंपन्यांच्या बाजारभावात पराकोटीची वाढ होते. एखाद्या तिमाहीत समाधानकारक वाढ न झाल्याने बाजारभावात घसरण संभवते. व्यापक बाजारपेठ अस्थिर असताना 'ग्रोथ स्टॉक' विकत घेण्यात धोका असतो. कंपनीबद्दलच्या एखादी नकारात्मक बातमी कंपनीच्या बाजारभावात मोठ्या घसरणीला कारण ठरू शकते.

नवीन आर्थिक वर्ष सुरू होताना निफ्टीने १८,००० चा टप्पा ओलांडला. ही तेजी जेमतेम आठवडाभर टिकली नसली तरी, कंपन्यांच्या भविष्यातील उत्सर्जनाबाबत गुंतवणूकदारांना खात्री वाटत नसल्याने विदेशी गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणात विक्री केली. साहजिकच निर्देशांकांचा 'पी/ई' वरच्या पातळीवर असल्याने नव्याने गुंतवणूक करण्याबाबत संदिग्धता निर्माण झाली आहे. सातत्याने मागील दोन वर्षांत, 'एमएससीआय ग्रोथ निर्देशांका'ने आर्थिक वर्ष २०२१ आणि २०२२ मध्ये अनुक्रमे ९० टक्के आणि १६ टक्के नफा मिळवून दिला आहे. 'एमएससीआय व्हॅल्यू निर्देशांका'ने आर्थिक वर्ष २०२१ आणि २०२२ मध्ये अनुक्रमे ५६ टक्के आणि १७ टक्के नफा मिळवून दिला आहे. 'एमएससीआय ग्रोथ निर्देशांक' रोज नवीन उच्चांक गाठत असताना गुंतवणूकदारांनी आर्थिक वर्ष २०२३ साठी कोणत्या रणनीतीचा अवलंब करावा, 'ग्रोथ' की 'व्हॅल्यू'?

समष्टी अर्थशास्त्राचा (मॅक्रो इकोनोमिक्स) विचार केल्यास, जगभरात महागाई आणि व्याजदर दोन्ही वाढत असल्याने रोख्यांवरील परतावा वाढणे अपरिहार्य आहे आणि परतावा वाढत असल्याचे दिसतही आहे. गेल्या दशकात, रोखे गुंतवणुकीवरील उत्पन्न आणि 'व्हॅल्यू इंव्हेस्टिंग'मध्ये सकारात्मक सहसंबंध दिसून आला आहे. ज्या ज्या वेळी केंद्र सरकारच्या १० वर्षांच्या उत्पन्नात (यील्ड) वाढ झाली आहे, त्या काळात 'एमएससीआय व्हॅल्यू निर्देशांका'ने 'एमएससीआय ग्रोथ निर्देशांका'पेक्षा सरस कामगिरी केली आहे. तसेच १० वर्षांच्या रोखे उत्पन्नात घसरण झाली तेव्हाच्या काळात, 'एमएससीआय व्हॅल्यू निर्देशांक' मोठ्या प्रमाणात घसरलेला दिसून आला. पुढे, सध्याच्या समष्टी अर्थशास्त्राचे चलन हे भविष्यात महागाई आणि व्याज दोन्ही वाढल्याने पुरवठा साखळीत व्यत्यय, त्यामुळे संभाव्य मागणीतील घट अशा दिशेने सुरू आहे. यामुळे कंपन्यांच्या नफ्यावर अंशतः परिणाम होऊन कंपन्यांच्या उत्सर्जनवाढीला खीळ बसेल. करोनापश्चात मजबूत फेरउभारीची अपेक्षा होती. त्यामुळे उत्सर्जनातील वाढीचा अंदाज घेत कंपन्यांची भाववाढ गृहीत धरण्यात आली होती. या भाववाढीची परिपूर्ती झाल्याने आणि वाढत्या महागाईमुळे उत्सर्जनाला खीळ बसल्याने कंपन्यांच्या भावात घसरण संभवते. 'स्टॉक प्राइसेस आर स्लेव्हज ऑफ अर्निंग' असे सुवचन आहे. त्यामुळे 'ग्रोथ'कडून 'व्हॅल्यू'कडे संक्रमित होण्याची हीच वेळ आहे.

रोखे गुंतवणुकीवरील उत्पन्न/ परतावा आणि 'व्हॅल्यू इंव्हेस्टिंग'मध्ये सकारात्मक सहसंबंध दिसून आला आहे. गेल्या दशकात तो अनुभवास आला आणि सध्या जगभरात महागाई आणि व्याजदर दोन्ही वाढत असता, रोख्यांवरील वाढणाऱ्या परताव्यातूनही तो अनुभवास येत आहे. त्यामुळे 'ग्रोथ'कडून 'व्हॅल्यू'कडे संक्रमित होण्याचीदेखील हीच वेळ आहे.




### शिफारसयोग्य 'व्हॅल्यू' म्युच्युअल फंड

| फंड | मालमत्ता (कोटी रुपये) | क्रिसिल रँकिंग |
|---|---|---|
| आयडीएफसी स्टर्लिंग व्हॅल्यू फंड | ४५१४ | टॉप क्वारटाइल |
| टेम्पल्टन इंडिया व्हॅल्यू फंड | ६३३ | टॉप क्वारटाइल |
| एल अॅण्ड टी इंडिया व्हॅल्यू फंड | ७८२८ | अप्पर मिडल क्वारटाइल |
| निप्पॉन इंडिया व्हॅल्यू फंड | ४३९४ | अप्पर मिडल क्वारटाइल |

भारतीय गुंतवणूकदारांसाठी 'व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग'चा अवलंब करणारे १६ फंड उपलब्ध आहेत. यापैकी चार फंडांची शिफारस करीत आहे.

shreeyachebaba@gmail.com
म्युच्युअल फंडातील गुंतवणूक ही बाजार जोखमीच्या अधीन असते. गुंतवणूक करण्यापूर्वी फंडाचे माहितीपत्रक कृपया सखोल अभ्यासा.

# योजना व वेळापत्रक (प्लॅनिंग अँड शेड्यूलिंग)

भाग १



'अर्था'मागील अर्थभान

**डॉ. आशीष थत्ते**

व्यवस्थापनामध्ये योजना आखणे व त्या कार्यान्वित करणे याला अनन्यसाधारण महत्त्व असते. व्यवस्थापनामधील विभागात अथवा शाखेत योजना आखण्यापासूनच कामाला सुरुवात होते. नुसती योजना आखून उपयोग नसून त्याचे वेळापत्रकदेखील अत्यंत महत्त्वाचे असते. योजना आखण्यामध्ये धोरणे ठरवली जातात व कुठल्या प्रक्रिया वापराव्या लागतील याची आखणी केली जाते. तर कुठली क्रिया केल्यावर ही योजना यशस्वी होईल यांची मांडणी वेळापत्रकात केली जाते. म्हणजे खर्च, उत्पन्न, वेळ, लागणारे मनुष्यबळ वगैरे यांची मांडणी केली जाते. किंबहुना कित्येक योजना चांगल्या असतात, मात्र त्याचे वेळापत्रक चुकते आणि चांगली योजना अक्षरशः अपयशी ठरते आणि कंपन्यांना तोटा सहन करावा लागतो. म्हणजे योजना व वेळापत्रक यांची सांगड घालणे फार महत्त्वाचे असते. परत हे सगळे अतिशय औपचारिक पद्धतीनेच करावे लागते.

सोपे उदाहरण म्हणजे बांधकाम करणाऱ्या कंपन्या. अगदी छोटासा पूल बांधण्यापासून ते ९० मजल्यांची इमारत बांधणे. आधी ९० वा मजला बांधतो, नंतर १ ते ८९ बांधू असे करू शकत नाही. म्हणजेच आधी कळस मग पाया असे करून चालत नाही. म्हणजे वेळापत्रक अतिशय चोख असावे लागते. नुसती चांगली योजना असून उपयोग नसतो. उत्पादनाच्या वेळापत्रकात करोनाकाळ सोडला तर सगळे वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून करता येते. मग हे करताना 'बॉटलनेक' म्हणजेच कुठे कुठे संभाव्य अडथळे येऊ शकतात याची जाणीव होते आणि ते कसे पार करायचे याचेदेखील उत्तर शोधावे लागते. अत्याधुनिक संगणक प्रणालीमुळे हे काम थोडे सोपे झाले आहे. तरीही शेवटी योजना व वेळापत्रक आखण्याचे काम माणसांनाच करावे लागते. म्हणजे मे महिन्यात आइस्क्रीमचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांना तसे वेळापत्रक आखावे लागते. अन्यथा आवडते आइस्क्रीम उन्हाळ्यात नाही खायला मिळाले तर काय उपयोग? आता पावसाळा आला की छत्री आणि रेनकोटच्या जाहिरातींचा आधी पूर येतो व पाऊस नंतर येतो. हे सगळे योग्य वेळापत्रक आखले तर कंपन्यांना नफा मिळवून देतात. जेव्हा संसाधनांची कमी असते त्या वेळी वेळापत्रकाचे महत्त्व अधोरेखित होते. सध्या सुरू असणाऱ्या आयपीएलचे वेळापत्रक नक्की बघा. ते अत्यंत चोख असते.



वेळापत्रकामुळे विविध विभागांमध्ये ताळमेळदेखील सुधारतो. प्रत्येक विभागाला त्यांची जबाबदारी आखून दिली जाते. 'ई-कॉमर्स'च्या युगात तर याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. अर्थात अति महत्त्वाकांक्षी वेळापत्रक आखणेदेखील महागात पडू शकते. कंपन्यांमध्ये योजना आणि वेळापत्रकाचे महत्त्व आपण बघितले. पुढील आठवड्यात घरात आपण हे कसे वापरतो ते बघू. तुमच्याकडे याबाबत काही विचार असल्यास जरूर कळवा.

*लेखक कॉस्ट अँड मॅनेजमेण्ट अकाउंटंट म्हणून कार्यरत /*
ashishpthatte@gmail.com

# पिझ्झा ते बिर्याणी, कबाब, मिष्ठान्नांचे लज्जत-वैविध्य



माझा पोर्टफोलिओ

**अजय वाळिंबे**

ज्युबिलंट फूडवर्क्स लिमिटेड (जेएफएल) ही ज्युबिलंट भरतीया समूहाची एक प्रमुख कंपनी आहे तसेच भारतातील सर्वात मोठी खाद्य सेवा कंपनी आहे. कंपनीकडे डॉमिनोज पिझ्झा, डन्किन डोनट्स आणि पोपायेज हे तीन प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय ब्रॅण्ड असून कंपनीला या फूड मार्केट सेगमेंटसाठी मास्टर फ्रँचायझी अधिकार आहेत. कंपनीने चायनीज खाद्यपदार्थ विभागात आपला पहिला स्वदेशी ब्रॅण्ड - होंग्स किचन प्रस्तुत केला असून 'शेफबॉस' या ब्रॅण्ड-मालकीच्या रेडी-टू-कूक श्रेणीचे सॉस, ग्रेव्हीज आणि पेस्ट ऑफर करण्यास सुरुवात केली आहे. तसेच कंपनीने 'एकदम' या आपल्या नवीन ब्रॅण्डद्वारे बिर्याणीच्या रोमांचक जगातही प्रवेश केला आहे. कंपनी कबाब, करी, ब्रेड, मिष्ठान्न आणि शीतपेयांसह भारताच्या विविध भागांमधून तयार केलेल्या बिर्याणीची विस्तृत श्रेणी प्रस्तुत करते. कंपनीची सध्या डॉमिनोज पिझ्झा, डन्किन डोनट्स आणि होंग्स किचनसाठी १५०० हून अधिक दालने असून आज ज्युबिलंट पिझ्झा विभागातील मार्केट लीडर आहे.

ज्युबिलंट फूडवर्क्स लिमिटेडकडे १९९६ पासून, भारतातील डॉमिनोज पिझ्झा रेस्टॉरंट विकसित करण्याचे आणि चालविण्याचे विशेष अधिकार आहेत. ही अमेरिकेबाहेर डॉमिनोज ब्रॅण्डची सर्वात मोठी फ्रँचायझी आहे. याला श्रीलंका, बांगलादेश आणि नेपाळसाठी डॉमिनोज ब्रॅण्डचे विशेषाधिकार देखील प्रदान करण्यात आले आहेत.



कंपनीकडे भारत आणि इतर जवळपासच्या देशांमध्ये स्टोअरचे मोठे नेटवर्क आहे. तिच्याकडे भारतातील ३२२ शहरांतून डॉमिनोजचे १५०० हून अधिक स्टोअर्स, डन्किन डोनट्सचे ३० स्टोअर्स आणि स्वतःच्या होंग्स किचन या ब्रॅण्डची १४ रेस्टॉरंट आहेत. या खेरीज श्रीलंकेत ३२ डॉमिनोज स्टोअर्स आणि बांगलादेशमध्ये ८ डॉमिनोज स्टोअर्स आहेत. सर्व स्टोअरची कच्च्या मालाची मागणी पूर्ण करण्यासाठी भारतभर एकूण आठ पुरवठा साखळी केंद्रे आणि चार वितरण केंद्रांची मालकी आहे. भारतातील लोकसंख्या आणि वाढती मागणी पाहता कंपनी लवकरच ३,००० स्टोअर्सचा टप्पा पार पाडेल.

गेल्या तिमाहीत १,२११ कोटी रुपयांच्या उलाढालीवर १३४ कोटीचा नक्त नफा कमावणाऱ्या या कंपनीचे मार्च २०२२ अखेर संपणाऱ्या आर्थिक वर्षाचे निकाल अजून जाहीर व्हायचे आहेत. मात्र हे निकाल चांगलेच असतील अशी अपेक्षा आहे. काही दिवसांपूर्वी कंपनीने शेअरचे दर्शनी मूल्य घटवून ते दोन रुपयांवर आणले गेल्याने सध्या कंपनीचा शेअर ४९० रुपयांच्या आसपास उपलब्ध आहे. एक दीर्घकालीन गुंतवणूक म्हणून प्रत्येक मंदीत ज्युबिलंट फूडवर्क्सची खरेदी तुमच्या पोर्टफोलियोसाठी फायद्याची ठरू शकते.

**सध्याची शेअरबाजारातील अनिश्चितता पाहता प्रत्येक मंदीत तसेच टप्प्याटप्प्याने शेअर खरेदीचे धोरण ठेवावे.**

### ज्युबिलंट फूडवर्क्स लिमिटेड

(बीएसई कोड -५३३१५५)

शुक्रवारचा बंद भाव : रु. ४९७/-

वर्षभरातील उच्चांक/ नीचांक : रु. ९१८ / ४६२

बाजार भांडवल : रु. ३२,७६१ कोटी

भरणा झालेले भागभांडवल : रु. १३१.९७ कोटी

**शेअर होल्डिंग पॅटर्न (%)**

| | |
|---|---|
| प्रवर्तक | ४१.९४ |
| परदेशी गुंतवणूकदार | ३१.८७ |
| बँक/ म्यु. फंड/ सरकार | १५.७२ |
| इतर/ जनता | १०.४७ |

### संक्षिप्त विवरण

- शेअर गट : लार्ज कॅप
- प्रवर्तक : ज्युबिलंट भरतीया समूह
- व्यवसाय क्षेत्र : फास्ट फूड साखळी दालने
- पुस्तकी मूल्य : रु. २५.९
- दर्शनी मूल्य : रु. २/-
- गतवर्षीचा लाभांश : ६० %

### शेअर शिफारशीचे निकष

- प्रति समभाग उत्पन्न : रु. ६.५०
- किंमत उत्पन्न गुणोत्तर : ७६.४
- समग्र किंमत उत्पन्न गुणोत्तर : ६७.२
- डेट इक्विटी गुणोत्तर : १
- इंटरेस्ट कव्हरेज गुणोत्तर : १६.८३
- रिटर्न ऑन कॅपिटल एम्प्लॉइड : २९.८
- बीटा : १.२

*सूचना : १. प्रस्तुत लेखामध्ये सुचविलेल्या कंपनीच्या शेअर्समध्ये लेखकाची वा त्याच्या जवळच्या नातेवाईकांची (उपलब्ध माहितीप्रमाणे) कुठलीही गुंतवणूक नाही किंवा असल्यास ती कंपनीच्या भरणा झालेल्या भाग भांडवलाच्या एक टक्क्यापेक्षा कमी आहे. तसेच सुचविलेल्या कंपनीशी लेखकाचा कुठलाही संबंध नसून त्याने कंपनीकडून कुठलेही मानधन अथवा भेटवस्तू घेतलेली नाही. २. लेखात सुचविलेल्या कंपनीचे संशोधन हे वाचकांच्या महितीसाठी असून, प्रत्यक्ष कंपनीच्या शेअरमधील गुंतवणूक वाचकांनी स्वतःच्या जोखमीवर वा सल्लागाराच्या सल्ल्याने करावी.*


डेअर टू ड्रीम...
प्री-अप्रूव्हड शैक्षणिक कर्ज
₹1.5 कोटींपर्यंत @ 8.5% प्र. व.
विद्यार्थिनींसाठी खास 8% प्र.व. व्याजदर | कोर्स फीस्च्या 100% अर्थसहाय्य | परतफेडीचा कालावधी 12 वर्षे (मोरॅटोरियम कालावधी व्यतिरिक्त) | प्रोसेसिंग फीस् वर 25% सूट
भारतातील आणि परदेशातील शिक्षणासाठी
फॉरेन करन्सी / फॉरेक्स रेमिटन्सच्या खरेदीवरील कमिशनवर 25% सूट
शैक्षणिक कर्जावरील भरलेल्या व्याजदरावर टॅक्स बेनिफिट (इन्कम टॅक्स ॲक्ट १९६१ च्या कलम 80E अंतर्गत)
सारस्वत बँक
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. (शेड्युल्ड बँक)
अधिक माहितीसाठी 90290 50027 या नंबरवर मिस्ड कॉल द्या.
नियम व अटी लागू.
www.saraswatbank.com

# कसोटीचा काळ



## रपेट बाजाराची

**सुधीर जोशी**

भारतातील व अमेरिकेतील मध्यवर्ती बँकांनी केलेली व्याजदर वाढ ही सरल्या सप्ताहात बाजारासाठी सर्वात परिणामकारक घटना ठरली. भारतातील दरवाढ अगदी अनपेक्षितपणे केली गेली व त्यामुळे बाजारात मोठी घसरण झाली. अमेरिकेतील या आधीच्या पाव टक्का दरवाढीनंतर नव्याने झालेली अर्धा टक्के वाढ ही काहीशी अपेक्षित होती. त्यामुळे महागाई रोखण्यात योग्य वेळी उचललेले पाऊल अशा दृष्टीने त्याकडे पाहिले गेले व अमेरिकी बाजाराने उसळी घेतली. परंतु दुसऱ्याच दिवशी आगामी काळातील बाजारातील रोकड तरलता कमी करण्यासाठी मोठी पावले उचलण्याचे संकेत व जागतिक अर्थव्यवस्था मंदावण्याची शक्यता लक्षात घेऊन अमेरिकी बाजारात व पाठोपाठ भारतीय बाजारात मोठी घसरण झाली. साप्ताहिक तुलनेत प्रमुख निर्देशांक चार टक्क्यांनी घसरले.

अल्ट्राटेक सिमेंट : अल्ट्राटेक सिमेंटचे वार्षिक निकाल बाजाराच्या अपेक्षेप्रमाणे आले. वाढीव माल वाहतूक व इंधनावरील खर्चामुळे नफ्याचे प्रमाण घटले आहे. प्राप्तिकरासाठी केलेली तरतूद रद्द केल्यामुळे कंपनीच्या नफ्यात वाढ झाली. पण ती लक्षात घेतली नाही तर नफा १७ टक्क्यांनी कमी झाला आहे. तरीदेखील वेळेवर वाढवलेली उत्पादन क्षमता, एप्रिल महिन्यात वाढवलेल्या किमती व कर्जाचे प्रमाण कमी करण्यासाठीचे प्रयत्न हे कंपनीला आगामी काळात नफा मिळवून देतील. पायाभूत सुविधा, ग्रामीण गृहनिर्माण आणि शहरी गृहनिर्माण यासारख्या विभागांमधून मागणीचे वातावरण मजबूत असणे अपेक्षित आहे. कंपनीच्या समभागांची प्रत्येक घसरणीच्या काळात खरेदी करावी.

■ **टाटा स्टील :** टाटा स्टीलने अपेक्षेनुसार उत्तम कामगिरी नोंदवत संपूर्ण वर्षात ४१ हजार कोटींचा विक्रमी नफा मिळविला. समभागांचे विभाजन व प्रति समभाग ५१ रुपयांचा घसघशीत लाभांश जाहीर केला. कंपनीच्या युरोपमधील उप-कंपनीने या कामगिरीत महत्त्वाची साथ दिली. मागील काही महिन्यांत विदेशी गुंतवणूकदारांनी मोठी विक्री केली असली तरी भारतीय धातू कंपन्यांमध्ये त्यांचा सहभाग वाढला आहे. नफ्यातील वाढ कंपनीला कर्जे कमी करायला मदत करेल व भविष्यातील कामगिरी आणखी चांगली राहील. समभागांचे विभाजन झाल्यावर गुंतवणूकदारांचा फायदाच होतो, त्यामुळे हे समभाग राखून ठेवणे तसेच मोठ्या घसरणीत खरेदी करणे इष्ट ठरेल. भू-राजकीय संघर्षामुळे पोलादाच्या किमती चढ्या आहेत. कमोडिटी प्रकारात येणारी ही कंपनी व्यापार चक्राच्या चढ्या मार्गाने जात आहे. त्यामुळे वरच्या पातळीवर टप्प्याटप्प्याने नफा वसुली करणेदेखील महत्त्वाचे असेल.

■ **ब्रिटानिया :** ब्रिटानिया इंडस्ट्रीजने सध्याच्या परिस्थितीमध्ये चांगले निकाल जाहीर केले. मार्चअखेर तिमाहीत विक्रीत १५ टक्के तर नफ्यात १० टक्के वाढ झाली. कंपनीची हिन्दुस्तान युनिलिव्हरसारखीच बाजारावर पकड आहे. वर्षानुवर्षे जोपासलेल्या नाममुद्रा आणि किमती वाढवण्याची क्षमता यामुळे हे साध्य झाले आहे. कंपनी ग्रामीण भागात वितरण व्यवस्था मजबूत करत आहे, तसेच बिस्किट, दुग्धजन्य उत्पादने व इतर खाद्य पदार्थांच्या बाजारातील हिस्सा वाढवत आहे. एफएमसीजी क्षेत्रातील जमवून ठेवण्यासारखे हे समभाग आहेत.

■ **कोटक महिंद्र बँक :** कोटक महिंद्र बँकेने मार्चअखेर तिमाहीत नफ्यात ६५ टक्क्यांची वाढ साध्य केली जी मार्चअखेर आर्थिक वर्षासाठी २३ टक्के आहे. गेल्या वर्षी ही वाढ १७ टक्के होती. बँकेचा 'कासा रेशो' ६१ टक्के झाला आहे. बँकेकडे भांडवल उपलब्धता चांगली आहे. कर्ज देण्याबाबत सावधानता बाळगत असल्यामुळे बँकेची प्रगती धीम्या गतीने होत आहे. दीर्घ मुदतीसाठी टप्प्या टप्प्याने बँकेच्या समभागात केलेली गुंतवणूक फायद्याची ठरेल.




■ **दीपक नायट्राईट :** दीपक नायट्राईट ही सेंद्रिय, अजैविक, सूक्ष्म आणि विशेष रसायनांची एक अग्रगण्य उत्पादक कंपनी आहे. औद्योगिक स्फोटके, रंग, सौंदर्य प्रसाधने, वंगणे, पॉलिमर, ऑप्टिकल ब्राइटनर्स, फोटोग्राफिक रसायने इत्यादी उत्पादकांना कंपनी कच्चा माल पुरविते. दीपक नाईट्राइटच्या चौथ्या तिमाहीत विक्री व नफ्यात अनुक्रमे ४२ व ४१ टक्क्यांची वाढ झाली. कंपनीने संपूर्ण आर्थिक वर्षात प्रति समभाग १०.४६ रुपयांची कमाई केली जी गेल्या वर्षात ७.४१ रुपये होती. सध्याच्या बाजाराच्या घसरणीमध्ये या कंपनीच्या समभागांची पातळी खरेदीला आकर्षक वाटते.

■ sudhirjoshi23 @gmail.com



भारताच्या अर्थव्यवस्थेच्या सकारात्मक संकेतांवर, एप्रिल महिन्याच्या जीएसटी संकलनाने व सेवा क्षेत्राच्या वाढीमुळे शिक्कामोर्तब झाले. व्याजदर वाढीला आता सुरुवात झाली आहे. त्याचा सर्वात जास्त फायदा मोठ्या बँकाना होईल. रेपो दराशी संलग्न गृह व वाहन कर्जाचे दर आता वाढवता येतील. त्यांचा 'कासा रेशो' जास्त असल्यामुळे कमी व्याजातील ठेवी काही काळ त्यांच्या फायद्याच्या असतील. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील साधारण सर्वच कंपन्या कर्जरहित व दरवर्षी रोकड जमा करणाऱ्या असल्यामुळे त्यांच्यावर वाढीव व्याजाने फारसा परिणाम होत नाही. त्यामुळे ही दोन क्षेत्रे नजीकच्या काळात प्रभावी ठरतील. अमेरिकी नॅसडॅकच्या घसरणीमुळे माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांमध्ये सध्या विक्रीचा तुफान मारा झाला आहे. त्यामुळे घसरलेल्या पातळीवर या क्षेत्रातील कंपन्यांचा विचार करता येईल. पुढील काही महिने बाजारासाठी कसोटीचे राहतील. महागाईचे आकडे वाढत गेले अथवा भू-राजकीय संघर्ष वाढला तर बाजारात आणखी घसरण होईल. त्यामुळे आणखी घसरण की नव्या चढाईची सुरुवात हे येणारा काळच ठरवेल.



### सप्ताहातील या घडामोडींकडे लक्ष ठेवा

- पंजाब नॅशनल बँक, टाटा मोटर्स, लार्सन ॲण्ड टुब्रो, टेक महिंद्र या कंपन्या गेल्या आर्थिक वर्षाचे निकाल जाहीर करतील.
- महानगर गॅस, गुजरात गॅस, एशियन पेन्ट्स, सिप्ला, यूपीएल, कन्साई नेरोलॅक, ओरिएन्ट इलेक्ट्रिकल्स, पॉलिकॅब, अंबर एंटरप्राईझेस, एबी कॅपिटल, इमामी व इतर अनेक लहान कंपन्या गेल्या आर्थिक वर्षाचे निकाल जाहीर करतील.

# शेवटची काडी



## बाजाराचा तंत्र-कल

**आशीष ठाकूर**

रशिया-युक्रेन युद्धज्वर, त्यातून भडकलेले खाद्य-इंधन तेलाचे दर जे पर्यायाने भाववाढ, चलनवाढीच्या प्रत्यक्ष वणव्यात तेल ओतत होते. या सर्व निराशाजनक घडामोडीत निफ्टी निर्देशांक १७,००० चा स्तर कसाबसा राखत होता. सरलेल्या सप्ताहातील बुधवारी चलनवाढ काबूत आणण्यासाठी रिझर्व्ह बँकेने रेपो दरात ४० आधार बिंदूची वाढ आणि रोख राखीव प्रमाणात (सीआरआर) ५० आधार बिंदूची वाढ या दोन आर्थिक निर्णयांमुळे अर्थव्यवस्थेतील खेळता पैसा शोषून घेणं हा मुख्य उद्देश. पण या उपाययोजनांमुळे समाजातील विविध थरातील गरजवंतांना कर्ज महागल्याने, अगोदरच्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय निराशाजनक घटनांमध्ये रिझर्व्ह बँकेकडून कर्ज महाग केले जाण्याच्या घोषणेची दाहकता ही 'उंटाच्या पाठीवरील शेवटची काडी' ठरली. त्यातून निफ्टी निर्देशांकाने १७,००० चा 'महत्त्वाचा केंद्रबिंदू स्तर' तोडत मंदीच्या गर्तेत प्रवेश केला. या पार्श्वभूमीवर या आठवड्याच्या वाटचालीकडे वळूया.

**शुक्रवारचा बंद भाव :**
**सेन्सेक्स :** ५४,८३५.५८
**निफ्टी :** १६,४११.२५

गेल्या वर्षभरापासून आपण निफ्टी निर्देशांकावर १७,००० ते १७,२०० हा स्तर 'महत्त्वाचा केंद्रबिंदू स्तर' म्हणून डोळ्यासमोर ठेवून आपण निफ्टी निर्देशांकावरील 'तेजी-मंदी'ची आखणी करत होतो, व आजही हा स्तर काळाच्या कसोटीवर उतरत, गुंतवणूकदारांना आजही मार्गदर्शक ठरत आहे.

मंदीच्या दिवसात निफ्टी निर्देशांक १७,००० ते १७,२००चा स्तर सातत्याने राखत असल्यास सर्व राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय आर्थिक निराशाजनक घटना या त्या क्षेत्रापुरत्या मर्यादित राहत, किंबहुना त्या 'चहाच्या पेल्यातील' वादळ ठरत बाजारावर त्याचा विपरीत परिणाम होत नसे एवढी क्षमता निफ्टी निर्देशांकाच्या १७,००० ते १७,२०० च्या स्तराला होती.

सरलेल्या सप्ताहातील बुधवारी 'रिझर्व्ह बँके'ने अकल्पितपणे कुठलीही पूर्वकल्पना न देता, दिलेल्या कर्जावरील व्याजदर वाढीच्या दणक्यासोबत अगोदरच्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय निराशाजनक घटनांचे संचित कर्म एकत्रपणे उभे ठाकत निफ्टी निर्देशांकाने १७,०००चा स्तर तोडत त्याची घसरण सुरू झाली.

निफ्टी निर्देशांकाच्या भविष्यकालीन वाटचालीचा आढावा -

अभ्युदय को-ऑप. बँक लि. (मल्टी - स्टेट शेड्युल्ड बँक)
— आपली बँक —
शुभंकरोती - III
6.25% प्रति वर्ष मुदत ठेव योजना
परत एकदा सर्वांसाठी
१८ महिन्यांकरिता व्याजदर
प्रभावी मिळकत 6.49% सर्व ग्राहकांसाठी
गृह कर्ज 6.70%* प्रति वर्ष
प्रक्रिया शुल्कात ६०% सवलत
www.abhyudayabank.co.in
टोल फ्री : 1800-22-3131

निफ्टी निर्देशांकाने सातत्याने प्रथम १६,४०० ते १६,००० चा स्तर राखण्याची नितांत गरज आहे. असे घडल्यास निफ्टी निर्देशांकावर मंदीच्या वातावरणातील 'तेजीची झुळूक' अपेक्षित आहे. त्या समयी निफ्टी निर्देशांकाचे वरचे लक्ष्य हे १६,७०० ते १७,००० असेल. येणाऱ्या दिवसात निफ्टी निर्देशांकाचा परीघ हा १६,२०० ते १६,८०० मध्ये असेल. या स्तरादरम्यानची पायाभरणी निफ्टी निर्देशांकाची भविष्यकालीन वाटचाल निश्चित करेल. निफ्टी निर्देशांकाने १६,२००चा स्तर राखला आणि १६,८०० चा स्तर पार केल्यास १७,००० ते १७,२०० हे त्याचे वरचे लक्ष्य असेल.

निफ्टी निर्देशांक १६,००० चा स्तर राखण्यास अपयशी ठरल्यास निफ्टी निर्देशांकाचे खालचे लक्ष्य १५,७०० ते १४,५०० असेल.

*लेखक भांडवली बाजार विश्लेषक*
ashishthakur1966@gmail.com

### निकालपूर्व विश्लेषण

**एशियन पेंट्स लिमिटेड**
**तिमाही वित्तीय निकाल :** मंगळवार,१० मे
**६ मेचा बंद भाव -** ३,०१६.६० रु.
**निकालोत्तर महत्त्वाचा केंद्रबिंदू स्तर -** ३,०७० रु.
**अ) उत्कृष्ट निकाल:** समभागाकडून ३,०७० रुपयांचा स्तर राखत, प्रथम वरचे लक्ष्य ३,१५० रुपये, द्वितीय लक्ष्य ३,२५० रुपये.
**ब) निराशादायक निकाल:** ३,०७० रुपयांचा केंद्रबिंदू स्तर तोडत २,७०० रुपयांपर्यंत घसरण

**लार्सन ॲण्ड टुब्रो लिमिटेड**
**तिमाही वित्तीय निकाल :** गुरुवार,१२ मे
**६ मेचा बंद भाव :-** १,६२२.६० रु.
**निकालोत्तर महत्त्वाचा केंद्रबिंदू स्तर-** २,१३० रु.
**अ) उत्कृष्ट निकाल:** समभागाकडून १,७५० रुपयांचा स्तर राखत, प्रथम वरचे लक्ष्य १,८३० रुपये, द्वितीय लक्ष्य १,९८० रुपये.
**ब) निराशादायक निकाल:** १,७५० रुपयांचा केंद्रबिंदू स्तर तोडत १,५०० रुपयांपर्यंत घसरण

**सीमेन्स लिमिटेड**
**तिमाही वित्तीय निकाल :** गुरुवार,१२ म
**६ मेचा बंद भाव -** २,२१७.३० रु.
**निकालोत्तर महत्त्वाचा केंद्रबिंदू स्तर -** २,२७० रु.
**अ) उत्कृष्ट निकाल :** समभागाकडून २,२७० रुपयांचा स्तर राखत, प्रथम वरचे लक्ष्य २,३५० रुपये, द्वितीय लक्ष्य २,४५० रुपये
**ब) निराशादायक निकाल :** २,२७० रुपयांचा केंद्रबिंदू स्तर तोडत २,०५० रुपयांपर्यंत घसरण

**टाटा मोटर्स लिमिटेड**
**तिमाही वित्तीय निकाल :** गुरुवार,१२ मे
**६ मेचा बंद भाव -** ४०८.७० रु.
**निकालोत्तर महत्त्वाचा केंद्रबिंदू स्तर -** ४२२ रु.
**अ) उत्कृष्ट निकाल :** समभागाकडून ४२२ रुपयांचा स्तर राखत, प्रथम वरचे लक्ष्य ४५० रुपये, द्वितीय लक्ष्य ४६५ रुपये.
**ब) निराशादायक निकाल :** ४२२ रुपयांचा केंद्रबिंदू स्तर तोडत ३७५ रुपयांपर्यंत घसरण.

**अस्वीकृती :** शेअर बाजारातील व्यवहार हे बाजारातील जोखमीच्या अधीन आहेत. अंदाज चुकल्यास मुद्दल गमावण्याची शक्यता असते. हे टाळण्यासाठी 'स्टॉप लॉस', इच्छित उद्दिष्ट या संकल्पनाचे पालन करणे आवश्यक आहे. गुंतवणूक करण्यापूर्वी गुंतवणूक सल्लागाराचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

# ज्येष्ठ नागरिकांना प्राप्तिकर कायद्यातील सवलती...



## करावे कर-समाधान

**प्रवीण देशपांडे**

वैद्यकीय खर्चात दिवसेंदिवस होणारी वाढ, घटणारे व्याजदर, महागाई यामुळे ज्येष्ठ नागरिकांना उत्पन्न आणि खर्चाची सांगड घालणे कठीण जात आहे. मात्र ज्येष्ठ नागरिकांनी त्यांच्यासाठी प्राप्तिकर कायद्यातील उपलब्ध सवलती समजून घेतल्यास त्यांची रोकड सुलभता वाढेल आणि अडचणीच्या वेळी त्यांना नक्कीच उपयोग होईल.



वैद्यकीय खर्चात होणारी वाढ, घटणारे व्याजदर, महागाई, वगैरे कारणांमुळे ज्येष्ठ नागरिकांना उत्पन्न आणि खर्चाची सांगड घालणे कठीण जात आहे. शिवाय छोट्या कुटुंबामुळे किंवा परदेशात नोकरी-धंद्यानिमित्ताने स्थायिक झालेल्या मुलांमुळे एकट्या पडलेल्या ज्येष्ठ नागरिकांच्या विवंचनेत भर पडली आहे. प्रधानमंत्री वय वंदना योजना, राष्ट्रीय वयोश्री योजना, वयोश्रेष्ठ सन्मान, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तिवेतन योजना, वगैरे ज्येष्ठ नागरिकांसाठी चालविल्या जाणाऱ्या योजना आहेत. ज्येष्ठ नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्राप्तिकर कायद्यात सवलती दिल्या आहेत जेणेकरून त्यांची रोकड सुलभता वाढेल आणि अडचणीच्या वेळी त्यांना त्याचा उपयोग होईल.

प्राप्तिकर कायद्यानुसार ज्येष्ठ नागरिक म्हणजे ज्यांचे वय ६० वर्षांपेक्षा जास्त आहे. ज्येष्ठ नागरिकांमध्ये दोन प्रकार आहेत. एक म्हणजे ६० वर्षे ते ८० वर्षे वय असणारे ज्येष्ठ नागरिक आणि दुसरे ८० वर्षांपेक्षा जास्त अति-ज्येष्ठ नागरिक. कमाल करमुक्त उत्पन्नाची मर्यादा ज्येष्ठ नागरिकांसाठी ३ लाख रुपये आणि अतिज्येष्ठ नागरिकांसाठी ५ लाख रुपये इतकी आहे. ही सवलत फक्त निवासी भारतीयांसाठीच आहे. वैद्यकीय खर्चासाठी अतिरिक्त वजावट, व्याजाची अतिरिक्त वजावट ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या उत्पन्नातून घेता येते. ७५ वर्षांपेक्षा जास्त वय असणाऱ्या करदात्यांना ठरावीक प्रकारचे उत्पन्न असल्यास विवरणपत्र भरण्यापासून सूट देण्यात आली आहे. अति ज्येष्ठ नागरिकांना विवरणपत्र फॉर्म १ आणि फॉर्म ४ कागदी स्वरूपात (ऑफलाइन) दाखल करण्याची मुभा देण्यात आली आहे. ते संगणकाद्वारे ऑनलाइन पद्धतीनेदेखील विवरणपत्र दाखल करू शकतात.

**ज्येष्ठ नागरिकांना त्यांचे उत्पन्न, वजावट भरावा लागणारा कर, विवरणपत्र याविषयीच्या शंकांचे निरसन खालील प्रश्नोत्तराद्वारे होईल :**

■ **प्रश्न : माझे वय ६५ वर्षे आहे मागील तीन वर्षांपासून मी परदेशात स्थायिक आहे. माझे भारतामध्ये घरभाडे आणि व्याजाचे एकूण ४ लाख रुपयांचे उत्पन्न आहे. या उत्पन्नातून वजावटी जाता करपात्र उत्पन्न २ लाख रुपये आहे. या उत्पन्नावर उद्गम कर कापला जातो. मला विवरणपत्र भरावे लागेल का? उद्गम कर मला वाचविता येईल का?**

**– यश कारेकर, पुणे**

**उत्तर :** आपण अनिवासी भारतीय असल्यामुळे आपल्यासाठी कमाल करमुक्त उत्पन्नाची मर्यादा, आपले वय ६५ वर्षे असले तरी, २,५०,००० रुपयेच आहे. आपले वजावटीपूर्वी उत्पन्न या मर्यादेपेक्षा जास्त असल्यामुळे विवरणपत्र भरणे बंधनकारक आहे. करपात्र उत्पन्न मर्यादेपेक्षा कमी असल्यामुळे आपल्या उत्पन्नावर कर भरावा लागणार नाही. कर परताव्याचा (रिफंड) दावा करता येईल. आपल्या उत्पन्नावर देय कर नसल्यास प्राप्तिकर खात्याकडे अर्ज करून तो न कापण्याचा आदेश आपण मिळवू शकता.



■ **प्रश्न : मी ज्येष्ठ नागरिक आहे. माझे पेन्शन आणि व्याजाचे उत्पन्न आहे. मी २०२१-२२ या आर्थिक वर्षात घर विकले आणि मला २५ लाख रुपयांचा दीर्घ मुदतीचा भांडवली नफा झाला. इतर उत्पन्न विचारात घेता माझे करदायित्व ६ लाख रुपयांपर्यंत आहे. मला हा कर कधी भरावा लागेल? त्यावर व्याज भरावे लागेल का?**

**– अनिता गोखले, महाड**

**उत्तर :** आपण ज्येष्ठ नागरिक आहात, आपल्या उत्पन्नात उद्योग-व्यवसायाचा समावेश नसल्यामुळे आपल्याला अग्रिम कराच्या तरतुदी लागू होत नाहीत. हा कर आपण विवरणपत्र भरण्याच्या पूर्वी म्हणजे जुलै, २०२२ पूर्वी भरू शकता. मात्र त्यानंतर हा कर भरल्यास व्याज भरावे लागेल.

■ **प्रश्न : माझे वय ७० वर्षे आहे. माझे व्याज आणि पेन्शन मिळून एकूण उत्पन्न ६,५०,००० आहे. माझे वय बघता मी कर बचतीच्या गुंतवणुका करत नाही. मी नवीन कर प्रणालीचा पर्याय निवडू शकतो का? मला तो फायदेशीर आहे का?**

**– एक वाचक**

**उत्तर :** आपल्याला व्याजाच्या उत्पन्नातून 'कलम ८० टीटीबी'नुसार ५०,००० रुपये आणि पेन्शनमधून ५०,००० रुपयांची वजावट, पारंपरिक प्रणालीने (वजावटी घेऊन) कर भरल्यास घेता येईल आणि त्यानुसार आपले करपात्र उत्पन्न ५,५०,००० रुपये इतके असेल आणि त्यावर एकूण २०,८०० रुपये (४ टक्के शैक्षणिक कर धरून) कर भरावा लागेल (प्रथम ३ लाख रुपयांवर कर नाही, ३ लाख ते ५ लाख रुपयांवर ५ टक्के म्हणजे १०,००० आणि बाकी ५०,००० रुपयांवर २० टक्के म्हणजे १०,००० रुपये असा २०,००० रुपये कर आणि ४ टक्के शैक्षणिक अधिभार ८०० रुपये असा एकूण २०,८०० रुपये). आणि नवीन कर प्रणालीने आपले उत्पन्न ६,५०,००० रुपये असेल आणि त्यावर आपल्याला एकूण २८,६०० रुपये कर भरावा लागेल. (प्रथम २,५०,००० रुपयांवर कर नाही, २,५०,००० ते ५ लाख रुपयांवर ५ टक्के म्हणजे १२,५०० आणि बाकी १,५०,००० रुपयांवर १० टक्के म्हणजे १५,००० रुपये असा २७,५०० कर आणि ४ टक्के शैक्षणिक अधिभार १,१०० रुपये असा एकूण २८,६०० रुपये). आपल्याला पारंपरिक कर प्रणालीनुसार कमी कर भरावा लागत असल्यामुळे आपल्याला तो फायदेशीर आहे. आपण नवीन कर प्रणालीचा स्वीकार केल्यास कमाल करमुक्त उत्पन्नाची मर्यादा २,५०,००० इतकीच असते.

■ **प्रश्न : मी ज्येष्ठ नागरिक आहे. माझा 'मेडिक्लेम' विमा नाही. माझा वैद्यकीय उपचारासाठी बराच खर्च २०२१-२२ या वर्षात झाला आहे. मला या खर्चाची वजावट उत्पन्नातून घेता येईल का?**

**– संदीप कदम, मालाड**

**उत्तर :** 'कलम ८० डी'नुसार वैद्यकीय उपचारासाठी केलेल्या खर्चाची (फक्त ज्येष्ठ नागरिकांसाठी) ५०,००० रुपयांपर्यंत वजावट करदाता घेऊ शकतो. हा खर्च रोखीने केल्यास याची वजावट करदाता घेऊ शकत नाही. याशिवाय 'कलम ८० डीडीबी'नुसार ठरावीक रोगाच्या उपचारासाठी केलेल्या खर्चाची वजावट मिळते. या रोगांमध्ये न्युरोलॉजिकल रोग, घातक कर्करोग, क्रॉनिक रेनल फेलुअर, एड्स, हेमेटोलॉजिकल विकार, वगैरे रोगांचा समावेश होतो. या कलमानुसार ज्येष्ठ नागरिकांना अटींची पूर्तता केल्यास १ लाख रुपयांपर्यंत वजावट मिळू शकते.

■ **प्रश्न : ज्येष्ठ नागरिकांना व्याजाच्या उत्पन्नातून कोणत्या सवलती मिळतात?**

**– शर्मिला कुलकर्णी, मुंबई**

**उत्तर :** ज्येष्ठ नागरिकांसाठी 'कलम ८० टीटीबी'नुसार बँक, पोस्ट ऑफिसकडून मिळालेल्या व्याजावर ५०,००० रुपयांपर्यंत वजावट मिळते. या व्याजामध्ये बचत खाते, मुदत ठेव, आवर्त ठेव वगैरे व्याजाचा समावेश आहे. याव्यतिरिक्त मिळालेल्या व्याजाची वजावट या कलमाद्वारे मिळत नाही. उदा. कंपन्यांच्या ठेवींवर, किंवा इतर व्यक्तींकडून मिळालेले व्याज हे या कलमानुसार वजावटीला पात्र नाही. ही वजावट फक्त निवासी भारतीयांसाठीच आहे. ज्येष्ठ अनिवासी भारतीय 'कलम ८० टीटीए'नुसार बचत खात्याच्या व्याजावर १०,००० रुपयांपर्यंतची वजावट उत्पन्नातून घेऊ शकतात.

*लेखक सनदी लेखाकार आणि कर सल्लागार आहेत.*
pravin3966@rediffmail.com



# मानवता हाच खरा धर्म

## गौर गोपाल दास यांचे मत

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**पुणे :** हिंसा नव्हे तर मानवता हाच खरा धर्म आहे. मानवतेचे काम करणारा कोणताही सनातन धर्म वंदनीय आहे. मात्र, आपण प्रथम देशाचे नागरिक आणि त्यानंतर आपल्या जाती-धर्माचे आहोत. त्यामुळे कोणत्याही अभिवादनापूर्वी 'वंदे मातरम्' सर्वांत आधी आपल्या मुखी असले पाहिजे, असे मत प्रेरणादायी वक्ते गौर गोपाल दास यांनी रविवारी व्यक्त केले. जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनतर्फे आयोजित 'जीतो कनेक्ट २०२२' परिषदेत गौर गोपाल दास बोलत होते.

दास म्हणाले, यशस्वीतेच्या पायऱ्या चढताना मन शांत असणे आवश्यक आहे. एकत्रित कामाचे समाधान आणि लोकांना मदत ही यशाची गुरुकिल्ली आहे. त्याचबरोबर नातेसंबंध, आरोग्य, मित्र आणि परमेश्वराला विसरता कामा नये. पैसा असून समाधान नसेल तर जीवनात आनंद मिळू शकत नाही. अलिशान घरापेक्षा त्यातील नाती सुख देतात. महागड्या मोबाईलपेक्षा संवाद साधण्यात समाधान आहे. आनंदी राहण्याची जबाबदारी स्वतःची आहे. दुसऱ्यांना दोष देण्यापेक्षा स्वतःची शक्तिस्थळे शोधून आपल्या विकासासाठी जिद्दीने प्रयत्न केले पाहिजेत.

## राजकारण्यांपासून सावधान

### कुमार विश्वास यांचा कवितेतून संदेश



**'ना तेरा** है ना मेरा है, ये हिंदुस्तान सबका है; नही समझा तो नुकसान सबका है' अशा काव्यमय शब्दांमध्ये कुमार विश्वास यांनी हनुमान चालिसा वरून सुरू असलेल्या राजकारणापासून सावध राहण्याचा सल्ला दिला.

जीतो कनेक्ट २०२२ परिषदेमध्ये कवितांमधून सामाजिक -राजकीय चिमट्यांचाही आस्वाद घेत पुणेकरांनी कुमार विश्वास यांच्या मनोगताला उत्स्फूर्त दाद दिली.

दुसऱ्यांची पूजा केव्हा सुरू होते ते पाहून हनुमान चालिसा केव्हा म्हणायची हे ठरवायचे का? असा सवाल विश्वास यांनी उपस्थित केला. राक्षसी प्रवृत्तीच्या व्यक्तींना दोन समाजात भांडणे व्हावीत असे वाटते. कोलकातामध्ये दुर्गा पूजा आणि मोहरमवरून वाद झाला. पण, दुर्गा पूजेत त्यांनी पुष्पवृष्टी करावी आणि आणि मोहरममध्ये आपण सरबत वाटू. पण, असे झाले तर राजकारण्यांना मते कशी मिळतील, याकडे कुमार विश्वास यांनी लक्ष वेधले.

# वेगळ्या विचारांतून कलाकृती निर्मितीला यश

## सुभाष घई यांचा विद्यार्थ्यांना कानमंत्र

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सतत शिकण्याची भूक कायम असली पाहिजे. कोणतेही काम करताना त्यात सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. इतरांपेक्षा वेगळा विचार करून कलाकृतीची निर्मिती केली तरच यश मिळेल, असा कानमंत्र मीडिया अँड एंटरटेनमेंट स्किल कौन्सिलचे अध्यक्ष आणि चित्रपट दिग्दर्शक सुभाष घई यांनी रविवारी विद्यार्थ्यांना दिला.

केंद्र सरकारच्या कौशल्य विकास आणि नव उद्योजकता मंत्रालयाच्या वतीने आयोजित केलेल्या राष्ट्रीय कौशल्य विकास स्पर्धेत पुणे येथील डिजाइन स्किल अकादमीच्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग कामगिरी करत विजेतेपद पटकाविले.

मीडिया अँड एंटरटेनमेंट स्किल कौन्सिल आणि डिजाइन स्किल अकादमीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात या सर्व विजेत्यांचा गौरव सुभाष घई यांच्या हस्ते करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. एफआयसीसीआयचे अध्यक्ष डॉ. आशिष कुलकर्णी, मीडिया अँड एंटरटेनमेंट स्किल कौन्सिलचे मुख्य कार्यकारी अधिकारी मोहित सोनी, डिझाइन स्कूल अकादमीचे संस्थापक सतीश नारायणन, संचालिका श्रीदेवी सतीश, जे पी सराफ, राहुल बन्सी, संतोष रासकर या वेळी उपस्थित होते.

नारायणन म्हणाले, ॲनिमेशन क्षेत्रात गेल्या पाच वर्षांत मोठ्या प्रमाणात प्रगती झाली आहे. पाच वर्षांपूर्वी १५ टक्के असलेली वाढ आता ४५ टक्क्यांपर्यंत येऊन पोहोचली आहे. हॉलिवूड चित्रपट उद्योग आता ॲनिमेशनसाठी भारतीय कौशल्यांकडे आकर्षित होताना दिसून येत आहे. ही बाब विचारात घेऊन विद्यार्थ्यांना जागतिक ॲनिमेशन स्पर्धांसाठी तयार केले जात आहे.

# मोटारीच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू

## पुणे-सातारा रस्त्यावर अपघात; सहप्रवासी गंभीर जखमी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** भरधाव मोटारीच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना पुणे-सातारा रस्त्यावर कात्रज परिसरात घडली.

अनिकेत दिवाणजी धावले (वय २२, रा. भिलारेवाडी, कात्रज) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. अपघातात अनिकेतचा भाऊ आकाश (वय २४) जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आकाशने याबाबत भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दुचाकीस्वार अनिकेत आणि त्याचा भाऊ आकाश भोरमधील तेलवडी गावाकडे निघाले होते. पुणे-सातारा रस्त्यावरील मांगडेवाडी परिसरात भरधाव मोटारीने दुचाकीला धडक दिली. अपघातात गंभीर जखमी झालेला अनिकेतचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला.

अपघातानंतर पसार झालेल्या मोटारचालकाचा शोध घेण्यात येत असून सहायक फौजदार मोहन देशमुख तपास करत आहेत.

# मुळा-मुठा नदीपात्रातून बेकायदा वाळू उपसा

## वाळू चोरी प्रकरणी दोघांविरोधात गुन्हा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** हवेली तालुक्यातील आष्टापूर ते हिंगणगाव दरम्यान नदीपात्रातून बेकायदा वाळू उपसा करण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नामदेव सुखदेव कोतवाल, सचिन गोरव थोरात (रा. आष्टापूर, ता. हवेली, जि. पुणे) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. तहसील कार्यालयातील मंडल अधिकारी नूरजहाँ सय्यद यांनी या संदर्भात लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. कोतवाल, थोरात यांनी हवेली तालुक्यातील अष्टापूर परिसरातील मुळा-मुठा नदीपात्रातून बेकायदा वाळू उपसा केला. दोघांनी नदीपात्रातून तीन लाख रुपयांची वाळू चोरली. तहसील कार्यालयातील भरारी पथकाच्या लक्षात वाळू चोरीचा प्रकार उघडकीस आल्यानंतर या प्रकरणी तक्रार देण्यात आली. पोलीस हवालदार ठाणगे तपास करत आहेत.

# पुनर्विकासाच्या नावाखाली 'बालगंधर्व' पाडण्यावर शिक्कामोर्तब

**(पान १ वरून)** दर्शविण्यात आला. त्यामुळे पुनर्विकासासाठी महापालिकेच्या स्तरावर समिती स्थापन करण्यात आली. समितीने बालगंधर्व रंगमंदिराचा आराखडा करण्यासाठी वास्तुविशारदांकडून प्रस्ताव मागविले होते. त्यातील काही प्रस्ताव स्वीकारून भारतीय जनता पक्षाने बालगंधर्व रंगमंदिर पाडण्याचा घाट कायम ठेवला. समितीने पुनर्विकाससंदर्भातील अंतिम प्रस्तावांचे सादरीकरण उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांच्यापुढे केले. माजी महापौर मुरलीधर मोहोळ, आयुक्त विक्रम कुमार, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, भवन विभागाच्या प्रमुख हर्षदा शिंदे या वेळी उपस्थित होते. तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला प्रारंभ करण्याचा निर्णय या वेळी घेण्यात आला.

# सोसायटीतील चार दुचाकींची जाळपोळ

## येरवडा भागातील घटना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सोसायटीच्या आवारात लावण्यात आलेल्या चार दुचाकींची जाळपोळ करण्यात आल्याची घटना येरवडा भागात घडली.

याबाबत अमित सिंधीकुमटे (वय ३०, रा. देवी अपार्टमेंट, सेवालाल चौक, लक्ष्मीनगर, येरवडा) यांनी येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अमित सिंधीकुमटे देवी अपार्टमेंटमध्ये राहतात. सोसायटीच्या आवारात शिरलेल्या अज्ञाताने चार दुचाकींची जाळपोळ केली. दुचाकींची जाळपोळ केल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर पोलिसांकडे तक्रार देण्यात आली. दुचाकी जाळपोळीचे कारण समजू शकले नाही. वैमनस्यातून दुचाकींची जाळपोळ करण्यात आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

पोलिसांनी सोसायटीच्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण तपासासाठी ताब्यात घेतले असून सहायक फौजदार सुर्वे तपास करत आहेत.

# पिंपरी-चिंचवडमध्ये लँडमाफिया, वाळूमाफियांचा धुमाकूळ

## पोलिसांकडूनच संशयास्पद कारभार, पोलीस आयुक्तांकडे चौकशीची मागणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात लँडमाफिया, वाळूमाफियांनी धुमाकूळ घातला आहे. गुंडगिरी, तोडफोड, खुनांचे सत्र, अवैध धंदे, पोलिसांच्या खोट्या कारवाया अशाप्रकारच्या गुन्हेगारी घटनांमुळे भीतीचे वातावरण आहे. शहरवासीयांना सुरक्षेची हमी दिली पाहिजे, अशी मागणी आमदार अण्णा बनसोडे यांनी पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे. गेल्या काही महिन्यांत पोलिसांकडूनच मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाले असून त्या संशयास्पद कारभाराची चौकशी करण्याची मागणी बनसोडे यांनी केली आहे.

शहरात पोलिसांची हप्तेवसुलीची मोठी साखळी कार्यरत होती. खोटे गुन्हे नोंदवणे, नामांकित बँकांच्या पदाधिकाऱ्यांची अटक टाळण्यासाठी त्यांच्याकडून मोठी रक्कम उकळणे, बांधकाम व्यावसायिकांना पोलिसी बळाचा वापर करून जागांचा (प्लॉट) ताबा मिळवून देणे, त्या मोबदल्यात नियोजित बांधकाम प्रकल्पांत भागीदारी तथा सदनिका मिळवणे असे अनेक प्रकार सर्रास सुरू होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांना येथील कारभाराची सविस्तर माहिती देण्यात आली होती. त्याचीच दखल घेऊन उपमुख्यमंत्र्यांनी पोलीस आयुक्तालयात खांदेपालट केले.

याशिवाय, वेश्याव्यवसायात सापडलेल्या मुलींचा गैरवापर करण्यात आल्याच्या तक्रारी आहेत. मागासवर्गीय कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल झालेले आहेत. अनेकांवर खोट्या कारवाया करण्यात आल्या आहेत. या सर्व संशयास्पद प्रकारांची पोलीस आयुक्तांनी नव्याने चौकशी करावी, अशी मागणी आमदार बनसोडे यांनी या पत्राद्वारे केली आहे.

# राज्यात २०२० मध्ये मृत्यूच्या प्रमाणात १६.५ टक्के वाढ

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई:** राज्यात २०२० मध्ये मृतांच्या संख्येत आधीच्या वर्षाच्या तुलनेत सुमारे १६.५ टक्क्यांनी वाढ झाल्याचे नागरी नोंदणीच्या अहवालानुसार निदर्शनास आले आहे. देशभरात ही वाढ सुमारे ६.२ टक्के असून बिहारपाठोपाठ महाराष्ट्रात जास्त वाढ झाली आहे.

विशेष म्हणजे २०२० मध्ये बहुतांश राज्यांमध्ये मृतांच्या संख्येत वाढ झाली असताना मात्र उत्तर प्रदेश, उत्तराखंड, तेलंगणा, केरळ, दिल्ली आणि मणिपूर या राज्यांमध्ये घट झाली आहे.

नागरी नोंदणी २०२० चा अहवाल नुकताच प्रकाशित झाला आहे. यानुसार, २०१९ मध्ये राज्यात ६ लाख ९३ हजार ८०० जणांचा मृत्यू झाला होता. २०२० मध्ये ही संख्या ८ लाख ८ हजार ७८३ वर गेली आहे. २०१९ च्या तुलनेत २०२० मध्ये मृतांची संख्या १ लाख १४ हजार ९८३ ने वाढली आहे. २०२० मध्ये करोनामुळे मृत्यू झालेल्यांची आकडेवारी ५४ हजार ५४७ आहे.

राज्यात सर्वाधिक मृत्यू हे मुंबईत झाले आहेत. मुंबईमध्ये २०२० मध्ये १ लाख ११ हजार ९४२ मृतांची नोंद आहे. यातील सुमारे ११ हजार ९२७ मृत्यू करोनामुळे झाले आहेत. त्याखालोखाल पुणे, ठाणे आणि नागपूर या जिल्ह्यांचा समावेश आहे. राज्यातील सुमारे ६१ टक्के मृत्यू शहरी भागात, तर उर्वरित ३९ टक्के मृत्यू ग्रामीण भागात झाले आहेत. महिलांच्या तुलनेत पुरुषांच्या मृत्यूचे प्रमाण जास्त आहे. केंद्र सरकारने जाहीर केलेल्या करोना मृत्यूच्या आकड्यांपेक्षा १० पटीने अधिक मृत्यू झाल्याचा दावा जागतिक आरोग्य संघटनेने केल्यामुळे मृतांच्या संख्येचा वाद पुन्हा चर्चेत आला आहे.

करोनाबाधित परंतु इतर आजारांनी मृत्यू झालेल्या रुग्णांच्या मृत्यूची नोंद करोना मृत्यू म्हणून करण्याबाबतही या आधी अनेक वेळा वाद झाले होते. अखेर या मृतांचा करोना मृतांमध्ये समावेश करण्याचा निर्णय भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेने घेतल्यामुळे एप्रिलमध्ये राज्यातील करोनाबाधित मृतांच्या सुमारे साडेतीन हजारांनी वाढ झाली होती.

मृतांच्या संख्येत २०२० मध्ये नक्कीच मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. यामध्ये काही मृत्यू करोनाबाधितांचे असण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे प्रमाण सध्या जाहीर केलेल्या आकडेवारीपेक्षा २० ते ३० टक्के अधिक असू शकते. या काळात इतर कारणांनी मृत्यू झाल्याची शक्यता आहे. त्यामुळे हे अतिरिक्त मृत्यू करोनामुळेच झाले आहेत असे म्हणता येणार नाही. करोना मृतांच्या आकडेवारीपेक्षा दहापट अधिक मृत्यू भारतात झाल्याच्या जागतिक आरोग्य संघटनेच्या दाव्यात काहीच तथ्य नाही, असे मत मृत्यू विश्लेषण समितीचे प्रमुख डॉ. अविनाश सुपे यांनी व्यक्त केले.

### सर्वाधिक वाढ बिहारमध्ये

देशभरात २०२० मध्ये मृतांच्या संख्येत सर्वाधिक सुमारे १८ टक्के वाढ बिहारमध्ये झाली आहे. त्याखालोखाल महाराष्ट्र (१६.५ टक्के), आसाम (१४ टक्के), गुजरात (१३ टक्के), आंध्र प्रदेश (१३ टक्के), हरियाणा (१२ टक्के), पश्चिम बंगाल (१० टक्के) आणि नागालँड (११ टक्के) या राज्यांचा समावेश आहे.

### उत्तर प्रदेशसह काही राज्यांमध्ये घट

देशभरात बहुतांश जिल्ह्यांमध्ये २०१९ च्या तुलनेत २०२० मध्ये मृतांच्या संख्येत वाढ झाली आहे; परंतु उत्तर प्रदेशमध्ये मात्र मृतांच्या संख्येत सुमारे आठ टक्क्यांनी घट झाली आहे. २०१८ च्या तुलनेत २०१९ मध्ये उत्तर प्रदेशमध्ये मृतांच्या संख्येत सुमारे चार टक्क्यांनी वाढ झाली होती. उत्तराखंडमध्ये तर २०१८ च्या तुलनेत २०१९ मध्ये मृतांच्या संख्येत सुमारे ३८ टक्क्यांनी वाढ झाली होती; परंतु २०२० मध्ये मात्र या राज्यात मृतांच्या संख्येत वाढ होण्याऐवजी सुमारे सहा टक्क्यांनी घट झाली आहे. दिल्लीमध्ये २०१८ च्या तुलनेत २०१९ मध्ये सुमारे ०.१७ टक्क्यांनी घट झाली होती; परंतु करोनाकाळात हे प्रमाण आणखी घटले असून ती दोन टक्क्यांवर गेली आहे. मणिपूर आणि तेलंगणामध्ये तर मृतांच्या संख्येत अनुक्रमे २५ आणि ११ टक्क्यांनी घट झाली आहे. दरवर्षी साधारणपणे लोकसंख्येप्रमाणे मृतांच्या संख्येत तीन ते चार टक्क्यांनी वाढ होत असते. महाराष्ट्रात इतर राज्यांच्या तुलनेत मृत्यूची नोंद होण्याचे प्रमाण निश्चितच जास्त आहे.

# राजकीय गुन्हे मागे घेण्याबाबत मंत्रालयात अंतिम अधिकार हवा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** विविध प्रकारच्या राजकीय-सामाजिक आंदोलनांसाठी राजकीय कार्यकर्ते, नेत्यांवर दाखल होणारे राजकीय गुन्हे रद्द करण्याबाबतचे सर्वाधिकार जिल्हापातळीवरील प्रशासकीय अधिकाऱ्यांना देण्यास ज्येष्ठ मंत्र्यांनी आक्षेप घेतला आहे.

राजकीय दबावतंत्राचा वापर करून आपापल्या पक्षाच्या लोकांवरील गुन्हे मागे घ्यायला लावण्याचा प्रकार त्यातून घडू शकतो. त्यामुळे याबाबतचे अंतिम अधिकार मंत्रालय पातळीवर असावेत, याबाबत सहमती झाल्याने लवकरत तसा प्रस्ताव मंजुरीसाठी येण्याची शक्यता आहे. ज्या राजकीय-सामाजिक आंदोलनात ५ लाखांपेक्षा अधिक रकमेच्या मालमत्तेचे नुकसान झालेले नाही आणि ज्या आंदोलनात हिंसाचार झालेला नाही, कोणी मृत्युमुखी पडलेला नाही अशा प्रकरणातील राजकीय गुन्हे मागे घेण्यासाठी गृह विभागाने मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव आणला होता.

जानेवारी २०२० ते डिसेंबर २०२१ या काळातील प्रकरणांसाठी तो प्रस्ताव होता. सर्वोच्च न्यायालयाच्या एका निर्णयानुसार विद्यमान किंवा माजी आमदार-खासदारांवरील गुन्हे रद्द करण्यासाठी उच्च न्यायालयाची संमती आवश्यक असल्याने विद्यमान अथवा माजी आमदार-खासदारांवरील असे गुन्हे रद्द करण्याचा विषय त्या प्रस्तावात समाविष्ट नव्हता. तसेच जिल्हापातळीवर जिल्हाधिकारी आणि पोलीस आयुक्तालय क्षेत्रात पोलीस आयुक्त यांच्या समितीकडे असे राजकीय गुन्हे रद्द करण्याचे अधिकार देण्याची बाब त्यात होती. २०१६ मध्ये भाजप सरकारच्या काळात ही रचना सुरू करण्यात आली होती.

हा प्रस्ताव मंत्रिमंडळात मंजुरीसाठी आल्यावर राष्ट्रवादीच्या ज्येष्ठ मंत्र्याने त्यास आक्षेप घेतला. सध्या राजकीय दबावतंत्राचा वापर मोठ्याप्रमाणात सुरू असल्याने यातून राज्य सरकारसमोर नव्या अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे राजकीय गुन्हे रद्द करण्याच्या प्रकरणात अंतिम अधिकार मंत्रालय पातळीवर ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रस्ताव बदलावा, अशी सूचना या ज्येष्ठ नेत्याने केली. त्यानंतर बाकीच्या मंत्र्यांनीही या भूमिकेला पाठिंबा देत स्थानिक पातळीवर गैरप्रकार होण्याचा इशारा योग्य असल्याचे मत व्यक्त केल्याने तो प्रस्ताव बारगळला. आता लवकरच नवा प्रस्ताव मंजुरीसाठी येण्याची शक्यता आहे.

# साखरेचे विक्रमी उत्पादन

**(पान १ वरून)** इथेनॉल निर्मितीचे वाढलेले प्रमाण आणि साखर निर्यातीत झालेल्या वाढीमुळे साखर उद्योगास मोठा हातभार लागला आहे. आतापर्यंत देशभरात ८५ लाख मेट्रिक टन साखरेचे निर्यात करार झाले असून त्यापैकी ६५ ते ७० लाख मेट्रिक टन साखर निर्यातीसाठी रवाना झाली आहे. हंगामातील शिल्लक दिवस पाहता देशातील साखर निर्यातीचे प्रमाण आणखी १० लाख मेट्रिक टनांनी वाढून ते ९५ लाख टनांपर्यंत जाण्याचा अंदाज आहे.

यापूर्वी २००७-०८ आणि २०१०-११ मध्ये विक्रमी साखर उत्पादन झाले होते. पण त्यावेळी दर कोसळले होते. यंदा इथेनॉल व साखर निर्यात या दोन गोष्टींमुळे साखरचे अर्थकारण कोसळलेले नाही, असे नाईकनवरे यांनी स्पष्ट केले. गेल्या दोन वर्षांत करोनाच्या टाळेबंदीमुळे व निर्बंधांमुळे उन्हाळ्यात शीतपेये व आइस्क्रीम व लग्नसराईसाठी, मिठायांसाठीची साखरेची मागणी घटली होती. यंदा निर्बंध नसल्याने शीतपेये, आइसक्रीम व लग्नसराईमुळे साखरेच्या मागणीत वाढ झाल्याचाही चांगला परिणाम झाला आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.


लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

**व्यवसाय**

**कर्जविषयक**

**MAGMA** Finance ५०००० ते ३० लाखापर्यंत पर्सनल, बिझनेस, होमलोन ४ तासांत घरबसल्या मिळेल. २% वार्षिक व्याज. महिलांना ५०% सूट. 09602607234.
0070782265-1

**LIC** Fincorp Finance ५०००० ते २७ लाखापर्यंत पर्सनल, बिझनेस, होम लोन ४ तासांत घरबसल्या. ३% वार्षिक व्याज. महिलांना ५०% सूट. 09116061992.
0070782123-1

**नोकरीविषयक**

**पाहिजेत**

**OTHERS**

**Sales Personal Required** in Real Estate Agency: Young Smart Energetic Good looking Lady/Gent's Talketing Personality's with Networking Knowledgeable, flouncy in English, Hindi, Marathi Computer literate willing to travel Bcom/MBA an added advantage, at Venkateshwara properties, Magarpatta city, Pune call 9970179241, 9767431643
0090303614-1

**इतर जाहिराती**

**नावात बदल**

**I have changed my name** old name - Hozefa Zoher Hakim new name - Huzefa Zoher Hakim affidavit no.- B9181/2022
0090303704-1

**I, Kanupriya W/O Ujjwal** Vikas aged- 30 years residing at 402, Vanashree B Building, NDA Pashan Road, Bavdhan, have changed my name to Kanupriya Singh vide affidavit no 2142 dated 20-12-2021 before the Executive Magistrate, Dhanbad
0050196469-1

**My** old name was Mohan changed to new name Mohanan vide Affidavit No.4635/N/2022 Dtd.04/05/2022
0090303749-1

**My** old name was Yuwaraj Parbhat Patil changed to new name as Yuvraj Parbhat Patil vide Affidavit No.875/2022 Dtd.07/05/2022
0090303749-2

**जागासंबंधी**

**जागा पाहिजे**

**LEASE/RENTAL**

**Required** on Rent- 7000 to 25000 Sq.Ft. Godown/ Industrial Shed within 3km distance from Swargate. ( Agents welcome) Contact: 9503052600
0090303579-1

**सर्व्हिसेस**

**Attention,** Lawyers! Stenos/ typists are available, and can come to your office. Call/ whatsapp 9766615873. Or SMS 9890415581.
0090303385-1

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा

**यात्रा विशेष**

**हॉटेल रिसॉर्ट्स**

**निसर्गरम्य** लोणावळा - भाडेतत्त्वावर बंगला उपलब्ध. १० बेडरुम, ॲटॅचबाथ, टेलिव्हिजन, गार्डन, स्लाईड, झुला, कॅरम, स्विमिंगपूल, फ्री व्हायफाय, जेवणाची सोय. संपर्क: 9004606085.
0070775359-1

**यात्रासहल**

**गायत्री** ट्रॅव्हल्स नर्मदा परिक्रमा, २७ ऑक्टोबर अनोखा छत्तीसगढ १२ सप्टेंबर दंतेवाडा, अंबिकापूर सह परीपूर्ण व्यवस्था. बुकींग सुरु. प्राची भिडे- ९८८१४२८१२१/ ९६५७४५१४२६
0090303049-1

स्थावर मालमत्ता? तुमच्या अपेक्षेप्रमाणे व्यवहार होण्यासाठी 'लोकसत्ता'त एक छोटी जाहिरात पुरेशी आहे!

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइझिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

**छोट्या जाहिराती स्वीकारण्याची केंद्रे**

**औंध**
**सुयोग एन्टरप्रायझेस** सी/ओ संदीप बुक स्टॉल, स्वजस कॉम्प्लेक्स, परिहार चौक, औंधगाव, पुणे-७. मोबा. ९४२२०१११८१.
**चोरडिया कम्युनिकेशन्स** अर्षद अजित चोरडिया, १७/१८, औंधगाव, कॉसमॉस बँक लेनसमोर, औंध, पुणे-७. फोन २५८८६११८, ९९६०१११२२३.
**श्रद्धा ॲड्स** श्रीमती उज्वला कोटबागी 'ए' विंग, वास्तु-सुंदर, कुमार क्लासिकजवळ, पुणे-७. मोबा. ९३७१०५५७९९
**अप्पा बळवंत चौक**
**मे. व्ही. व्ही. मेढी** वरुण मेढी, १५३, बुधवार पेठ, जोगेश्वरी मंदिराजवळ, 'गणराज बुक्स'समोर, डीटीडीसी कुरिअरच्या वर, दुसरा मजला, पुणे-२. फोन ९०२८९६७५०५, ८७९३६४७५०५, (०२०) २४४९२१४९
**बिबवेवाडी**
**ॲड सर्व्हिस** अमोल नलावडे, स.नं. ६५९/२८, राजीव गांधीनगर, अप्पर शेवटचा बसस्टॉप, बिबवेवाडी, पुणे-१७. मोबाईल ९४२०७२९९१४, ९०२१८५१४६०
**आकाश ॲडव्हर्टाझिंग** सी. एस. सवार, ६४५/१, शॉप नं. ४, रासकर कॅम्पस, बिबवेवाडी मेन रोड, बिबवेवाडी, पुणे-३७. मो. ९९२२२२१२६१.
**बाजीराव रोड**
**श्री गणेश ॲडव्हर्टायझिंग** आर. निर्मला, आर. रवी, 'रेमेडी', १९२९, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे-३०. फोन २५२३२७६२, मोबा. ९९२२२२०९८५.
**बंडगार्डन**
**ॲपेक्स ॲडव्हर्टायझिंग** मापदान फिर्लोश, ऑफिस नं. २६-६-७-८, अशोका मॉल, सन ॲण्ड सॅन हॉटेलसमोर, बंडगार्डन रोड, पुणे.
**भवानी पेठ**
**ग्लोब एन्टरप्रायझेस** तन्वीर रेहमान शेख, ७१८, भवानी पेठ, पूना कॉलेज रोड, पुणे-१. मोबा. ९८९००७३८८३.
**भोसरी**
**संवाद ॲड्स.** गवळी बिल्डींगजवळ, पुणे-नाशिक रस्ता, भोसरी, पुणे-३९.
**चिंचवड**
**ॲपेक्स ॲडव्हर्टायझिंग** श्री. आशफाक ए.शेख, सी-२५, एमआयडीसी कमर्शियल बिल्डिंग नं. १, आयबीएमआर कॉलेजजवळ, चिंचवड, पुणे. फोन २७४७०२८२, मोबा. ९८२२७९२५८३.
**मयुरेश्वर एन्टरप्रायझेस** लोकेश बलकवडे, चाफेकर चौक, चिंचवडगाव, पुणे. मोबा. ९४२२०८२१६४.
**राका ॲडव्हर्टायझिंग** श्रीमती विमल बाफना, राका चेंबर्स, मुंबई-पुणे रस्ता, चिंचवड स्टेशन, पुणे-१९. फोन २७४७५०५५, २७४७२२५०.
**कॅम्प**
**ॲड इंडिया** ऑफिस नं. १०२, पहिला मजला, स्टर्लिंग सेंटर, हॉटेल अरोरा टॉवरसमोर, म. गांधी रस्ता, पुणे-१. फोन २६१३१९९३, २६१३५६५९, मोबा. ९४२२०८३६७०.
**हिंदुस्तान ॲडव्हर्टायझिंग एजन्सी** श्री. हिरो सुरतानी, ७, गितांजली कुंज, नेहरू मेमोरियल हॉलसमोर, आंबेडकर रस्ता, पुणे-१. फोन २६१३८११३, २६१३३५१०, फॅक्स २६१३१४८७.
**मिनत ॲडव्हर्टायझिंग** मुकुंद सायगांवकर, ८२७/७, दस्तूर मेहेर रस्ता, कॅम्प, पुणे-१. फोन २६१३०५४२.
**दापोडी**
**व्हेंटेज ॲडव्हर्टायझिंग ॲण्ड मार्केटिंग** ए-१७, 'सी' बिल्डिंग, तिसरा मजला, काटे रेसिडेन्सी, दापोडी रेल्वे स्टेशनजवळ, दापोडी, पुणे-४११०१२. फोन २७१४३२४३. मोबा. ९८२२८४७२५६, ९८२२१३२५००.
**डेक्कन**
**प्राजक्ता ॲडव्हर्टायझिंग** श्री. सुधनवा जाधव, ग्रीटवेल, १२५०, डेक्कन जिमखाना, फर्गसन कॉलेज रोड, पुणे-४. फोन २५५३१४०९, ६६०१४१३२.
**देहू रोड**
**मुंदकल एन्टरप्रायझेस** श्री. रोजी सॅम्युएल राजू, ६, युनिक हौसिंग सोसायटी, टेलिफोन एक्स्चेंजजवळ, देहूरोड, पुणे-४१२१०१. मोबा. ९४२२५१९२६४.
**फर्गसन कॉलेज रस्ता**
**धंधानिया एजन्सीज** श्री. रवी धंधानिया, पहिला मजला, श्रीनाथ प्लाझा, ज्ञानेश्वर पादुका चौक, फर्गसन रस्ता, पुणे-४११००५. फोन २५५२१६९९, २५५३७९३३.
**कोनार्क मिडिया सोल्युशन प्रा. लि.** फ्लॅट नं. ६, पहिला मजला, प्रभा तारा अपार्टमेंट, हॉटेल वैशालीमागे, फर्गसन रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४. फोन ३२६०६०१२. मोबा. ९८२३१४२४१०. टेलिफॅक्स २५५३७०१३.
**मिरा सोसायटी** पहिला मजला, १०, ओसवाल पार्क, रचना लॉजसमोर, सफारी हॉटेलमागे, एस.टी. स्टँडजवळ, शिवाजीनगर, पुणे-५. मोबा. ९४२१०१७४५७.

# ICICI PRUDENTIAL LIFE INSURANCE COMPANY LIMITED

Registered Office : 1089, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai - 400025 (Reg. No. 105 dated 24.11.2000)
CIN: L66010MH2000PLC127837 Ph: 022-40391600, Fax: 022-24224484, Email: ir@iciciprulife.com Website: www.iciciprulife.com

## AUDITED STANDALONE FINANCIAL RESULTS FOR THE YEAR ENDED MARCH 31, 2022

**FORM L-1A-A-RA**

**REVENUE ACCOUNT (POLICYHOLDERS' / TECHNICAL ACCOUNT) FOR THE YEAR ENDED**

( ₹ in lakhs)

| Particulars | March 31, 2022 | | | | | | | March 31, 2021 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Total | Non-Linked | | | Linked | | | Total | Non-Linked | | | Linked | | |
| | | Individual | | Group | Individual | | Group | | Individual | | Group | Individual | | Group |
| | | Life | Pension | | Life | Pension | | | Life | Pension | | Life | Pension | |
| **Premiums earned (net of Goods & Service tax)** | | | | | | | | | | | | | | |
| (a) Premium | 3,745,800 | 916,615 | 297,011 | 508,993 | 1,839,643 | 19,852 | 163,686 | 3,573,282 | 760,309 | 230,983 | 315,430 | 1,966,614 | 22,552 | 277,394 |
| (b) Reinsurance ceded | (113,679) | (39,886) | (3) | (65,614) | (8,175) | (1) | - | (75,949) | (33,465) | (2) | (34,947) | (7,534) | (1) | - |
| (c) Reinsurance accepted | 6 | - | - | 6 | - | - | - | 6 | - | - | 6 | - | - | - |
| **Sub-total** | **3,632,127** | **876,729** | **297,008** | **443,385** | **1,831,468** | **19,851** | **163,686** | **3,497,339** | **726,844** | **230,981** | **280,489** | **1,959,080** | **22,551** | **277,394** |
| **Income from investments** | | | | | | | | | | | | | | |
| (a) Interest, dividend & rent - Gross | 788,363 | 317,237 | 62,197 | 33,436 | 309,611 | 19,768 | 46,114 | 672,301 | 266,400 | 44,990 | 22,751 | 271,745 | 21,432 | 44,983 |
| (b) Profit on sale / redemption of investments | 1,544,952 | 105,863 | 2,676 | 1,263 | 1,306,806 | 102,254 | 26,090 | 1,283,122 | 218,182 | 16,990 | 1,991 | 907,236 | 100,617 | 38,106 |
| (c) (Loss) on sale / redemption of investments | (94,226) | (9,284) | (626) | (132) | (70,025) | (6,234) | (7,925) | (531,212) | (49,836) | (465) | - | (432,427) | (37,544) | (10,940) |
| (d) Transfer / gain on revaluation / change in fair value | 219,680 | (9,249) | - | - | 244,595 | (8,653) | (7,013) | 3,269,646 | (768) | - | - | 3,035,735 | 196,156 | 38,523 |
| (e) Amortisation of Premium / Discount on investments | 38,185 | 2,567 | 2,328 | 1,817 | 27,653 | 977 | 2,843 | 49,899 | (208) | (247) | 770 | 44,769 | 1,362 | 3,453 |
| **Sub-total** | **2,496,954** | **407,134** | **66,575** | **36,384** | **1,818,640** | **108,112** | **60,109** | **4,743,756** | **433,770** | **61,268** | **25,512** | **3,827,058** | **282,023** | **114,125** |
| **Other income:** | | | | | | | | | | | | | | |
| Income on unclaimed amount of policyholders | 4,109 | - | - | - | 4,109 | - | - | 4,354 | - | - | - | 4,354 | - | - |
| Fees and charges | 6,707 | 6,703 | 2 | - | 2 | - | - | 4,889 | 4,882 | 4 | - | 3 | - | - |
| Miscellaneous income | 443 | 116 | 32 | 63 | 202 | 2 | 28 | 97 | 19 | 6 | 8 | 56 | 1 | 7 |
| Contribution from the Shareholders' account | | | | | | | | | | | | | | |
| (a) Towards Excess Expenses of Management | 21,450 | (41,515) | - | 62,965 | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| (b) Towards deficit funding and others | 194,661 | 97,325 | - | 92,241 | 5,095 | - | - | 157,478 | 88,975 | 15,247 | 53,256 | - | - | - |
| **Sub-total** | **227,370** | **62,629** | **34** | **155,269** | **9,408** | **2** | **28** | **166,818** | **93,876** | **15,257** | **53,264** | **4,413** | **1** | **7** |
| **Total (A)** | **6,356,451** | **1,346,492** | **363,617** | **635,038** | **3,659,516** | **127,965** | **223,823** | **8,407,913** | **1,254,490** | **307,506** | **359,265** | **5,790,551** | **304,575** | **391,526** |
| Commission* | 167,291 | 86,223 | 4,999 | 9,808 | 66,145 | 86 | 30 | 150,022 | 76,276 | 3,513 | 6,765 | 63,363 | 101 | 4 |
| Operating expenses related to insurance business | 367,295 | 137,612 | 7,607 | 124,204 | 95,603 | 1,370 | 899 | 268,826 | 110,998 | 4,084 | 83,278 | 67,684 | 1,335 | 1,447 |
| Provision for doubtful debts | 140 | 103 | 6 | - | 29 | 2 | - | 184 | 91 | 4 | - | 87 | 3 | (1) |
| Bad debts written off | 338 | 128 | 9 | 17 | 183 | 1 | - | 182 | 76 | 3 | 3 | 99 | - | 1 |
| Provisions (other than taxation) | | | | | | | | | | | | | | |
| Provisions for diminution in the value of investments (net) | 2,332 | 2,332 | - | - | - | - | - | 2,012 | 2,012 | - | - | - | - | - |
| Goods and Services Tax on ULIP Charges | 69,143 | - | - | - | 64,528 | 2,448 | 2,167 | 65,464 | - | - | - | 61,175 | 2,307 | 1,982 |
| **Total (B)** | **606,539** | **226,398** | **12,621** | **134,029** | **226,488** | **3,907** | **3,096** | **486,690** | **189,453** | **7,604** | **90,046** | **192,408** | **3,746** | **3,433** |
| Benefits paid (net) | 2,914,531 | 255,605 | 63,005 | 198,478 | 2,080,848 | 135,192 | 181,403 | 2,252,467 | 159,734 | 40,469 | 82,182 | 1,521,767 | 199,035 | 249,280 |
| Interim bonus paid | 21,353 | 21,273 | 80 | - | - | - | - | 11,623 | 11,593 | 30 | - | - | - | - |
| Change in valuation of policy liabilities | | | | | | | | - | | | | | | |
| (a) Gross amount | 970,375 | 474,781 | 266,089 | 242,022 | (12,476) | 191 | (232) | 1,476,413 | 1,071,469 | 253,695 | 157,347 | (4,053) | (2,189) | 144 |
| (b) Amount ceded in reinsurance | 376,285 | 379,956 | - | (3,671) | - | - | - | (190,420) | (176,342) | - | (14,078) | - | - | - |
| (c) Amount accepted in reinsurance | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| (d) Fund reserve | 1,277,101 | - | - | - | 1,261,103 | (20,961) | 36,959 | 3,973,365 | - | - | - | 3,740,197 | 96,035 | 137,133 |
| (e) Funds for discontinued policies | (45,385) | - | - | - | (42,998) | (2,387) | - | 173,052 | - | - | - | 178,712 | (5,660) | - |
| **Total (C)** | **5,514,260** | **1,131,615** | **329,174** | **436,829** | **3,286,477** | **112,035** | **218,130** | **7,696,500** | **1,066,454** | **294,194** | **225,451** | **5,436,623** | **287,221** | **386,557** |
| **Surplus / (Deficit) (D) = (A) - (B) - (C)** | **235,652** | **(11,521)** | **21,822** | **64,180** | **146,551** | **12,023** | **2,597** | **224,723** | **(1,417)** | **5,708** | **43,768** | **161,520** | **13,608** | **1,536** |
| Provision for taxation | | | | | | | | | | | | | | |
| (a) Current tax credit / (charge) | (16,615) | (16,575) | - | (40) | - | - | - | (14,185) | (14,143) | - | (42) | - | - | - |
| (b) Deferred Tax credit / (charge) | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **Surplus / (Deficit) after tax** | **219,037** | **(28,096)** | **21,822** | **64,140** | **146,551** | **12,023** | **2,597** | **210,538** | **(15,560)** | **5,708** | **43,726** | **161,520** | **13,608** | **1,536** |
| Amount transferred from Shareholders' Account (Non-Technical Account) | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **Amount Available for appropriations** | **219,037** | **(28,096)** | **21,822** | **64,140** | **146,551** | **12,023** | **2,597** | **210,538** | **(15,560)** | **5,708** | **43,726** | **161,520** | **13,608** | **1,536** |
| **Appropriations** | | | | | | | | | | | | | | |
| Balance of previous year | 135,318 | 103,932 | 30,510 | 876 | - | - | - | 123,266 | 97,324 | 25,029 | 913 | - | - | - |
| Transfer to Shareholders' account | 216,023 | (31,709) | 21,741 | 64,820 | 146,551 | 12,023 | 2,597 | 198,486 | (22,168) | 227 | 43,763 | 161,520 | 13,608 | 1,536 |
| Transfer to other reserves | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| **Balance being funds for future appropriations** | 138,332 | 107,545 | 30,591 | 196 | - | - | - | 135,318 | 103,932 | 30,510 | 876 | - | - | - |

*Including rewards and/or remuneration to agents, brokers or other intermediaries

**FORM L-2A-A-P&L**

**PROFIT & LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED**

**Shareholders' Account (Non-Technical Account)** ( ₹ in lakhs)

| Particulars | March 31, 2022 | March 31, 2021 |
|---|---|---|
| Amounts transferred from Policyholders' (Technical) account | 216,022 | 198,486 |
| **Income from investments** | | |
| (a) Interest, dividend & rent - Gross | 50,385 | 48,154 |
| (b) Profit on sale / redemption of investments | 52,610 | 41,354 |
| (c) (Loss) on sale / redemption of investments | (496) | (12,186) |
| (d) Amortisation of Premium / Discount on Investments | (1,361) | (454) |
| Other income | 224 | 28 |
| **Total (A)** | **317,384** | **275,382** |
| Expenses other than those directly related to the insurance business** | 1,332 | 1,738 |
| Contribution to Policyholders' account (Technical account) | | |
| (a) Towards Excess Expenses of Management | 21,450 | 9,795 |
| (b) Towards deficit funding and others | 194,661 | 147,683 |
| Interest on subordinated debt | 8,220 | 3,288 |
| Expenses towards CSR activities | 691 | 1,089 |
| Penalties | - | - |
| Bad debts written-off | - | - |
| Amount Transferred to Policyholders' Account | - | - |
| **Provisions (other than taxation)** | | |
| (a) For diminution in value of investments (net) | 12,766 | 2,858 |
| (b) Provision for doubtful debts | (791) | 791 |
| **Total (B)** | **238,329** | **167,242** |
| Profit before tax (A)-(B) | 79,055 | 108,140 |
| Provision for taxation | | |
| (a) Current tax credit / (charge) | (3,642) | (12,125) |
| (b) Deferred tax credit / (charge) | - | - |
| **Profit after tax** | **75,413** | **96,015** |
| **Appropriations** | | |
| (a) Balance at the beginning of the year | 361,078 | 265,063 |
| (b) Interim dividends paid during the period | - | - |
| (c) Final dividend | 28,731 | - |
| (d) Transfer to reserves/ other accounts | - | - |
| **Profit / (Loss) carried to Balance Sheet** | **407,760** | **361,078** |
| **Earnings per equity share** | | |
| Basic earnings per equity share (₹) | 5.25 | 6.69 |
| Diluted earnings per equity share (₹) | 5.23 | 6.67 |
| Nominal value per equity share (₹) | 10.00 | 10.00 |

**Including Managerial Remuneration in excess of the allowable limits as prescribed by IRDAI.

**FORM L-3A-A-BS**

**BALANCE SHEET AS AT**

( ₹ in lakhs)

| Particulars | At March 31, 2022 | At March 31, 2021 |
|---|---|---|
| **Sources of funds** | | |
| **Shareholders' funds :** | | |
| Share capital | 143,731 | 143,597 |
| Share application money | - | 55 |
| Reserve and surplus | 759,154 | 706,712 |
| Credit / (debit) fair value change account | 13,421 | 61,577 |
| **Sub-total** | **916,306** | **911,941** |
| Borrowings | 120,000 | 120,000 |
| **Policyholders' funds :** | | |
| Credit / (debit) fair value change account | 289,543 | 306,216 |
| Policy liabilities | 7,368,215 | 6,021,556 |
| Funds for discontinued polices | | |
| (i) Discontinued on Account of non-payment of premiums | 1,027,438 | 1,071,694 |
| (ii) Others | 5,051 | 6,180 |
| Insurance Reserve | - | - |
| Provision for linked liabilities | 14,054,141 | 12,777,040 |
| **Sub-total** | **22,864,388** | **20,302,686** |
| **Funds for future appropriations** | | |
| Linked | - | - |
| Non-Linked (Non-PAR) | - | - |
| Non-Linked (PAR) | 138,332 | 135,318 |
| Deferred Tax Liabilities (Net) | - | - |
| **Sub-total** | **138,332** | **135,318** |
| **Total** | **23,919,026** | **21,349,945** |
| **Application of funds** | | |
| Investments | | |
| - Shareholders' | 985,347 | 1,009,016 |
| - Policyholders' | 7,738,800 | 6,357,256 |
| Asset held to cover linked liabilities | 15,086,630 | 13,854,914 |
| Loans | 94,012 | 66,282 |
| Fixed assets - net block | 48,724 | 45,719 |
| Deferred tax asset | - | - |
| Current assets | | |
| - Cash and bank balances | 66,995 | 55,740 |
| - Advances and Other assets | 423,513 | 333,882 |
| **Sub-total (A)** | **490,508** | **389,622** |
| Current liabilities | 522,395 | 370,541 |
| Provisions | 2,600 | 2,323 |
| **Sub-total (B)** | **524,995** | **372,864** |
| **Net current assets (C) = (A-B)** | **(34,487)** | **16,758** |
| Miscellaneous expenditure (to the extent not written-off or adjusted) | - | - |
| Debit balance in Profit & Loss Account (Shareholders' account) | - | - |
| Deficit in Revenue Account (Policyholders' A/c) | - | - |
| **Total** | **23,919,026** | **21,349,945** |

**Note:** The audited financial statements have been approved by Board of Directors at its meeting held at Mumbai on April 16, 2022. The Statutory auditors have expressed an unqualified audit opinion. The Revenue account, Profit and Loss account, Balance Sheet and Analytical Ratios (to the extent applicable) presented above are extracted from audited financial statements. Previous year figures have been regrouped and reclassified wherever necessary to confirm to current year's presentation. COMP/DOC/May/2022/65/0199.

**FORM L-22**

**ANALYTICAL RATIOS**

| Sr. No. | Particulars | Year ended March 31, 2022 | Year ended March 31, 2021 |
|---|---|---|---|
| 1 | New business premium income growth | | |
| | (i) Linked Business | (6.3%) | (17.5%) |
| | (ii) Non-Linked Business | | |
| | Participating | (25.4%) | 0.7% |
| | Non Participating | 43.1% | 41.2% |
| 2 | Percentage of Single Premium (Individual Business) to Total New Business Premium (Individual Business) | 35.8% | 33.9% |
| 3 | Percentage of Linked New Business Premium (Individual Business) to Total New Business Premium (Individual Business) | 41.5% | 41.0% |
| 4 | Net retention ratio | 97.0% | 97.9% |
| 5 | Conservation Ratio | | |
| | (i) Linked Business | 75.1% | 80.3% |
| | (ii) Non-Linked Business | | |
| | Participating | 88.9% | 92.1% |
| | Non Participating | 91.0% | 79.6% |
| 6 | Expense of Management to Gross Direct Premium Ratio | 14.3% | 11.7% |
| 7 | Commission Ratio (Gross commission and Rewards paid to Gross Premium) | 4.5% | 4.2% |
| 8 | Ratio of Policyholders' Fund to Shareholders' funds | 2,497.3% | 2,228.0% |
| 9 | Change in networth (₹ in lakhs) | 4,364 | 190,079 |
| 10 | Growth in Networth | 0.5% | 26.3% |
| 11 | Ratio of surplus to policyholders Funds | 0.0% | 0.3% |
| 12 | Profit after tax / Total income | 1.2% | 1.2% |
| 13 | (Total Real Estate + Loans) / Cash & invested assets | 0.7% | 0.7% |
| 14 | Total Investment / (Capital + Reserves and Surplus) | 2,598.6% | 2,327.0% |
| 15 | Total Affiliated Investment / (Capital+Reserves and Surplus) | 0.9% | 1.1% |
| 16 | Investment Yield (Gross and Net) | | |
| | A. Without unrealised gains | | |
| | - Shareholders' Fund | 10.2% | 8.8% |
| | - Policyholders' Fund | | |
| | Non Linked Par | 8.3% | 10.8% |
| | Non Linked Non Par | 7.9% | 9.8% |
| | Linked Non Par | 13.3% | 6.9% |
| | B. With unrealised gains | | |
| | - Shareholders' Fund | 2.2% | 19.0% |
| | - Policyholders' Fund | | |
| | Non Linked Par | 5.3% | 17.8% |
| | Non Linked Non Par | 3.2% | 13.1% |
| | Linked Non Par | 12.8% | 40.9% |
| 17 | Persistency Ratio(Regular Premium / Limited Premium Payment under Individual category)# | | |
| | Premium Basis | | |
| | 13th Month | 84.6% | 84.9% |
| | 25th Month | 77.3% | 72.9% |
| | 37th Month | 66.9% | 65.8% |
| | 49th Month | 63.4% | 63.5% |
| | 61st Month | 54.7% | 48.9% |
| | Number of Policy Basis | | |
| | 13th Month | 75.1% | 74.9% |
| | 25th Month | 68.3% | 63.0% |
| | 37th Month | 58.2% | 57.2% |
| | 49th Month | 54.7% | 56.6% |
| | 61st Month | 41.3% | 41.8% |
| 18 | NPA Ratio | | |
| | Policyholders' Funds | | |
| | Gross NPA Ratio | NIL | NIL |
| | Net NPA Ratio | NIL | NIL |
| | Shareholders' Funds | | |
| | Gross NPA Ratio | NIL | NIL |
| | Net NPA Ratio | NIL | NIL |
| 19 | Solvency Ratio | 204.5% | 216.8% |
| 20 | Debt Equity Ratio | 0.13 | 0.13 |
| 21 | Debt Service Coverage Ratio | 11.43 | 35.71 |
| 22 | Interest Service Coverage Ratio | 11.43 | 35.71 |
| 23 | Average ticket size in ₹- Individual premium (Non-Single) | 100,594 | 85,333 |

#The ratio is computed based on the original premiums issued. Calculations are in accordance with the IRDAI circular IRDA/ACT/CIR/GEN/21/02/2010 dated February 11, 2010. For FY2022, policies issued in the January to December period of the relevant year have been measured on April 30, 2022. For FY2021, policies issued in the January to December period of the relevant year have been measured on April 30, 2021.Group policies and policies under micro insurance products are excluded.

For and on behalf of Board of Directors

**N. S. Kannan**
Managing Director & CEO
DIN : 00066009

| | | |
|---|---|---|
| सकाळी ७.३० वा | चीन वि. फ्रान्स | |
| थॉमस चषक बॅडमिंटन | थेट प्रक्षेपण : स्पोर्ट्स १८-१ | |
| सायं. ५.३० वा. | इंडोनेशिया वि. थायलंड | |
| थॉमस चषक बॅडमिंटन | थेट प्रक्षेपण : स्पोर्ट्स १८-१ | |

क्री डा

‘आयपीएल’ संघ राजस्थान रॉयल्सचा डावखुरा फलंदाज शिम्रॉन हेटमायर काही दिवसांसाठी गयाना (वेस्ट इंडिज) येथे परतला आहे. हेटमायरची पत्नी लवकरच त्यांच्या पहिल्या पाल्याला जन्म देणार आहे.





# हैदराबादचा धुव्वा!

## बंगळूरु ६७ धावांनी विजयी; ड्युप्लेसिस, हसरंगाची चमकदार कामगिरी

**पीटीआय, मुंबई**

**कर्णधार फॅफ** ड्युप्लेसिसच्या (५० चेंडूंत नाबाद ७३ धावा) अर्धशतकानंतर लेग-स्पिनर वानिंदू हसरंगाने (५/१८) केलेल्या अप्रतिम गोलंदाजीच्या बळावर रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुनी रविवारी इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेटच्या सामन्यात सनरायजर्स हैदराबादचा ६७ धावांनी धुव्वा उडवला.

इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट

मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात बंगळूरुने दिलेल्या १९३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना हैदराबादचा संघ १९.२ षटकांत १२५ धावांत गारद झाला. त्यामुळे बंगळूरुने १२ सामन्यांतील सातव्या विजयाची नोंद करत गुणतालिकेतील चौथे स्थान अधिक भक्कम केले. सहाव्या स्थानी असलेल्या हैदराबादचा हा सलग चौथा पराभव ठरला.



फॅफ ड्युप्लेसिस

दुपारच्या वेळेत झालेल्या या सामन्यात बंगळूरुचा कर्णधार ड्युप्लेसिसने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. मात्र, त्यांच्या डावाची अडखळती सुरुवात झाली. डावखुरा फिरकीपटू जगदीश सुचितने विराट कोहलीला डावाच्या पहिल्याच चेंडूवर माघारी पाठवले. यानंतर ड्युप्लेसिस आणि रजत पटिदार (३८ चेंडूंत ४८ धावा) यांनी चांगली फलंदाजी करत बंगळूरुच्या डावाला आकार दिला. या दोघांनी १०५ धावांची भागीदारी रचल्यावर पटिदारला सुचितनेच बाद केले. ड्युप्लेसिसने मात्र एक बाजू लावून धरताना हंगामातील तिसरे अर्धशतक झळकावले. मग त्याला ग्लेन मॅक्सवेल (२४ चेंडूंत ३३) आणि दिनेश कार्तिक (८ चेंडूंत नाबाद ३०) या अनुभवी फलंदाजांची साथ लाभल्याने बंगळूरुने २० षटकांत ३ बाद १९२ अशी धावसंख्या उभारली.

आव्हानाचा पाठलाग करताना हैदराबादच्या डावाची खराब सुरुवात झाली. अभिषेक शर्मा आणि कर्णधार केन विल्यम्सन हे सलामीवीर खातेही न उघडता बाद झाले. तिसऱ्या क्रमांकावरील राहुल त्रिपाठीने ३७ चेंडूंत ५८ धावांची खेळी साकारली. मात्र, त्याला इतरांची साथ लाभली नाही. हसरंगाच्या भेदक माऱ्यापुढे हैदराबादची मधली फळी ढेपाळली. हसरंगाने एडिन मार्करम (२१) आणि निकोलस पूरन (१९) यांच्यासह एकूण पाच फलंदाजांना माघारी धाडले.

### संक्षिप्त धावफलक

रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु : २० षटकांत ३ बाद १९२ (फॅफ ड्युप्लेसिस नाबाद ७३, रजत पटिदार ४८; जगदीश सुचित २/३०) विजयी वि. सनरायजर्स हैदराबाद : १९.२ षटकांत सर्वबाद १२५ (राहुल त्रिपाठी ५८, एडिन मार्करम २१; वानिंदू हसरंगा ५/१८, जोश हेझलवूड २/१७)
● सामनावीर : वानिंदू हसरंगा

# चेन्नईची दिल्लीवर सरशी

**पीटीआय, नवी मुंबई**

**डेव्हॉन कॉन्वेच्या** (४९ चेंडूंत ८७ धावा) आक्रमक खेळीनंतर मोईन अली (१३ धावांत ३ बळी) आणि मुकेश चौधरीच्या (२२ धावांत २ बळी) चांगल्या गोलंदाजीमुळे चेन्नई सुपर किंग्जनी रविवारी झालेल्या ‘आयपीएल’ लढतीत दिल्ली कॅपिटल्स संघावर ९१ धावांनी दिमाखदार विजय मिळवला.

या लढतीत २०९ धावांचा पाठलाग करणाऱ्या दिल्लीच्या कोणत्याही फलंदाजांचा चेन्नईच्या गोलंदाजांसमोर निभाव लागला नाही. दिल्लीला १७.४ षटकांत ११७ धावाच करता आल्या.

### आजचा सामना

मुंबई वि. कोलकाता
● वेळ : सायं. ७.३० वा.
● थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स १, १ हिंदी, सिलेक्ट १

# पुण्याला उपविजेतेपद

## कुमारी गटात पालघरकडून निसटता पराभव; कुमार गटात कोल्हापूर अजिंक्य

**लोकसत्ता क्रीडा प्रतिनिधी**

**पुणे :** पालघरने पुण्यावर ३२-३० असा निसटता विजय मिळवत कुमारी गटाचे राज्य अजिंक्यपद प्रथमच जिंकण्याची किमया साधली. पालघरचे हे एकंदरीतच पहिले राज्य अजिंक्यपद जेतेपद ठरले आहे. कुमार गटात कोल्हापूर संघाने मुंबई उपनगर संघाला ३९-२७ असे नामोहरम करून जेतेपदाचा मान मिळवला.

कुमारी गटाचा पुणे जिल्हा विरुद्ध पालघर यांच्यातील अंतिम सामना अटीतटीचा झाला. मध्यांतराला दोन्ही संघांमधील चुरस १९-१९ अशी टिकून होती. या सामन्यात पालघरच्या ज्युली मिस्किटाने अष्टपैलू खेळाचे प्रदर्शन केले. श्रुती सोमासेचे क्षेत्ररक्षण आणि ऐश्वर्या पाटीलच्या चढायांनी तिला छान साथ दिली.

कुमार राज्य कबड्डी स्पर्धा

कुमार गटात मुंबई उपनगर आणि कोल्हापूर या सामन्यात मध्यांतराला कोल्हापूर संघाने वर्चस्वपूर्ण खेळाचे प्रदर्शन करीत २४-१९ अशी आघाडी घेतली होती. कोल्हापूरच्या कुणाल जगताप, ओंकार पाटील, साईप्रसाद पाटील आणि स्वराज साळवी यांनी उत्कृष्ट खेळ करत संघाला विजय मिळवून दिला, तर मुंबई उपनगरच्या रोहित सिंग, साहिल नलावडे यांनी चांगला खेळ केला. परंतु ते संघाला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरले.

तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या कुमारी गटाच्या लढतीत मुंबई शहर संघाने सांगली संघावर ४६-२९ असा दणदणीत विजय मिळवला. सांगलीच्या ऋतुजा आंबी व आर्या पाटील यांनी चांगला खेळ करत विजय मिळविला. कुमार गटात परभणी संघाने पालघर संघाचा ३२-३२ असा पराभव करत तिसरा क्रमांक मिळविला.

# मजुराच्या कबड्डीपटू मुलाचे भारतासाठी खेळण्याचे स्वप्न!

**संकेत कुलकर्णी, लोकसत्ता**

**पुणे :** महाराष्ट्राच्या बीड जिल्ह्यातील देवीगवाण गावात राहणाऱ्या उमेश अशोक जगदाळे या मजुराच्या मुलाने कबड्डीत भारतीय संघाकडून खेळण्याचे स्वप्न बाळगले आहे.

नुकत्याच झालेल्या राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत बीडच्या संघाकडून चमकदार कामगिरी करणाऱ्या उमेशची घरची परिस्थिती बिकट आहे. मात्र, या गोष्टीचा खेळावर परिणाम होऊ न देण्याचा त्याने निश्चय केला आहे. ‘‘भारतीय कबड्डी संघाचे प्रतिनिधित्व करण्याचे माझे लक्ष्य असून त्यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. आर्थिकदृष्ट्या मला आणि माझ्या कुटुंबीयांना अडचणींचा सामना करावा लागतो. माझे आई-वडील आणि भाऊ हे शेतीसह मजुरीचे काम करतात. मला भारताकडून खेळताना पाहण्याचे त्यांचे स्वप्न आहे,’’ असे उमेश म्हणाला.



### घरातूनच कबड्डीचे धडे

उमेशला कबड्डीचे धडे घरातच मिळाले. “माझे काका अनिल आणि कैलास जगदाळे हे कबड्डीपटू होते. सध्या कैलासकाका माझे प्रशिक्षक आहेत,” असे उमेश म्हणाला. “आमच्या दोन पिढ्या हा खेळ खेळत आहेत. आता उमेश आंतरराष्ट्रीय स्तरावर छाप पाडेल अशी आम्हाला आशा आहे,” असे कैलास जगदाळे यांनी सांगितले.


‘‘मीसुद्धा सकाळी ५ ते ७ या वेळेत सराव करून दिवसभर मजुरीचे काम करतो. मग संध्याकाळी ५ वाजता पुन्हा सरावासाठी मैदानात जातो. घरातील बिकट परिस्थितीमुळे मला कबड्डी खेळतानाच अन्य काम करावे लागते आहे. त्यामुळे मला माझ्या आहाराकडे लक्ष देणे शक्य होत नाही. मात्र, मी या गोष्टीचा माझ्या खेळावर परिणाम होऊ देत नाही,’’ असेही उमेशने सांगितले.

‘‘मागील वर्षी कुमार गटाच्या स्पर्धेसाठी माझी राष्ट्रीय संघात निवड झाली होती. मी महाराष्ट्राचेही प्रतिनिधित्व केले आहे. ‘प्रो कबड्डी’च्या यादीत माझे नाव होते, परंतु माझ्यावर बोली लागली नाही,’’ असे उमेश म्हणाला.

# अपमानास्पद वागणुकीमुळे यंदाच्या ‘आयपीएल’मधून माघार - गेल

**लंडन :** गेल्या काही ‘आयपीएल’ हंगामांमध्ये मिळालेल्या अपमानास्पद वागणुकीमुळे यंदा या स्पर्धेला मुकण्याचा निर्णय घेतल्याचे वेस्ट इंडिजचा सलामीवीर ख्रिस गेलने म्हटले आहे.

गेलची ट्वेन्टी-२० क्रिकेट आणि ‘आयपीएल’च्या इतिहासातील सर्वोत्कृष्ट फलंदाजांमध्ये गणना केली जाते. मात्र, २०२०च्या हंगामापूर्वी झालेल्या खेळाडू लिलाव प्रक्रियेतील सुरुवातीच्या फेऱ्यांमध्ये त्याला कोणत्याही संघाने खरेदी केले नाही. अखेर पंजाबने त्याला संघात समाविष्ट करून घेतले. परंतु दोन हंगामांमध्ये त्याला सातत्याने सामने खेळण्याची संधी मिळाली नाही. तसेच त्याला सलामीऐवजी तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करावी लागली.



‘‘गेल्या एक-दोन वर्षांत ‘आयपीएल’मध्ये मला योग्य वागणूक मिळाली नाही. ‘आयपीएल’ आणि एकूणच क्रिकेट या खेळासाठी दिलेल्या योगदानानंतरही मला अपेक्षित आदर मिळाला नाही. त्यामुळे मी यंदा ‘आयपीएल’च्या खेळाडू लिलावासाठी नाव न नोंदवण्याचा निर्णय घेतला,’’ असे गेल म्हणाला.

# भारतीय संघांची विजयी सलामी

**पीटीआय, बँकॉक**

**भारतीय पुरुष** आणि महिला बॅडमिंटन संघांनी रविवारी आपापले सामने जिंकत थॉमस आणि उबर चषकाच्या आपल्या मोहिमेची दिमाखदार सुरुवात केली. पुरुष संघाने जर्मनीला ५-० असे, तर महिलांनी कॅनडाला ४-१ अशा फरकाने पराभूत केले.

थॉमस-उबर चषक बॅडमिंटन स्पर्धा

पुरुष संघाच्या पहिल्या सामन्यात लक्ष्य सेनने मॅक्स विसकिर्चेनवर २१-१६, २१-१३ अशी सहज मात केली. त्यानंतर दुहेरीच्या सामन्यात सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीने जोन्स रॅल्फी यान्सेन आणि मार्व्हिन सिडेल जोडीवर २१-१५, १०-२१, २१-१३ असा विजय मिळवला. किदम्बी श्रीकांतने काइ शेफरला १९-२१, २१-९, २१-११ असे नमवत भारताला एकूण लढतीत ३-० अशी विजयी आघाडी मिळवून दिली. एमआर अर्जुन आणि ध्रुव कपिला जोडीने ब्योर्न गीस आणि यान कॉलिन व्होएल्करला २५-२३, २१-१५ असे पराभूत केले. मग एचएस प्रणॉयने मॅथियास किकलिट्जचा २१-९, २१-९ असा पराभव केला.



लक्ष्य सेन

महिलांच्या पहिल्या लढतीत पीव्ही सिंधूने मिशेल ली हिला २१-१७, २१-१० असे पराभूत करत चांगली सुरुवात केली. पहिल्या दुहेरीच्या सामन्यात श्रुती मिश्रा आणि सिमरन सिंघी जोडीला राशेल होंडेरीच आणि क्रिस्टेन त्साइ जोडीकडून १९-२१, १२-२१ असा पराभव पत्करावा लागला. त्यानंतर आकर्षी कश्यपने वेन यू झँगला १७-२१, २१-१८, २१-१७ असे नमवले. दुहेरीच्या लढतीत तनिषा क्रॅस्टो आणि त्रिसा जॉली जोडीने कॅथरीन चोइ आणि जोसफिन वू जोडीला २१-९, २१-१५ असे पराभूत केले. तर, अश्मिता चलिहाने राशेल चॅनवर १२-२१, २१-११, २२-२० असा विजय मिळवला.

### आजचा सामना

भारत वि. कॅनडा (थॉमस चषक)
● वेळ : दु. १२.३० वा.
● थेट प्रक्षेपण : स्पोर्ट्स १८-१




हे पत्र वैदेही ठाकर यांनी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा) लिमिटेडकरिता (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) इंडियन एक्स्प्रेस प्रेस, सर्व्हे क्र. २८८, प्लॉट नं. १ व २, रायसोनी इंडस्ट्रीयल पार्क, मु. पो. माण, ता. मुळशी, जि. पुणे ४११०२७ येथे छापून द इंडियन एक्स्प्रेस (प्रा) लिमिटेड, ‘एक्स्प्रेस हाऊस’, प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४११००४ येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी- ६७२४१०००. फॅक्स - ६७२४११४७. लोकसत्ता मुंबई कार्यालय : मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : ०२२- २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : ०२२-२२८२२१८७. महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४००७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. नागपूर कार्यालय : प्लॉट. न. ३८, अॅडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७, अहमदनगर ०२४१- २४५१९०७, फॅक्स -२४५१६०७. कोल्हापूर ०२३१- २६४४९९४.
■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठाकर ■ संपादक : गिरीश कुबेर ■ सहायक संपादक : मुकुंद संगोराम * (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd. No. RNI 56975/92 © द इंडियन एक्स्प्रेस (प्रा) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.